प्राज्ञमाला क्रमांक—९

१६०७
म. ग्रं. सं. ठाणे
विषय निबंध
सं. क्र. २१३१

# भारतीय स्त्रीधर्माचा आदर्श

अनुवादक

सा. कमल पाध्ये

REFBK-0006138

प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई
१९६७

किंमत २ रुपये

६५८८९
२२।३।८९
~~2032~~
2939

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे

प्राज्ञमाला क्रमांक – ९

# भारतीय स्त्रीधर्माचा आदर्श

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत
अनुक्रम ........ वि: ........
क्रमांक ........ नों. दि. ........

अनुवादक :

सौ. कमल पाध्ये

REFBK-0006138

प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

१९६७

प्रकाशक : म. शं. साठे, चिटणीस प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई जि. सातारा

[ महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृति मंडळ पुरस्कृत ]

मुद्रक : म. शं. साठे, मॅनेजर दी प्राज्ञ प्रेस वाई जि. सातारा

# प्रास्ताविक

[ मानवेन्द्रनाथ रॉय यांनी १९३२–३६ या कारावासाच्या कालखंडांत "एका कैद्याची दैनंदिनी" लिहिली त्याचा एक भाग हे छोटेसे पुस्तक होय. हे पुस्तक त्या दैनंदिनीचा दुसरा भाग म्हणून त्यांनी १९४१ साली प्रसिद्ध केले. त्यासंबंधी लिहितात – ]

माझ्या "कैद्यांच्या आठवणी"च्या पहिल्या भागाच्या प्रास्ताविकात जे मी लिहिले त्यापेक्षा विशेष अधिक येथे काही लिहावयाचे नाही. त्यात म्हटल्याप्रमाणे या आठवणी म्हणजे आत्मचरित्रामक लेख नव्हेत. अनेक वर्षे पर्यंत विविध विषयावर सुचलेल्या स्फुट विचारांची नोंद एवढेच त्यांचे स्वरूप आहे. कारागृहात बाहेरील घटनांच्या तुरळक बातम्या वारंवार येत त्यावरून सुचलेले हे विचार होत– या निबंधाच्या शीर्षकावरून काही वाद निर्माण होणे अपरिहार्य आहे. या निबंधात मांडलेल्या व थोडक्यात विवरिलेल्या गुंतागुंतीच्या सामाजिक व नैतिक मुद्यावर अभिनिवेशरहित शास्त्रीय चर्चा जर निर्माण झाली तर या पुस्तकाचे काम झाले असे म्हणता येईल. परंपरागत मूल्यांचे पुनर्मूल्यन करणे ही ऐतिहासिक गरज आहे. एवढेच सिद्ध करण्याचा माझा प्रयत्न आहे.

– एम्. एन्. रॉय
डेरादून जुले १९४१

ठाणे.
दि:

# भारतीय स्त्रीधर्माचा आदर्श

आपला देश मोठ्या लोकसंख्येचा आहे. या देशाच्या जननप्रमाणाने बहुधा उच्चांक गाठला असावा. अर्थात् विश्वास ठेवण्यालायक अशी आकडेवार माहिती उपलब्ध नाही. वहुतेक लोक जन्माची नोंद ठेवीत नाहीत. तरीही झपाट्याने वाढणाऱ्या लोकसंख्येमुळे फाजील जननप्रमाणाची स्पष्ट जाणीव होते. तसे पाहिले तर निव्वळ वाढती लोकसंख्या हे खऱ्या जननप्रमाणाचे निदर्शक ठरणार नाही. कारण हे उच्च जननप्रमाण त्याहीपेक्षां प्रचंड अशा बालमृत्युसंख्येच्या प्रमाणाने खाली आणले जाते. सर्वसाधारणपणे आर्थिकदृष्ट्या पुढारलेल्या देशांपेक्षा भारतातील मृत्युसंख्येचे प्रमाण अधिक आहे. आणि तरीसुद्धा येथील लोकसंख्या ज्या झपाट्याने वाढत आहे त्यावरून जननसंख्येचे प्रमाण कितीतरी विलक्षण वेगाने वाढत असले पाहिजे हे स्पष्ट होते.

लोकसंख्येचा गोंधळवून टाकणारा हा प्रश्न यामुळेच निर्माण झाला आहे. या प्रश्नाच्या मुळाशी जनतेचे दारिद्र्य आहे. जन्म व मरण यांच्या वाढत्या तुलनात्मक संख्येचे ते एक प्राथमिक कारण होय. फाजील संतती निर्माण होण्याचे मूळ जनतेच्या सांस्कृतिक मागासलेपणात सापडते. हा सांस्कृतिक मागासलेपणा जनतेच्या आर्थिक परिस्थितीत रुतलेला असतो. या आर्थिक दुरवस्थेमुळेच पन्नास टक्के मुले जन्मानंतर थोड्याच वेळात मरण पावतात. उपासमारीने आलेल्या शारीरिक दुर्बलतेमुळे हे बालमृत्यूचे प्रमाण इतके वाढलेले आहे.

सांस्कृतिक मागासलेपणाचा आणखी एक शोचनीय पुरावा म्हणजे आरोग्य व आरोग्यशास्त्र यांच्या अगदी सामान्य नियमांसंबंधीसुद्धा असलेले अज्ञान. पण हा सुद्धा पुन्हा आर्थिक कोंडीचा व ती अधिकाधिक खालावत जाणाऱ्या परिस्थितीचा परिणाम आहे. वर म्हटलेल्या कोवळ्या मुलांच्या ५० टक्के मृत्युप्रमाणाव्यतिरिक्त इतर मुलांच्या मृत्यूचे संख्यामानही भारतात फार मोठे आहे. याचे कारण मुलांना अगदी कमीत कमी पौष्टिक आहारसुद्धा पुरवण्याची पालकांची असमर्थता हे आहे. अपुरी वैद्यकीय मदत हे आणखी एक कारण आहे.

अशा भयानक वस्तुस्थितीमुळे भारतात संततिनियमन फायदेशीर होईल किंवा काय हा प्रश्न उद्भवतो. अर्थात संततिनियमनाचा उपाय, विशेषत: आधुनिक सुशिक्षित मध्यम वर्गापुरता, तात्पुरते संकट टाळण्यास उपयुक्त ठरेल हे सांगावयास नकोच;

पण ही योजना सर्वंध हिंदुस्थानभर लागू करता येणार नाही. संततिनियमन व आरोग्यदृष्ट्या तिचा अवलंब करण्याची आवश्यकता याची जाणीव होण्यासाठी शिक्षण व सुधारणा यांचा कमीतकमी तरी प्रसार व्हावयास पाहिजे. पण हिंदी स्त्रियात याचा बहुतेक अभावच दिसून येतो. बहुतेकांची प्रजोत्पादनाची क्रिया पाशवी प्रेरणेनें घडत असते. संभोग हा सवयीचा आणि कर्तव्याचाही भाग ठरतो. मुले हवी तशी निसर्गाच्या लहरीनें जन्माला येतात. पालक बेजबाबदारपणे त्यांना जन्माला घालतात, काही मृतावस्थेतच जन्मतात, तर काही जन्मल्याबरोबर किंवा थोड्याच दिवसात मरण पावतात. ही ठराविक शोकांतिका नशिबाचा खेळ म्हणून गणली जाते. नशीब किंवा परमेश्वरी इच्छा यांच्या प्रभावामुळे मुलांना जन्म देण्यासंबंधी ज्या ज्ञानाची आणि जबाबदारीची जाणीव आईबापांना आली पाहिजे तिचा संपूर्ण अभाव दिसून येतो.

ही दरिद्री समाजाची परिस्थिती. याच्या उलट श्रीमंतांना तर कृत्रिम संतति-नियमनाची आवश्यकताच नसते. या वर्गाला इतर अनेक व्यवधाने असल्याने त्यांचे जननप्रमाण न कळतच नियमित होते. कितीही मुले झाली तरी जे लोक त्यांचे पालनपोषण उत्तम करू शकतील अशा लोकांना सुद्धा सामान्यतः परिमित मुले असतात. सुसंस्कृत व आधुनिक शिक्षण घेतलेल्या सधन लोकात हे विशेषेकरून दिसून येईल. या विरोधाभासात्मक परिस्थितीस जी अनेक कारणे आहेत त्यात हे अभावतः होणारे संततिनियमन हे एक मुख्य कारण आहे. सुसंस्कृत व सुशिक्षित सधन लोकांच्या जीवनपद्धतीचा हा नकळत होणारा परिणाम होय.

ज्या मानाने देश सुसंस्कृत त्या मानाने त्याचे जननप्रमाण कमी. समाजशास्त्राचा हा अनुभवजन्य सिद्धान्त आहे. उदाहरणार्थ, फ्रान्सचे जननप्रमाण सर्वात कमी आहे. आणि इंग्लंड अमेरिकेमध्येही ते कमी होत आहे. याच्या उलट इटालीचे जननप्रमाण सर्व युरोपखंडात अधिक आहे. मुसोलिनीने तोफखान्याचे खाद्य घाऊक प्रमाणावर निर्माण करण्याची पद्धत सुरू करण्यापूर्वीपासूनच इटालियन शेतकरी स्त्री ही बहुप्रसवा म्हणून प्रसिद्ध आहे. पहिल्या महायुद्धापूर्वी बऱ्याचशा जर्मन स्त्रियांनी "गृहिणी"चे म्हणून सांगितलेले गुण अंगिकारण्याचे ठरविले तेव्हाच सैनिकांच्या पुरेशा पुरवठ्या-बाबत कैसर महाशय निर्धास्त झाले.

महायुद्धानंतर परिस्थिती बदलली. युद्धानंतर जर्मन स्त्रियांचे सामाजिक बंधविमोचन व सांस्कृतिक सुधारणा आश्चर्यकारक प्रमाणात झाली. पुरुषांच्या, विशेषतः बुद्धिजीवी व धंदेवाईक लोकांच्या दृष्टीमध्ये सुद्धा क्रांती झाली. युद्धातील असंख्य जवानांच्या बलिदानाने स्त्रियांच्या संवेदनाशक्तींना जबर धक्का बसला. आणि स्त्रियांचे मातृत्वाचे कार्य म्हणजे राजकीय खाटिकखान्याला माणसे पुरवणे

की काय असा जबरदस्त सवाल निर्माण झाला. या सामाजिक व मानसशास्त्रीय कारणांमुळे जर्मनीचे जननप्रमाण खाली आले.

जर्मन राष्ट्राची सांस्कृतिक पातळी दडपून टाकून व स्त्रियांना परत एकप्रकारच्या आधुनिक जनानखान्यात कोंबून नात्सी लष्करशाही युद्धसामुग्रीच्या उत्पादनातील हा अडथळा दूर करण्याचा शिकस्तीचा प्रयत्न करीत आहे. कदाचित् हे तात्पुरते यशस्वी होईल, कदाचित् तेवढेही होणार नाही. पण शेवटी हे धोरण निश्चितच चुकीचे ठरेल. डुकरासारखी निपज करण्याइतके जर्मन लोक पशू राहिलेले नाहीत. आर्थिक परिस्थितीची अनिश्चितता जाणण्याइतकी अक्कल मागासलेल्या जर्मन शेतकऱ्यापाशी सुद्धा असल्यामुळे जन्माला येणाऱ्या पिढीच्या कल्याणाच्या जबाबदारीची जाणीव त्यांना आहे.

आज नात्सी राजवटीत सुखाच्या नोकरीवरून हाकलपट्टी झाल्यामुळे स्त्रियांना परत स्वैपाकघराकडे वळण्यावाचून मार्ग नसला तरी कैसरच्या ऱ्हासानंतरच्या व हिटलरच्या उदयापूर्वीच्या मध्यंतरीच्या वायमर रिपब्लिकच्या काळात जर्मन स्त्रिया पुष्कळ गोष्टी शिकल्या व त्यांनी झपाट्याने प्रगती केली. या महत्त्वाच्या काळातला बहुमोल अनुभव सहजासहजी पुसून टाकणे कठीण आहे. म्हणूनच त्यांना स्वैपाकघरात कायमचे डांबून टाकणे आणि घराचे रूपांतर मुलांच्या कारखान्यात करून चूल आणि मूल याचीच फिकीर करीत रहाण्याची त्यांच्याकडून अपेक्षा करणे चूक आहे.

दारिद्र्य आणि अडाणीपणा यामुळे रशियन क्रांतीपूर्वी रशियन आई हेही एक प्रकरणच होते. आणि अजूनही रशियन शेतकऱ्यांची प्रजोत्पादनाबद्दल तशीच भावना आहे. जनतेची मनोवृत्ती, विशेषतः क्रांतीत प्रत्यक्ष भाग न घेतलेल्या जनतेची मनोवृत्ती एका पिढीत बदलणे शक्य नाही. पण अतिशय तीव्र अशा सामाजिक-राजकीय वातावरणामुळे आणि शीघ्र अशा सांस्कृतिक सुधारणेमुळे क्रांतीनंतरच्या काळात शहरातील जननप्रमाण कमी झाले. भविष्यकाळात समाजवादी अर्थव्यवस्थेमुळे जसजशी सांस्कृतिक प्रगती होत जाईल तसतसे रशियाचे जननप्रमाण खात्रीने खाली येईल. या नवीन क्रांतिकारक सामाजिक परिस्थितीत लोकसंख्येच्या माल्थसप्रणीत सिद्धांतात बदल करावा लागेल. आणि जरी या सांस्कृतिक क्रांतीने जननप्रमाण खाली आले नाही तरी या सिद्धांताच्या कक्षेतही, आर्थिक बंधनांच्या अभावामुळे जननप्रमाण घटेलच. अर्थात ही परिस्थिती व मनुष्यप्राणी पशूंसारखी प्रजोत्पत्ती करीत होता तेव्हाची क्रांतिपूर्व परिस्थिती यात आमूलाग्र फरक रहाणार. सुधारलेले लोक तारतम्याने वागणारच. आणि जननप्रमाण वाढले तरी, स्त्रीपुरुषांच्या प्रेमावर आधारलेले भावनात्मक जीवन, स्वतंत्र व विकसित होत असताना, ज्या उच्च आकांक्षा निर्माण होतील त्या जननप्रवृत्तीला बाधक ठरतील. मनुष्यप्राणी व पशू यांच्या वैपयिक

विकारात फरक असल्याने मानवाचा वैषयिक मनोविकार भावनांच्या सुंदर छटांच्या विविधतेतून व्यक्त होतो, व निव्वळ पोराला जन्म देणे या जीवशास्त्राच्या क्रियेपेक्षा उच्च पातळीवर राहतो.

भारताच्या चालू सांस्कृतिक प्रगतीच्या दृष्टीने पहाता संततिनियमनाचा प्रश्न फक्त आधुनिक सुशिक्षित मध्यम वर्गापुरताच मर्यादित रहातो. म्हणून लोकसंख्येच्या प्रमाणावर त्याचा फारसा परिणाम होत नाही. राजकीय-सामाजिक परिस्थितीमुळे निर्माण झालेल्या अडचणींपैकी काही अडचणी कमी करण्यास त्याची खात्रीनेच मदत होईल. उदाहरणार्थ बेकारी. बेकारीची खरी धास्ती मध्यमवर्गीय तरुणांना खरोखरच भेडसावीत असते. आणि यावर सुचविण्यात येत असलेला कुठचाही तोडगा प्रत्यक्ष अमलात आणला गेला तरी हे संकट निवारण होणार नाही. मध्यमवर्गाची ही अवस्था म्हणजे खरोखर कनिष्ठवर्गाच्या मूर्तिमंत दारिद्रयाचे प्रतिबिंबच होय. कनिष्ठवर्गाच्या दारिद्रयाच्या धोकेबाज आधारावर उभारलेल्या "वैभवात" मध्यमवर्ग सहभागी होऊ शकणार नाही. हा प्रश्न देशाचा सर्वसाधारण आर्थिक विकास झटपट घडवून आणण्यानेच सुटेल. त्यासाठी मोठ्या प्रमाणावर जलद औद्योगीकरण करावे लागेल. पण हे औद्योगीकरण भांडवलशाही उत्पादनपद्धतीने जखडलेले असता कामा नये. याचा अर्थ, फक्त औपचारिक राष्ट्रीय स्वातंत्र्य नव्हे तर खरेखुरे लोकसत्ताक राज्य निर्माण केले पाहिजे.

दरम्यान मध्यमवर्गावरचे संकट वाढेल. म्हणजेच हिंदी समाजाला पुन्हा टवटवी आणण्यासाठी जी राजकीय क्रांती झाली पाहिजे त्यात महत्त्वाचा वाटा उचलणाऱ्या या महत्त्वाच्या अंगाची शारीरिक शक्ती व मानसिक उत्साह खच्ची होईल.

असंख्य तरुणांची शाळेत शिकत असतानाच लग्ने होतात आणि विश्वविद्यालयीन शिक्षण संपते न संपते तोच म्हणजे नोकरी करण्यास समर्थ होण्यापूर्वीच त्यांना मुले होतात. अशा रीतीने स्वतःच्याच सांसारिक व्यापात गुरफटलेल्या लोकांपासून सार्वजनिक बुद्धीची अपेक्षा तरी कशी करणार? आणि या सांसारिक भाराने वाकलेल्या लोकांना दुसऱ्यांबद्दल विचार करण्यास वेळ तरी कुठून मिळणार? बेकारीमुळे सुशिक्षित तरुणवर्गात असमाधान माजेल. त्यातील काहीजण जिवावर उदार होऊन काहीतरी विलक्षण करण्यास प्रवृत्तही होतील. पण सर्वसामान्यपणे बेकारीमुळे तरुणवर्गाचा मनोभंग व नैतिक अधःपातच होईल. दैनंदिन जीवनाच्या काळजीने व्यग्र असलेल्या या लोकांना व्यापक दृष्टी येणार नाही. ते सार्वजनिक प्रश्नांबद्दल उदासीन रहाणार आणि साहजिकच या प्रश्नांचा दूरदृष्टीने विचार करण्याकडे त्यांचा कल नसणार.

अर्थातच संततिनियमनाने दैनंदिन प्रश्न तात्काळ सुटतील असे नाही. पण मानसिक दृष्टचा त्याचा फार उपयोग होईल. आणि परिणामी तरुणवर्गाचा अध:पात आणि शारीरिक ऱ्हास टळेल. निराळ्या शब्दात बोलायचे म्हणजे जरी संततिनियमनाला आर्थिकदृष्टचा तात्कालिक महत्त्व नसले तरी सामाजिक जीवनाच्या इतर अंगांना त्याचा स्पर्श होईल. सामाजिक व कौटुंबिक परंपरेने निर्माण केलेल्या अडचणींतून त्यांची मुक्तता होईल. त्यामुळे तरुण आपल्या परिसरापलीकडील जगाकडे पाहू शकतील आणि परिस्थितीचा व्यापक विचार करू शकतील. मग, आपले वैयक्तिक प्रश्न हे सार्वजनिक प्रश्नांचे एक रूप आहे याचा त्यांना प्रत्यय येईल. आचारस्वातंत्र्य लाभेल. आणि याचा परिणाम म्हणून सामाजिक पुनरुज्जीवनाच्या शक्ती एकवटण्यास चालना मिळेल.

तरुण पिढीला, देशातील आर्थिक परिस्थितीमुळे डोईजड झालेल्या संसाराच्या जबाबदारीत संततिनियमनामुळे थोडासा दिलासा मिळेल. तरूण लग्ने करतात व पर्यायाने मुले जन्मतात. अशी डोईजड परिस्थिती निर्माण होण्यात त्यांचा जरी दोष नसला तरी ही परिस्थिती टाळणे जर शक्य असेल तर ती टाळू का नये ? ज्या मुलांचे व्यवस्थित पालनपोषण होणार नाही, ज्यांना जीवनातील अडचणींना योग्य रीतीने तोंड देण्यास समर्थ करणे शक्य नाही; येवढेच काय पण ज्याची योग्य शारीरिक वाढ होण्यासाठी आवश्यक असलेल्या माफक गोष्टींचीही तरतूद होण्याची जेथे खात्री नाही त्यांना, केवळ पितृसत्ताकपद्धतीच्या रूढीमुळे आपली विषयवासना शमविण्याचे साधन उपलब्ध झाले म्हणून जन्माला का घालावे ? संततिनियमनाव्यतिरिक्त दुसरा उपाय म्हणजे लग्न न करणे. आणि या देशात ब्रह्मचर्य हा मोठा गुणही समजला जातो. पण सामान्यपणे ब्रह्मचर्य पाळणे जमत नसल्यामुळे ते पाळले जात नाही.

विवाहसंस्था ही मुख्यत: शरीरधर्माच्या मूलभूत रास्त गरजेवर आधारली आहे असे म्हणावयास हरकत नाही. स्त्रीपुरुष निसर्गधर्मानेच एकमेकांकडे आकर्षित होतात. त्यांचा संबंध नैसर्गिकच होय. तेव्हा ब्रह्मचर्य म्हणजे या नैसर्गिक प्रवृत्तींवर जुलूमच होय. आणि समजा जर लोकांनी विवाह केला नाही तर काय होईल ? बेकायदेशीर व अनैतिक गणला जाणारा स्वैर संभोग सुरू होईल.

एकादा मनुष्य मानवनिर्मित विवाहाची बंधने झिडकारू शकेल पण नैसर्गिक प्रवृत्ती त्याला मानावीच लागेल. काहीजण ब्रह्मचर्य पाळू शकतीलही. पण बहुसंख्य लोकांना ते जमणार नाही. म्हणूनच नैतिक दृष्टी बाजूला ठेवून विचार केला तरी या अपवादात्मक उपायामुळे अनेक बेकायदेशीर मुलांना जन्म मिळून त्यांचा एक नवीनच प्रश्न निर्माण होईल. या जबरदस्त प्रश्नावर प्रचंड गुप्त भ्रूणहत्या किंवा

संततिनियमन हे दोनच पर्याय आहेत. नीती व माणुसकी यांच्या दृष्टीने पहिल्यापेक्षा दुसरा पर्याय जास्त चांगला आहे यावद्दल कुणीही शहाणा मनुष्य वाद घालणार नाही. म्हणजे डोईजड झालेल्या संसाराच्या जबाबदारीवर दिलासा ठरलेला संततिनियमनाचा उपाय 'अनैसर्गिक व अनैतिक' म्हणून झिडकारून दुसरा उपाय शोधला, तरी शेवटी आपण नेमक्या त्याच उपायाकडे येतो. विवाह न करण्याच्या समस्येतून निर्माण झालेल्या कठीण सामाजिक परिस्थितीतून मार्ग काढण्याच्या प्रयत्नात आपण अखेरीस कमी वाईट असलेल्या संततिनियमनाच्याच पर्यायाकडे येतो.

तेव्हा लोकांनी विवाह न करणे हे व्यवहार्य ठरणार नाही. शिवाय हिंदू समाजाच्या सामाजिक रीतिरिवाजामध्येही ते वसत नाही. लग्न करणे व औरस संतति निर्माण करणे हे हिंदूंचे एक धार्मिक कृत्य समजले गेले आहे. म्हणून जे कोणी नैतिक व धार्मिक मुद्यावर संततिनियमनाला विरोध करतात त्यांना विवाह टाळण्याच्या उपायाचा पुरस्कार करता येणार नाही. ब्रह्मचर्यव्रत घेतलेल्या काही थोड्या व्यक्तींचा अपवाद सोडून बाकी सर्वांना लग्नाचा मार्ग स्वीकारलाच पाहिजे. बहुसंख्य लोकांनी लग्न करण्याचे नाकारले तर असंख्य स्त्रिया लग्नाशिवाय राहतील, आणि जी परिस्थिती निर्माण होईल ती आपल्या सामाजिक रीतिरिवाजाला किंवा धार्मिक परंपरेला मानवणार नाही. हिंदुधर्मात स्त्रीवर जर विवाहाची सक्ती असेल तर पुरुषालाही त्या बाबतीत स्वातंत्र्य रहाणार नाही. या कचाट्यातून सुटण्यास बहुपत्नीत्वाचा उपायही शक्य नाही. कारण बहुसंख्य लोकांना आर्थिकदृष्ट्या ते झेपणार नाही. स्त्रियांनी लग्नाशिवाय रहाणे हे दुर्भाग्याचे लक्षण आहे या गैरसमजाला जर हिंदुसमाज चिकटून रहाणार असेल तर बहुतेक सर्व पुरुषांना लग्न करावेच लागेल. म्हणजे संततिनियमन टाळण्यासाठी गृहीत धरलेला लग्ने न करण्याचा उपाय वाद ठरतो; आणि बहुसंख्य मुलांचा बोचणारा प्रश्न सोडविण्यास निरुपयोगी व टाकाऊ ठरतो.

आर्थिक दुरवस्थेने पिडलेल्या मध्यम वर्गाला संततिनियमन ही एक आर्थिक गरज झालेली असल्यामुळे जास्त विचारी, धीरगंभीर स्त्रीपुरुष त्याचे पुरस्कर्ते बनले आहेत. आपण आपल्या मुलांना आपल्या आर्थिक असहायतेमुळे योग्य रीतीने वाढवू शकणार नाही याची जाणीव असल्यामुळे ते ती बिकट जबाबदारी स्वीकारण्यास नाखूप आहेत. शिवाय लग्नानंतर लवकरच पितृत्वाची जबाबदारी पत्करून आपल्या वैवाहिक जीवनातले स्वातंत्र्य गमावण्याचीही त्यांची इच्छा नाही. मातृ-पितृत्वाने ओढवणाऱ्या काळज्यांपासून मुक्त असे परस्परप्रेमाचे आयुष्य काही काळ जगण्याची त्यांची इच्छा आहे. या काळात इतरांविषयींच्या कर्तव्यापेक्षा स्वतःसंबंधीच्या कर्तव्याला

अग्रहक्क असावा असे त्यांना वाटते. या वृत्तीत मुळीच स्वार्थ नाही तर उलट ते सामाजिक जबाबदारीच्या जाणिवेचेच द्योतक आहे.

सामान्यतः फारच थोडे तरुण ब्रह्मचर्याच्या मार्गाने जातात किंवा तरुणी आजन्म कौमार्याच्या संशयास्पद मार्गाला चिकटून राहतात. तेव्हा औरस अगर अनौरस संततीचा पेच सोडवण्यास संततिनियमन हा एकच मार्ग आहे. म्हणून विरोधाला तोंड देण्याचे धैर्य असणारे लोकच संततिनियमनाचा पुरस्कार करीत आहेत, आणि त्याचा प्रचार होत आहे. हिंदुस्तानच्या धार्मिक रीतिरिवाजांच्या रक्षणासाठी आणि त्याच्या नैतिक जाणिवा जागृत ठेवण्यासाठी आपला अवतार झाला आहे असे समजणारे शिष्ट, तरुणांच्या या 'विपरीत' वागण्याने हतबुद्ध व शरमिंधे झाले आहेत. पण दुसरा कुठला मार्ग ते दाखवतात ? आपल्या संततीचे पोषण करणे अशक्य आहे याची पूर्ण जाणीव असतानाही लोकांनी मुले जन्माला घालणे हे त्यांचे धार्मिक कर्तव्य आहे असे हे शिष्ट सांगू शकतात काय ? अशा हास्यास्पद घोषणा करून वडील माणसे तरुणांना मार्गदर्शक होण्याचा आपला हक्क स्वतःच हिरावून घेत आहेत. नीतिनियमांच्या शब्दा-बडंबराने व हिंदू तत्त्वांबद्दल तीच तीच शिळी टीका करण्याने ते आधीच माजलेल्या गोंधळात भर टाकीत आहेत. ज्यावेळी समाजाच्या एक महत्त्वाच्या घटकापुढे संतति-नियमन करावे की नाही हा जीवनमरणाइतका महत्त्वाचा प्रश्न उभा आहे त्यावेळी या शाब्दिक युक्तिवादाचा काही उपयोग नाही. या प्रश्नाचे उत्तर स्पष्ट दिले पाहिजे. हा प्रश्न आता अर्जविनंत्यांच्या पलीकडे गेला आहे. नको असलेल्या मुलांना जन्म द्या असे सांगणाऱ्या लोकांना स्वतःच्या जबाबदारीची पूर्ण जाणीव आहे अशी ग्वाही देणे शक्य नाही. उलट सत्याला तोंड देण्याची हिंमत त्यांच्यात नाही असेच म्हणावे लागेल. वडीलधाऱ्यांनी असे तोंडघशी पाडल्यावर या आणीबाणीच्या प्रसंगी तरुणांनी स्वतःचा मार्ग स्वतःच शोधून काढला पाहिजे.

◆ ◆ ◆

मार्गारेट संगर यांनी महात्मा गांधींची मुलाखत घेऊन संततिनियमनाच्या प्रश्नावर त्यांच्याशी दीर्घ चर्चा केल्याचे परवाच वाचले. तेव्हापासून वर्तमानपत्रात या विषयावर वादविवाद प्रसिद्ध होत आहे. विरोधी मुद्दे सर्वांना माहीतच आहेत. पण लक्षात घेण्यासारखी गोष्ट म्हणजे महात्मा गांधींना संततिनियमन मान्य नाही असे नव्हे तर त्याची साधने मान्य नाहीत. त्यांच्या मते जर मुले नको असतील तर लग्न झालेल्या लोकांनी संभोग टाळावा, म्हणजे ब्रह्मचर्य पाळावे. पण त्यांनी सुचवलेल्या या विवाहोत्तर ब्रह्मचर्यातून केवळ गोंधळच निर्माण होईल याकडे त्यांनी दुर्लक्ष केले आहे. हाडामासांच्या सामान्य गोळ्याकडून ही संततिनियमनाची नवी तऱ्हा अमलात आणणे निसर्गदृष्ट्या केवळ अशक्य आहे हे ते मान्यच करीत नाहीत.

संभोग टाळावयाचा तर मग लग्नच कशाला करावयाचे हा प्रश्न उद्भवतो. सर्व जनतेने ब्रह्मचर्य पाळावे असे महात्मा का सांगत नाही ? प्रत्येक घराचा मठ बनवा असा विलक्षण आदेश देण्यापेक्षा तरुण स्त्रीपुरुषांनी जोगी-जोगीण बनावे असा उपदेश का करू नये ? या प्रश्नाचे उत्तरही कठीण नाही. हिंदुलोकात विवाह हे एक धार्मिक कर्तव्य मानले जाते. पण यात एक विसंगती निर्माण होते. कारण जन्म देणे हेही एक धार्मिक कर्तव्यच मानले आहे. हिंदुधर्माप्रमाणे मुले होणे हेच विवाहाचे उद्दिष्ट आहे. वांझोटा विवाह हे एक दुर्दैव मानले जाते. आणि स्त्री जर वांझोटी असेल तर पतीला दुसरे लग्न करण्याची मुभा असते. तेव्हा धर्मग्रंथाचा नियम काटेकोर रीतीने पाळावयाचा असेल तर गांधींनी सांगितलेला हा मार्गसुद्धा अमलात आणता येणार नाही. कारण तो धर्मग्रंथांचे नियम व सामाजिक रूढी झुगारणारा आहे. आणि तरीही गांधीं बरोबर याच भूमिकेवरून त्याचे समर्थन करीत आहेत. या वादविवादात दोन प्रश्न सामावले आहेत. एक म्हणजे संभोग, तो मूल जन्मण्यासाठी केला गेला नसेल तर तो पापी ठरतो काय ? मुलांना जन्म देण्याव्यतिरिक्त त्याची शारीरिक व भावनात्मकदृष्ट्या गरज नसते का ? मानवाची उच्च प्रगती (वैचारिक व भावनात्मक प्रगती) होण्यास त्यापासून काही अपाय होईल का ? दुसरा प्रश्न हिंदू समाजातील स्त्रियांच्या स्थानाबद्दल आहे.

विषयी नवऱ्यांना दूर ठेवा असा आदेश गांधी स्त्रियांना देतात. यात स्त्रियांची स्तुती आहे असे वरवर दिसले तरी त्यामुळे फार थोड्या स्त्रिया फसतील . स्त्रीपुरुष आकर्षण हे परस्परांवर अवलंबून असते. ज्याप्रमाणे पुरुष हे पशू नाहीत त्याप्रमाणे स्त्रियाही देवता नाहीत. त्यांना असा आदेश देण्यापूर्वी खरोखरच त्यांना आपल्या पतीला दूर ठेवावयाचे आहे काय याची चवकशी करावयास पाहिजे. स्त्रियांना असे काही नको आहे हे त्यातले सत्य आहे. या एकाच गोष्टीवरून हे सिद्ध होते की, हा नीतिवेत्ता आपल्याला स्त्रीमनाबद्दल जास्तीत जास्त कळत असल्याचा दावा करीत असला तरी आपण काय बोलतो आहोत हे खरोखर त्याचे त्यालाच कळत नाही. महात्म्याचा हा दावा मोठा विलक्षणच ! शिवाय गांधींची ही शिकवण स्त्रिया स्वतंत्र आहेत असे धरून चालते. खरोखर त्या तशा आहेत काय ? त्या पतीला दूर ठेवू शकतात काय ? आणि त्याला तसे दूर ठेवणे हिंदू धर्माला सम्मत आहे काय ? संभोगाच्या प्रश्नाकडे पहाण्याच्या गांधींच्या या दृष्टिकोनात स्त्रीपुरुषांच्या परस्परसंमतीला महत्त्वच नाही. आपल्या तऱ्हेवाईक हटवादी नीतिकल्पनांमुळे ते या प्रश्नाकडे केवळ त्यांच्या धार्मिक व नैतिक दृष्टिकोनातून पहातात. आणि म्हणून धर्माने व परंपरेने ठरवून दिलेल्या स्त्रियांच्या समाजातील स्थानाविरुद्ध काहीतरी करण्याची शिकवण ते त्यांना देत आहेत.

\ हिंदू समाजातील स्त्रियांचे विशिष्ट स्थान सोडा पण हिंदुस्तानापेक्षा जेथे स्त्रियांना कितीतरी अधिक हक्क आहेत अशा आधुनिक राष्ट्रात सुद्धा पतीला प्रतिकार हा घटस्फोटाचे कायदेशीर कारण म्हणून मान्य झालेला आहे. हा प्रतिकार वैवाहिक कराराचे उल्लंघन ठरतो. अर्थात ( हिंदू विवाहसंस्थेच्या अलौकिकतेबद्दल आपण पुष्कळ ऐकतो. विवाह हा नुसता करार नव्हे तर एक धार्मिक संस्कार आहे असे सांगण्यात येते. हे जर मान्य केले तर त्याची बंधने स्त्रियांवरच जास्त पडतात. हा करार संबंधित व्यक्तींच्या अनुमतीने केलेला नसतो. स्त्रीचा त्यात शुद्ध बळी दिलेला असतो. या संस्कारांमुळे तिच्यावर मालकी हक्क गाजवण्याचा अधिकार नवऱ्याला बहाल केला जातो. आणि त्यावर धर्माच्या पावित्र्याचे शिक्कामोर्तब केले जाते. हिंदु विवाह-विधीचा अगदी अर्क म्हणजे मुलीचे पालक, वराने तिचा देणगी म्हणून स्वीकार करावा अशी त्याची मनधरणी करतात आणि वराने या देणगीचा स्वीकार करावा म्हणून मुलीच्या जोडीला अनेक मौल्यवान वस्तू देण्याची लालूच त्याला दाखवतात.) यात मुलीच्या स्वाभाविक गुणांना फारसे महत्त्व नसते, हे ओघाने आलेच. तरीसुद्धा हा नजराणा, धार्मिक संकेताने व सामाजिक रूढींनी घालून दिलेली गृहिणीची कर्तव्ये मुलगी आज्ञाधारकपणे पाळील या अटींवर स्वीकारला जातो. मुलांना जन्म देणे हे त्या कर्तव्यांपैकी एक मूलभूत कर्तव्य. आणि हा स्त्रीचा धर्म पाळावयाचा असेल तर नवऱ्याला प्रतिकार करण्याची कल्पना पार सोडूनच दिली पाहिजे. नवऱ्याला नेहमी सुखी व आनंदी ठेवणे, त्याला खाऊ पिऊ घालणे, त्याची देवासारखी पूजा करणे, येवढेच काय पण 'असे पती देवची ललनांना' म्हणून त्याच्या पूर्णपणे आधीन होणे हाच हिंदू स्त्रीचा परमार्थ गणला गेला आहे. असे हे पतिदेव कामांध होऊन हेकट बनत असले तर बायका काय करणार? त्यांच्या आवडीनिवडीचा प्रश्नच येत नाही. प्रेम हे हिंदू स्त्रीधर्माच्या उच्च तत्त्वात बसत नाही. स्त्रीचे पतीवर प्रेम असो अगर नसो, त्याची सेवा करणे व त्याला सुखी ठेवणे हे तिचे धार्मिक कर्तव्य म्हणून तिला बंधनकारक आहे. याहून वाईट म्हणजे पतीचे तिच्यावर प्रेम असो वा नसो त्याचा संभोगाचा हक्क मान्य झालाच पाहिजे.

संभोगाचे नियमन करण्याच्या गांधीच्या ह्या अव्यवहार्य सिद्धांतामुळे आणि त्यांच्या हटवादी नैतिक कल्पनांमुळे त्यांना विरोध करण्यास उद्युक्त झालेला एक बंडखोर तरुण म्हणतो, " जग बदलण्यासाठी प्रत्येकाने नैतिक बनले पाहिजे असे तुम्हाला वाटते. तुम्ही नैतिकता विषयापुरती मर्यादित मानता की ती सर्व मानवाचा आचार व्यापून असते असे मानता, हेच आम्हाला कळत नाही. आम्हाला असे वाटते की विषयापुरतीच ती तुम्ही मर्यादित मानता, कारण कामकरी आणि शेतकरी लोकांच्या जिवावर भरमसाट फायदा उकळणारे तुमचे भांडवलदार व जमीनदार मित्र जो

अन्याय आणि जे नुकसान करीत आहेत ते तुम्ही त्यांना दाखवून देत नाही. पण तरुण स्त्रीपुरुषांवर त्यांच्या वैषयिक नीतिभ्रष्टतेवर येता जाता खरमरीत टीका करताना आणि ब्रह्मचर्यधर्माचे ध्येय त्यांच्यापुढे ठेवताना तुम्हाला कधी कंटाळा येत नाही. आपल्या कर्मठ नीतिकल्पनांनी तरुणांना न जोखता तुम्ही थोडे सहानुभूतीने व दयाळू अंतःकरणाने त्यांच्याकडे पाहा अशी माझी तुम्हाला नम्र विनंती आहे. परस्परप्रेमाने आणि संमतीने केलेलें कुठचेही कार्य हे नैतिकच आहे. मग ते विवाहान्तर्गत असो की, विवाहबाह्य असो. मी येथे आपल्याला येवढेच सांगू इच्छितो की आजच्या तरुणाचा न्याय देताना आपण आपलें तरुणपण विसरू नका. मला तर असे वाटते की तुमच्या काळी तुम्ही लोक लाडावून ठेवलेलें होता, व फार कामांध होता. त्यामुळेच ही विषयाची घृणा तुमच्यात निर्माण झाली आहे, आणि त्यामुळेच हे साधूपण आले आहे. तुमच्याशी तुलना करता खरोखरच आजचे बरेच तरुण लोक जास्त नैतिक आहेत. ”

“ हरिजन ” मध्ये प्रसिद्ध झालेल्या एका पत्रातील हा उतारा आहे. लेखकाचे नाव दिलेलें नाही. पण पत्राचा “ नमुनेदार ” म्हणून उल्लेख आहे. बहुधा अशी बरीच पत्रे आली असावीत. ते काहीही असलें तरी गांधींच्या नैतिक तत्त्वांवर ही एक गंभीर स्वरूपाची टीका होती. पण आपल्या उत्तरात त्यांनी त्यांच्या मूलभूत सामाजिक प्रश्नावरील दृष्टिकोनासंबंधी ज्या साक्षात् उद्भवणाऱ्या शंका लेखकाने मांडल्या होत्या त्यांची दखलही न घेता आध्यात्मिक नीतिशास्त्रावरच प्रवचन झोडलें आहे. ते म्हणतात, “नीतिशास्त्र आणि धर्म या परस्परपोषक संज्ञा आहेत. धर्माच्या आधाराशिवाय नैतिक जीवन हे पत्त्याच्या बंगल्याप्रमाणे आहे. नैतिकतेत सत्य, अहिंसा व संयमन यांचा समावेश होतो. सत्यापासून अहिंसा व संयमन निर्माण होतात व त्यांनाच मी ईश्वर मानतो. संयमनाशिवाय स्त्रीपुरुषांचा निकालच लागेल. इंद्रियांवर ताबा नसणे म्हणजे सुकाणूशिवाय गलबतातून प्रवास करणे होय. वाटेत येणाऱ्या पहिल्याच खडकावर आपटून फुटून या गलबताचे तुकडे तुकडे झाल्याशिवाय रहाणार नाहीत. विवाहान्तर्गत किंवा विवाहबाह्य संभोग, परस्परसंमतीने केला असल्यास जर नैतिक ठरत असेल तर त्याच कारणपरंपरेने दोन समान लिंगी व्यक्तीतील संभोगही नैतिक ठरतो. आणि मग वैषयिक नीतिमत्तेचा पायाच उखडून पडतो. संभोग हा जीवनाच्या बहुमोल कल्पनेशी निश्चितपणे निगडित असेल तोवर सभ्य, सुसंस्कृत आयुष्य जगण्याची आशा आहे. येथे विकृत वैषयिकतेला तर वाव नाहीच. पण अनैसर्गिक संभोगाच्या पुरस्कारालाच काय पण अप्रतिकारालाही वाव नाही. ”

नीतिमत्तेला धर्माचा आधार देणे हे काही फारसे नवीन तत्त्व नाही. मनुष्य हा मूलतः अनैतिक प्राणी आहे हे गृहीततत्त्व या तर्कदुष्ट युक्तिवादाच्या मुळाशी आहे. या तत्त्वज्ञानात व ख्रिश्चन धर्माच्या ‘ मूळपापा ’च्या हटवादी विचारात काहीच

फरक नाही. मनुष्य हा स्वभावतःच अनैतिक किंवा पापी असतो असे मानणे हे आत्म्याच्या कल्पनेशी विसंगत आहे. सद्वर्तनी आणि सद्गुणी बनण्यासाठी जर मानवावर जबरदस्ती करावी लागणार असेल तर त्या गुणांची किंमत मुळातच कमी होईल. जबरदस्तीच्या किंवा नीतीच्या दडपणाखालीच मनुष्य चांगला वागेल असे मानणे हा मानवी बुद्धीचा अपमान आहे. अध्यात्मशास्त्र किंवा धर्मशास्त्र यांच्या पाठबळाची ज्या नीतिशास्त्राला गरज वाटत नाही, आणि जे स्वतःच्या पायावर उभे रहाते तेच खरे नीतिशास्त्र. स्वतःविषयी आदर बाळगणारी सभ्य व स्वतंत्र व्यक्ती ही जुन्या आस्वादवादी नीतिशास्त्राची विचारसरणीच अधिक पसंत करील. आणि आपल्या स्वतंत्र बुद्धीने सद्वर्तनी, सद्गुणी व उदार बनण्याची तिची इच्छा तिला परमेश्वर किंवा धर्मग्रंथातील शिकवण यांच्या जुलुमाविरुद्ध बंड करावयास लावील.

गांधींचे नीतिशास्त्र हे हटवादी कल्पनांचे गाठोडे आहे हे कबूल करावे लागेल. नीतिमान होण्यासाठी प्रत्येकाने सत्यवादी असलेच पाहिजे म्हणजे एका अमूर्त कल्पनेला दुसऱ्या अमूर्त कल्पनेचा आधार! सत्याची कसोटी स्पष्ट सांगितल्याशिवाय या प्रकारच्या नीतिमत्तेच्या महत्त्वाचा अर्थच कळत नाही. सद्गुणी जीवनाला जर संयमन आवश्यक असेल तर परमेश्वराने आपल्या सर्वांना ( aphrodites ) रति–मदन का केले नाही ? तसे असते म्हणजे संयमन ही एक सहजप्रवृत्ती झाली असती; आणि जग ही एक सद्गुणी व दैवी लोकांचीच वसाहत झाली असती. पण असे दिसते की ब्रह्मदेवाच्या सौंदर्यदृष्टीने या असल्या राक्षसी कल्पनेविरुद्ध बंड केले असावे, आणि पापप्रवृत्ती मानवी स्वभावात अंतर्भूत करण्याचे पसंत केले असावे. म्हणून संयमनाशिवाय स्त्रीपुरुषांचा निकालच लागेल असे म्हणणे खरोखर धाष्ट्र्याचे आणि भ्रष्टबुद्धीचे लक्षण आहे.

अशा रीतीने गांधींची नीतितत्त्वे त्या तत्त्वांच्याच तर्कदुष्ट युक्तिवादाने उघडी पाडली आहेत. प्रत्यक्ष अनुभवावरून पाहिले तर ही विचारसरणी जास्तच अमानुष वाटते. युरोपमधील उच्च वर्णीय स्त्रीपुरुषांची बौद्धिक पातळी किंवा नीतिमत्ता हिंदी लोकांपेक्षा वाईट आहे काय ? शिवाय हिंदी लोक सुद्धा संयमन पाळीत नाहीत याबद्दल गांधी खेद व्यक्त करीत आहेतच. म्हणजे मग जे ध्येय गाठणे शक्य नाही– शरीरशास्त्राने ज्याच्यावर अशक्य असा शिक्का मारला आहे– त्याच ध्येयाची तुम्ही शिकवण देत आहात. या ध्येयापेक्षा अधिक व्यावहारिक कार्यांची निकड असताना आणि अधिक निश्चित स्वरूपाच्या ध्येयांसाठी झगडण्याची आवश्यकता असताना लोकांवर कंटाळवाणी प्रवचने आणि ग्रंथपारायणे लादणे म्हणजे कालाचा अपव्यय आहे. खरे म्हणजे या प्रवचनांची आवश्यकताच नाही. येथे स्वैर वैषयिक जीवनाची शिकवण कोण देत आहे? आवश्यक संयमन हे जीवनातच अंतर्भूत असते. फक्त

दुसऱ्याच्या जिवावर चैन करणारे लाडावलेले लोकच व्यसनी बनतात. त्यांना हा थोर नीतिवादी धमकावीत नाही हे वर उद्धृत केलेल्या पत्रलेखकाने अगदी समर्पक दाखवून दिले आहे.

अशी निर्णायक वचने घालून देण्यापूर्वी या प्रेपिताने या विषयाचा नीट अभ्यास करणे जरूर होते. समलिंगी वैषयिकता हिंदी तरुणात प्रचलित आहे. ही काही सहज-प्रवृत्ती नव्हे. मग याचे कारण काय ? ती कारणे सामाजिक व मानसिक आहेत. ही प्रवृत्ती वाढत्या मुलांच्या विषयविकारांचे दमन आणि त्यांचे सहज व सरळ पणाने शमन होण्याच्या मार्गातील आर्थिक अडचणी यामुळे ती निर्माण झाली आहे. या अडचणी दूर करा म्हणजे ही प्रवृत्ती बऱ्याच अंशाने नाहीशी होईल. नुसता नीतीचा उपदेश करून फारसा परिणाम होणार नाही.

स्त्रीपुरुषांच्या वैषयिक संबंधातील नीतिमत्तेचा आधार नाहीतरी शेवटी परस्पर समती किंवा परस्पर अनुरागाव्यतिरिक्त कशावर अवलंबून असतो ? या संबंधात धर्म कसा विक्षिप्त ठरतो हे या धर्मोपदेशकांच्या ध्यानातच येत नाही. कारण धार्मिक विवाहपद्धती बलात्काराला मान्यता देते. पुरुषांच्या वैषयिक समाधानासाठी स्त्रियांच्या संमतीची किंवा प्रेमाची दखल घेण्याची आवश्यकताच तिला वाटत नाही आणि या क्रूरतेला कायद्याचीच नव्हे तर धर्माचीही मान्यता मिळते. हे काय नीतिमत्तेचे लक्षण आहे ? आणि संभोगाची मूलभूत नैसर्गिक भावना फक्त मुलांना जन्म देण्या-साठी म्हणून मान्य केली जाते तेव्हा तिचे खरोखर विकृत उपयुक्ततावादात रूपांतर केले जाते. हा विकृत उपयुक्ततावाद हे विसरतो की शास्त्रीय दृष्टचा जन्म देण्याच्या क्रियेला संभोगाची गरज असतेच असे नाही. संभोगाशिवाय जन्म देणारे काही प्राणी असतात. शरीरशास्त्राच्या उत्क्रांतीच्या एका विशिष्ट अवस्थेत जन्म देण्याची क्रिया पेशींच्या विभाजनातून घडत असे. मानवी जीवनात उदात्त स्वरूप धारण करणाऱ्या भावनेचा पाया असलेले लैंगिक आकर्षण ही त्यानंतरची अवस्था. जननक्रिया ही या उदात्त भावनेचा आनुषंगिक परिणाम होय. लवकरच जननाची क्रिया मानवाच्या सुंदर भावनामय लैंगिक जीवनापासून अलग होण्याचा संभव आहे. कृत्रिम जीवोत्पत्ती शक्य आहे ही उपपत्ती आता मान्य झालीच आहे. कालांतराने ती प्रत्यक्षातही उतरेल. अशा परिस्थितीत गर्भधारणेचे कष्टमय ओझे स्त्रियांनी एक धार्मिक व सामाजिक कर्तव्य म्हणून वहावे काय ? हे शास्त्र प्रगत होऊन स्त्रीचे स्वातंत्र्य त्यामुळे सिद्ध होईपर्यंतच्या मध्यंतरीच्या काळात तिला नको असलेल्या मुलांना जन्म देण्याची सक्ती तिच्यावर करणे योग्य नाही.

जरी कृत्रिम जनन प्रत्यक्षात उतरले तरी लिंगभेद राहणारच. स्त्रीपुरुष एकमेकांवर अनुरक्त होत राहणारच, आणि प्रेमाची भावना त्यांचे आयुष्य समृद्ध

करीत राहीलच. प्रेमाच्या भावनेचा आविष्कार म्हणून झालेला संभोग हा गांधींच्या "बहुमोल आयुष्याच्या कल्पने"पासून वेगळा असेल. अर्थात गांधींच्या विचारसरणी-नुसार अशा परिस्थितीत "सभ्य जीवनाची" आशा नष्ट होईल. मग हे अरिष्ट आपण कसे टाळणार ? नीतिउपदेशकाची निरर्थक प्रवचने शास्त्रीय ज्ञानाच्या गतीचा वेग थांबवू शकणार नाहीत, आणि जननक्रिया ही संभोगावर अवलंबून रहाणार नसेल तेव्हा जननशून्य संभोगाच्या पापापासून स्त्रीपुरुषांचे रक्षण करण्यासाठी आपण सर्व पुरुषांचे खच्चीकरण किंवा सर्व स्त्रियांना वांझ करणार आहोत काय ?

संभोग हे अनैसर्गिक पाप आहे असा त्याचा अधिक्षेप करणे म्हणजे शुद्ध चावटपणा आहे. त्याचप्रमाणे असा एक गमतीदार प्रश्न विचारता येईल की नैसर्गिक पापकर्मे म्हणजे तरी काय ? लैंगिक मनोविकार ही नैसर्गिक प्रवृत्ती आहे. धार्मिक दृष्टीने बोलायचे झाले तर कोणतीही नैसर्गिक प्रवृत्ती दाबून टाकणे हे अनैस-र्गिक व पापमय होय, कारण त्यामुळे ईश्वरनिर्मित व्यवस्थेवर आघात करण्यासारखे होते. मुलाना जन्म देण्याव्यतिरिक्त संभोग करणे ईश्वराला मान्य नसते तर त्याने मनुष्य प्राण्यात हे लैंगिक मनोविकार निर्माणच केले नसते. जननक्रिया, उत्क्रांतीच्या अखेरच्या अवस्थेपर्यंत पेशींच्या विभाजनावर अवलंबून ठेवण्याची व्यवस्था त्याला करता आली असती. खरे म्हणजे मनुष्यजातीतसुद्धा ती तशाच पद्धतीने घडते. म्हणून अगदी शास्त्रीय अर्थाने बोलायचे तर प्रत्यक्ष जननाशी संभोगाचा फारच थोडा संबंध असतो. या दोन भिन्न गोष्टी आहेत. त्या दोघांमधील संबंध निव्वळ योगायोगाचा असतो. या दोनही गोष्टी भिन्न आहेत हा सिद्धान्त आता मान्य झाला आहे. म्हणून उत्क्रांतीच्या उन्नत अवस्थेत संभोग हा मुख्यत: लैंगिक आकर्षणातून निर्माण झालेल्या भावनेचा आविष्कार म्हटला पाहिजे.

वरील पत्रलेखकाने गांधींवर स्पष्टपणे केलेल्या वैयक्तिक आरोपाला त्यांनी दिलेले उत्तर अगदी केविलवाणे आहे. ते वयाच्या तेहतिसाव्या वर्षापासून ब्रह्मचर्य पाळतात असा त्यांचा दावा आहे. हे काही फारसे भूषणास्पद नाही. पण या दाव्यातील पोकळपणा गेल्या वर्षी त्यांनी केलेल्या एक सूचक आत्मनिवेदनावरून उघडकीस आला आहे. या निवेदनात त्यांनी हे कबूल केले आहे की, सत्तरी जवळ आलेल्या या म्हातार-बावांचा लैंगिक मनोविकार, तीस वर्षांपेक्षा अधिक काळ ब्रह्मचर्य पाळूनही अजून प्रबळ आहे. निसर्ग सूड उगवल्यावाचून रहात नाही हेच खरे. महात्मासुद्धा त्याला फसवू शकत नाही. निसर्गाविरुद्ध झगडताना पराभूत झालेल्या अनेक मोठमोठ्या संतांचा जीवनेतिहास याची साक्ष देईल. हा विकार मारला जात नाही किंवा नियं-त्रितही केला जात नाही. गांधींवर अतिरिक्त कामवासनेचा आरोप केला जात असतो त्यात तथ्य असावे हे त्यांच्या त्या कबुलीजबाबावरून सिद्ध होते. सर्वसामान्य माणसाचा

*लैंगिक मनोविकार सत्तरीच्या आसपास नाहीसा होतो. गांधी सदुसष्ट वर्षांचे आहेत या वयात त्यांना लैंगिक प्रश्नांनी जे पछाडलें आहे त्यावरुन त्यांच्या कामविकाराचे* अतिरिक्त स्वरूप सिद्ध होते. *ही वैयक्तिक टीका नव्हे. त्यांचे स्वतःचे जीवनच त्यांचे* नीतिविषयक फतवे खोटे पाडते, येवढेच दाखवण्याचा येथे हेतू आहे.

आणि तरीसुद्धा स्वतःच्या संततिनियमनविरोधी भूमिकेचे समर्थन करताना ते " हरिजन " मध्ये लिहितात की, मध्यमवर्गीय तरुणांना त्यांच्या वाईट सवयीमुळे नपुंसकत्व आलें आहे. शाळाकॉलेजामध्ये जाणारी तरुण मुलें आणि मुली संतति-नियमनावरील वाङमय उत्सुकतेने वाचतात व त्याची साधनेही जवळ वाळगतात याबद्दल त्यांनी निषेध व्यक्त केला आहे. किती भयंकर हे ! पण या पापभीरू नीति-उपदेशकाच्या हे लक्षात येत नाही की या वाईट सवयी जेथे जेथे दिसून येतात तेथे तेथे त्या समाजाच्या पापपुण्याच्या कल्पनांनी ठरवलेल्या आणि धर्माच्या आदेशांनी निर्माण केलेल्या वळजवरीच्या लिंगविषयक नीतिनियमनांचा तो परिणाम आहे. गांधी म्हणतात की वीर्याचा दुरुपयोग करणे म्हणजे ईश्वराविरुद्ध पाप करणे आहे. जीवशास्त्राबद्दल किती शोचनीय अज्ञान ! या अडाणी विचारसरणीप्रमाणे पाहिलें तर सर्व निसर्ग पाप करण्याशिवाय दुसरे काही करीतच नाही. त्याच्या उत्पादन-क्रियेत किती बी बियाणे फुकट जातें ! अपव्यय हा निसर्गाचा नियमच दिसतो. फल-धारणा हा केवळ अपघात !

अर्थात गांधींची सारी फिकीर ही " विवाहाच्या पवित्र बंधनाबद्दल. " त्यांच्या मते विवाहाचा हेतू संतति निर्माण करणे हा आहे. पण त्या नैसर्गिक कार्यासाठी पवित्र बंधनाची काही गरज नाही. या पवित्र बंधनाशिवायच हे सर्वत्र घडत असते. " विवाहाचे पवित्र बंधन " म्हणजे खरोखर स्त्रियांची गुलामगिरी. पुरुषाची खाजगी मालकी असलेलें जननाचे साधन म्हणून त्यांना वागवलें जाते. गांधी म्हणतात की परमेश्वराने स्त्रियांना जीवनरूपी क्षेत्र बहाल केलें आहे, आणि त्याचा सदुपयोग करणे हे त्यांचे कर्तव्य आहे. स्त्री हे मुलें उत्पादन करण्याचे एक यंत्र आहे असे म्हणण्याचा हा एक दांभिक उद्वेगजनक प्रकारच होय. जीवनक्षेत्र ही जर तिला मिळालेली एक दैवी देणगी असेल तर त्यात कुठले बी पेरायचे हे तिचे तिनेच का ठरवू नये ? आणि त्यासाठी आपल्या आवडीच्याच शेतकऱ्याची योजना तिने का करू नये ? हे करण्याचे स्वातंत्र्य तिला देण्यानेच खरोखर परमेश्वरी संकेताचे पालन होणार आहे. पण श्रद्धाळू लोकांचा हाच त्रास असतो की ते परमेश्वराचे संकेत, त्याचाच आधार देऊन, सतत मोडत असतात.

◆ ◆ ◆

हिंदू समाजातील स्त्रियांच्या उच्च स्थानासंबंधी अनेक थोतांडे माजलेली आहेत. त्यासंबंधी दंतकथांची उतरंड आणि अनेक काव्ये रचण्यात आलेली आहेत. म्हणे,

हिंदुधर्माने स्त्रियांना पूर्ण समानता दिली आहे. गृहराज्यात का होईना पण त्यांना देवतेचा दर्जा बहाल केला आहे. एवढा हा दर्जा लाभल्यानंतर त्यांनी ऐहिक हक्कांच्या आणि अधिकारांच्या मागे का लागावे ? या क्षणभंगुर आणि क्षुल्लक गोष्टी, म्हणनच त्या हिंदू समाजातील स्त्रियांच्या पूर्ण समानतेत समाविष्ट झालेल्या नाहीत. पतीशी गूढ आणि अभंग एकरूपतेत तिच्या जीवनाचे सार्थक आहे. ती कुठल्याही वैयक्तिक. सामाजिक किंवा पारमार्थिक जीवनाविषयींच्या आसक्तीपलिकडे गेलेली आहे, (प्रेम म्हणजे शारीरिक संबंधांच्या खालच्या पातळीवरील लालसा नव्हे तर आपल्या सर्वस्वाचे दान करण्याची ती एक आध्यात्मिक भावना त्यांना वाटते. आपली सर्वात उत्तम देणगी म्हणून त्या तिला आपल्या नवऱ्याच्या चरणी अर्पण करतात. मग तो त्याच भावनेने तिला प्रतिसाद देवो अगर न देवो. पतिप्रेमाची अपेक्षा न धरताच त्या त्याच्यावर निःस्वार्थी प्रेम करीत रहातात आणि मोबदल्याची अपेक्षाही न करता आपले सर्वस्व त्याला अर्पण करतात. त्यांचा खरा आनंद समर्पणात असतो. प्रेम करण्यात असतो.) खरोखर हिंदू स्त्री ही निःस्वार्थीपणाचा अवतारच. पुरुषाने तिच्या या गुणांचे कौतुक करावे, आणि जेथे ती, नको असलेल्या मुलांना जन्म देणे इत्यादी अनंत अधिकार उपभोगत असते त्या गृहमंदिरात तिची स्थापना करावी यात काहीच आश्चर्य नाही. पतीशी आध्यात्मिक एकरूपतेची ही कपोलकल्पित कथा म्हणजे स्त्रीच्या गुलामगिरीच्या खुपणाऱ्या साखळदंडांवरील झगझगीत मुलामाच होय.

(या सर्व दंतकथा, या कादंबऱ्या आणि काव्ये वाचून सुद्धा, मनुस्मृतीने स्त्रियांचे स्वातंत्र्य हिरावून घेतले आहे या गोष्टीकडे सत्यशोधकाला डोळेझाक करता येणार नाही. सर्व आयुष्यभर तिने या ना त्या पुरुषाच्या आधाराखालीच राहिले पाहिजे. आणि हा आधार म्हणजे गोड शब्दात सांगितलेली ताबेदारी. वस्तुस्थिती अशी आहे की मनूने स्त्रीच्या जीवनाचे कालखंड, अनुक्रमे पिता, पती व पुत्र यांच्या मालकीच्या अनुरोधाने पाडले आहेत. म्हणजे ती कधीच स्वतंत्र नसते हे या सुप्रसिद्ध स्मृतीचे पालुपद होय. मनुस्मृती हा उच्च व उदात्त ध्येयांचा खजिनाच समजला जातो. या खजिन्यातील नकली अलंकारांनी आपल्या बऱ्याचशा आधुनिक स्त्रिया अजूनही फसत असल्या तरी काही जणींना सत्य परिस्थितीची जाणीव झालेली आहे.) हा प्रेमाने जोपासलेला भ्रमाचा भोपळा यापैकी एकीने परवाच फोडला आहे आणि हिंदू समाजातील स्त्रीच्या उच्च स्थानाबद्दलचा भ्रमनिरास केला आहे. ती लिहिते :)

(" हिंदुस्थानात आज कित्येक शतके स्त्रीजीवन म्हणजे एक कळसूत्री बाहुल्यांचे नाटक बनले आहे. हे नाटक निराशापूर्ण, निरुपयोगी आणि दु:खी अशा असंख्य पात्रांनी गजबजलेले आहे. या नाटकामुळे उच्च धार्मिक भावना निर्माण झालेल्या दिसतात. धर्माने नियुक्त केलेल्या गोष्टींना स्त्रीची मूक संमती, हे उच्च स्त्रीगुणांच्या

आविष्काराचे व त्या गुणांच्या वैभवाचे लक्षण ठरले आहे. जितका अधिक अन्याय ती विनतक्रार सहन करी, आणि आपले आयुष्य प्राथमिक रानटी मालकी हक्कांना शरण जाऊन कंठी, तितकी ती स्त्रीधर्माने व सद्गुणांनी अधिक समृद्ध गणली जाई. स्त्री ही चालती बोलती विक्रीची वस्तू असल्यामुळे ती कुणातरी पुरुषाच्या ताब्यात दिली पाहिजे अशी फार पुरातन समजूत आहे. त्यामुळे संधी मिळाल्यावरोबर तिचे लग्न करून दिले जाते. एकदा ती पुरुषाच्या ताब्यात गेली की जन्मभर ती त्याच्या मालकीची वस्तू ठरे. त्याच्या खेळातील भागीदारीण म्हणून तर सोडाच पण त्याचे खेळणे म्हणूनही तिला मान नसे." ( निलीमादेवी "हिंदुस्तान टाईम्स" फेब्रुवारी १०, १९३६ )

सुशिक्षित तरुण स्त्रियांवर पडलेल्या पाश्चात्य प्रभावामुळे हिंदू परंपरा व संस्कृती यांचे धर्ममार्तंड अस्वस्थ झाले. या नवीन विचारसरणीबद्दल नुसता खेद व्यक्त करूनच ते थांबले नाहीत तर हे आचारभ्रष्ट लोक भारतीय स्त्रीधर्माची तत्त्वे सोडत आहेत म्हणून त्यांच्यावर जाहीरपणे कोरडे ओढू लागले. पण हे करीत असताना आपल्या उराशी वाळगलेल्या तत्त्वांचे पितळ त्यांनी स्वतःच उघडे पाडले आहे.

२० मार्च १९३६ रोजी दिल्ली वुईमेन्स लीगच्या वतीने भरलेल्या सभेत हिंदू संस्कृतीचे अधिकारी प्रवक्ते डॉ. भगवानदास म्हणाले, " स्त्री आणि पुरुष यांच्या समानतेच्या भाषेत आपण बोलता कामा नये. मानवतेची ती दोन अर्धांगे आहेत. त्यांच्या मधील समानतेपेक्षा सहचरत्वाच्या दृष्टीने आपण बोलले पाहिजे." हा साराच गडवडगुंडा आहे. साध्या गोष्टीचे गूढगुंजन ! स्त्रीपुरुषांमधील सुसंवादी संबंधाला समानतेची आवश्यकता नाही. पण हेच हिंदी संस्कृतिसंरक्षक राजनीतिशास्त्रज्ञ म्हणून जेव्हा बोलतात आणि ब्रिटिश साम्राज्यातील हिंदुस्तानच्या भागिदारीवर टीका करतात, तेव्हा ते, खरी भागिदारी समानतेच्या पायावरच शक्य आहे या भूमिकेवरूनच करतात. म्हणजे आजवर ते अर्थशून्य बडबड करीत होते असे म्हणावयाचे काय ? की स्त्रीपुरुषांच्या आध्यात्मिक संबंधाचे विवरण करताना त्याला ते पगडी किंवा गांधीटोपी घालत होते काय ? असेच दिसते. कारण त्यांची राजकीय भूमिका निःसंशय निर्दोष आहे.

अर्धांगे, पण समान नव्हेत. अजब गणितशास्त्र ! जर हे अर्धे भाग समान नसतील तर ते अर्धेच नव्हेत. स्त्रीपुरुषांमधील असमानता योग्य वाटावी म्हणून त्यांच्यामध्ये अस्तित्वातच नसलेले संबंध कल्पून त्यांचे ध्येय बनवलेले आहे. या गूढ स्वयंसिद्ध गणितशास्त्रातून उपसिद्धान्त कोणता ? तर स्त्रीपुरुषातील भागिदारी समानतेच्या तत्त्वावर होऊ शकत नाही. आपल्याला असे शिकवले आहे की हिंदू विवाहपद्धतीने दोन आत्मे एकरूप होऊन जातात. आणि जर हे एकरूप होणारे दोन

भाग समसमान नसतील तर अर्थातच एक दुसऱ्यापेक्षा अधिक असणार. मग अधिक भाग कोणाचा ?—अर्थात पुरुषाचा. म्हणजे स्त्रीपुरुषसाहचर्य हे एक पुराणातील वांगे. पुरुष हा या दुर्बल नावेचा मालक व रक्षणकर्ता. आणि हाच मनूचा कायदा आहे.

स्त्रियांना समानता का नाकारता? त्यांना आत्मा नसतो काय? आत्मे म्हणजे त्या दिव्यज्योतीचे असंख्य तेज:कण. अर्थात स्त्रियांना समानता नाकारणे म्हणजे हिंदु धर्माच्या या मूलभूत सिद्धान्ताचे विडंबन करणे आहे. आणि जेव्हा मालकी-हक्काचा महत्त्वाचा प्रश्न निर्माण होतो आणि तो सामाजिक संबंधांच्या अतिशय मौलिक तत्त्वांशीच विसंगती निर्माण करू लागतो तेव्हा मात्र हा धर्म विसरला जातो. सरंजामी पितृसत्ताक समाजात स्त्री ही पुरुषाची ऐहिक मालमत्ता समजली जाते. आणि त्याप्रमाणे तिला वागवले जाते. म्हणूनच प्राचीन भारतीय ध्येयांचे कैवारी स्त्रीपुरुष समानतेची भाषा सहन करत नाहीत.

परंतु या कपोलकल्पित तत्त्वांची कितीही स्तुतिस्तोत्रे गायिली तरी सरंजामी पितृसत्ताक समाज आज इतिहासाचे पिशाच्च म्हणून उरला आहे. हा भूतकाळाचा कचरा झाडून साफ करावयाचा आहे. या प्राचीन ध्येयांची सारी शक्ती खलास झाली आहे. आपल्या कीर्तीला काळिमा आणणारी प्रतिगामी भूमिका त्यांना पत्करावयाची नसेल तर त्यांना कृत्रिम वितंडवादानेच या प्राचीन ध्येयांचे समर्थन करावे लागेल. पण सहनशीलतेलाही मर्यादा असते. या "आधुनिक ऋषींच्या" वितंडवादाच्या कपोलकल्पित गोष्टींनी न फसणाऱ्या तरुण सुशिक्षित स्त्रियांची संख्या भराभर वाढत आहे. बदलत्या सामाजिक परिस्थितीत वाढत असल्यामुळे त्या साहजिकच नवीन तत्त्वांचा संसर्ग टाळू शकणार नाहीत. समानतेवर आधारलेले सहजीवन आणि खरेखुरे स्वातंत्र्य या नवीन तत्त्वांनी प्रेरित झालेल्या आधुनिक स्त्रीच्या उदयाने हा आणीबाणीचा प्रसंग निर्माण केला आहे. या आधुनिक स्त्रियांपैकी वर उद्धृत केलेल्या एकीने याचे सुरेख चित्रण केले आहे. ती म्हणते :

["सरंजामी पद्धतीत जन्मलेली कुठलीही स्त्री जेव्हा त्या पद्धतीच्या कडक शिस्तीतून बाहेर पडून आपले वैयक्तिक प्रश्न सोडवण्याचे धैर्य करते तेव्हा तिला बंडखोरच नव्हे तर आततायी स्त्री म्हणून म्हणवून घेण्याचा धोका पत्करावा लागतो. शांत अशा हिंदी जीवनात-किंचितशी खळबळ निर्माण झाली तरी कट्टर विरोधकाला त्यात वादळाची पूर्वसूचना दिसते. ज्या सामाजिक पद्धतीचे अस्तित्व त्यातील बहुसंख्य सभासदांवरील अखंड अन्यायातच आहे, त्या पद्धतीने जखडलेल्या कैद्यांच्या साखळदंडांचा थोडा जरी आवाज झाला तरी त्या पद्धतीचे पुरस्कर्ते भयभीत होणारच. आणि या पद्धतीने हिंदू स्त्रियांखेरीज अधिक कोण जखडले गेले आहे ? आज स्त्रियांच्या चळवळीचे जे सर्वात अधिक बोलके प्रवक्ते आहेत त्यात या पद्धतीमुळे आत्यंतिक

दु:ख भोगलेल्या व सोसलेल्या स्त्रियांच्या प्रतिनिधी क्वचितच आढळतील. आणि अशा स्त्रियांनी तोंड उघडले तर या भय भाकणाऱ्या कैवाऱ्यांना कल्पनाही येणार नाही अशा फार मोठ्या प्रश्नाच्या आपत्तीला हिंदू समाजाला तोंड द्यावे लागेल."

हिंदू स्त्रियांच्या पौराणिक उच्च स्थानाला वस्तुस्थितीचा काही आधार असता तर असा प्रसंग येण्याचे कारण नव्हते. पुरुषांची त्यांच्याबद्दल खरोखरच आदराची व सहचारित्वाची भावना असती तर त्यांनी बंड कशाला केले असते ? हा वर उद्धृत केलेला अग्रगामी आवाज म्हणजे कुणा माथेफिरूची आंधळी बडबड असे वाटत असेल तर हिंदू संस्कृतीचा बेजबाबदार अधिक्षेप करतात असा ज्यांच्यावर चुकूनही आरोप करता येणार नाही अशा एका गृहस्थाचे मत उदाहरण म्हणून देतो.

मार्च १९३६ मध्ये सर एस्. राधाकृष्णन् यांनी आंध्र युनिव्हर्सिटीच्या विद्यार्थ्यांपुढे जे निरोपाचे भाषण केले आहे त्यात त्यांनी खालील कडक मत प्रतिपादन केले आहे :

"ज्या धर्मांधतेमुळे आपल्या हजारो देशबांधवांना अमानुषतेने व मूर्खपणाने वागवले जाते आणि भगिनींवर असह्य कुपात्रता आणि अडचणी लादल्या जातात ती धर्मांधता म्हणजे एक उभे संकट आहे. ही आत्म्याची भ्रष्टता आहे. जे कोणी अशा तऱ्हेची कुपात्रता दुसऱ्यावर लादतात ते स्वतःच खरोखर त्या अंधश्रद्धेचे व अज्ञानाचे बळी असतात."

पण जेव्हा राष्ट्रीय पुढारी या कुपात्रतेचे समर्थन करताना आढळतात, आणि या अन्यायी पद्धतीविरुद्ध बंड करणाऱ्यांचा, खोट्या ध्येयाने दिशाभूल झालेले म्हणून निषेध करतात, तेव्हा काय म्हणावे ? ते बहुतेक सर्व, कमीअधिक प्रमाणात, अंधश्रद्धच आहेत. या अंधश्रद्धेसाठी अज्ञानाचे कारण पुढे करण्याचे समाधानही त्यांना लाभू शकणार नाही, कारण आपण काय बोलत आहोत हे त्यांना कळत असते. सर्व नवीन कल्पनांना व चळवळींना त्यांचा विरोध जाणूनबुजून केलेला असतो. अनेक लोकांच्या गुलामगिरीवर आधारलेल्या व धर्माने संमत केलेल्या जुनाट सामाजिक पद्धतीचे ते पुरस्कर्ते आहेत. हिंदुस्तानच्या "आध्यात्मिक" परंपरेला, स्वातंत्र्य व समानतेच्या कल्पना परकीय आहेत. निराकार आत्म्याच्या काल्पनिक समानतेवर विश्वास आणि त्याबरोबरच आध्यात्मिक मुक्तीची कल्पना, यामुळे ऐहिक स्वातंत्र्य व सामाजिक समानता या क्षुद्र गोष्टी म्हणून दुर्लक्षिल्या जातात. आत्मा स्वतंत्र असतो मग मी गुलाम कसा असेन ? आत्मा स्वतंत्र असतो या फोल कल्पनेने सामाजिक गुलामगिरीचे निखालस सत्य झाकून टाकले आहे. मानवी स्वातंत्र्याची कल्पना ही परमेश्वरी संकेतावरील विश्वासाशी विसंगत असते. जगातील सर्व गोष्टी अतर्क्य अशा परमेश्वरी इच्छेने आधीच ठरलेल्या असतात. मग मर्त्य मानव स्वतंत्र कसा असू शकेल ?

स्त्रियासुद्धा जेव्हा दुष्ट पाश्चिमात्त्यांकडून आलेल्या विलक्षण तत्त्वांनी भारावून जाऊ लागल्या तेव्हा हटवादी धर्मावर आधारलेल्या सामाजिक पद्धतीच्या या कैवाऱ्यांच्या अंतःकरणात धडकी भरल्यास नवल नाही. स्वातंत्र्य व समानता यांची स्त्रिया उद्धटपणे मागणी करू लागल्या तेव्हा या हिंदू संस्कृतीच्या कैवाऱ्यांना, प्राचीन हिंदुस्तानच्या न्यायी ऋषिमुनींनी स्त्रियांना कोणते स्थान दिले आहे याबद्दल सत्य सांगणे भाग पडले. या नवनव्या कल्पना सहन करण्याची त्यांची तयारी नसल्यामुळे चिडखोरपणाने ते स्त्रियांना त्यांचे वास्तव स्थान दाखवून देत आहेत.

वर उद्धृत केलेल्या डॉ. भगवानदास यांच्या भाषणात, आधुनिक स्त्रीच्या मागणीबद्दल निषेध व्यक्त करीत असताना, त्यांनी हिंदूविवाह व कुटुंब याविषयी विवरण केले आहे. ते म्हणतात, " विवाह म्हणजे वनविहार ( picnic ) नव्हे. विवाह म्हणजे शिस्त. आणि लोकांनी ती पाळलीच पाहिजे. जर स्त्री-पुरुष विवाहाचे पावित्र्य विसरले आणि त्याबद्दल गलथान भाषेत बोलू लागले तर समाज कोसळून पडेल. हिंदुस्तानात, कुटुंब हा समाजाचा मूळ घटक आहे तर पाश्चिमात्य देशात व्यक्ती हा आहे. आपली पद्धती श्रेष्ठ आहे यात शंकाच नाही. हिंदू लोकांचा व्यक्तिवादावर विश्वास नाही. आमचे ध्येय मानववाद, कुटुंबवाद. "

या ' आधुनिक ऋषी "ने सांगितलेले हे उघडेनागडे सत्य. स्त्री आणि पुरुष यांमधील संबंधांचे स्पष्टीकरण करून हिंदू स्त्रीच्या आदर्शाचे वास्तविक स्वरूप उघड येथे रेखाटले आहे ; आणि हा म्हणे देवाघरचा आदेश आहे. विवाहात शिस्त असलीच पाहिजे; आज ऐन विसाव्या शतकातसुद्धा पितृसत्ताक पद्धतीत घालून दिलेले नियम मानलेच पाहिजेत. विवाह म्हणजे वनविहार नाही असे आम्हाला सांगितले आहे त्याचा अर्थ काय ? त्याचा अर्थ हाच की विवाह म्हणजे मैत्री नव्हे, तर स्त्रीचे सर्व स्वातंत्र्य हिरावून घेणारे , व तिच्या व्यक्तिजीवनावर गदा आणणारे ते एक न मोडता येणारे बंधन आहे. पत्नी म्हणजे माणूस नव्हेच. तिने फक्त कर्तव्ये करीत रहावयाची, आणि तीसुद्धा खुषीने नव्हे तर ताठर शिस्तीखाली. वैचारिक स्वातंत्र्यालासुद्धा मनाई करणारे हे शिस्तीचे तत्त्व, व्यक्तीला एक स्वयंचलित यंत्र बनवते. अशा या विचारशक्तिहीन पण आज्ञाधारक यंत्रांनी बनलेला समाज म्हणजे तुरुंगच. सर्वांच्या संमतीने जेव्हा कायदे केले जातात तेव्हाच ते सार्वभौम बनतात. अर्थात सामाजिक आचरण आणि कौटुंबिक संबंध हे शिस्तबद्ध पाहिजेतच. पण ही शिस्त वरून लादलेल्या सक्तीची असता कामा नये. ती खुषीने पत्करलेली पाहिजे. नाहीतर तो जुलुमाचा रामराम होईल. आपल्या " आधुनिक ऋषींपैकी " एकाने ज्या शिस्तीची मागणी केली आहे ती या प्रकारची शिस्त आहे.

अशा या सामाजिक आणि कौटुंबिक संबंधांच्या सुलतानी तत्त्वांच्या शिस्तीची मागणी सर्व संबंधित लोकांकडून सारखीच केली गेली असती तर काहीतरी पळवाट राहिली असती; पण तसे नाही. तो वादाचा किंवा सिद्धांताचा प्रश्नच नाही. वस्तुस्थिती अशी आहे की धर्मग्रंथाने घालून दिलेली ही शिस्त, स्त्रियांच्या बाबतीत ती निःशेष शृंखला आहे, तर पुरुषांच्या बाबतीत तो निव्वळ एक उपचार आहे. खरोखर, तात्त्विक-दृष्टया सुद्धा या शिस्तीच्या बोजाची वाटणी सारखी केलेली नाही. पुरुष हा पिता आणि पती म्हणून शिस्त बजाविणारा असतो; आणि यामुळेच या शिस्तपालनाचा सर्व भार पडतो मात्र स्त्रीवर. हिंदू विवाहविधी मैत्रीचे नाते प्रस्थापित करीत नाही तर तो स्त्रीला रक्षणासाठी पुरुषाच्या स्वाधीन करतो. बलाढय राष्ट्राने कमकुवत राष्ट्रांशी केलेल्या संरक्षण करारात जितके परस्पर हित आणि जीवनमैत्री असते त्याहून अधिक, पुरुषाने स्त्रीवर प्रस्थापित केलेल्या या संरक्षणाच्या पद्धतीत नसते. या दोनही बाबतीत हे संरक्षण म्हणजे हुकुमत असते, मालकीचा तो एक फसवा प्रकार होय. विवाहसंबंधांच्या काव्यपूर्ण आख्यायिका आणि विद्वत्तापूर्ण निरूपणे हिंदू विवाहपद्धतीने खोटी पाडली आहेत. स्त्रियांच्या सामाजिक गौण दर्जाचे स्वतःला पाहिजे तसे समर्थन करण्यासाठी आधुनिक ऋषींनी या धर्मवचनांची कितीही ओढाताण केली तरी तीं धर्मवचनें सत्य तेच सांगणार, आणि स्त्रियांना जर रूढीने घालून दिलेल्या तत्त्वांचे आणि शिस्तीचे पालन करावयाचे असेल तर त्यांना या विवाहविधीच्या धार्मिक वचनांप्रमाणेच वागावे लागणार. त्याग, भक्ती आणि कर्तव्य हेच त्यांचे जीवन ठरणार. या आदर्शांना भावनेची कितीही झळाळी दिली तरी ते कुठल्याही स्वाभिमानी स्त्रीची फसवणूक करू शकणार नाहीत.

स्त्रियांच्या दृष्टीने हिंदू विवाह हा खरोखरच वनविहार नाही. विवाहोत्तर प्रेमाच्या देखाव्याखेरीज त्यात प्रेमाचा संबंध नसतो. विवाह म्हणजे घालून दिलेल्या नियमानुसार केलेला उभय पक्षामधील खुषीचा करार नसतो तर जन्मभर जखडण्या-साठी स्त्रियांना सरळ नव्या मालकांच्या हवाली केले जाते. जी जबाबदारी स्वखुषीने स्वीकारलेलीच नसते; त्या जबाबदारीबरोबर येणाऱ्या शिस्तीची मागणी नैतिक आधारावर करता येणार नाही. स्त्रियांना आपला जोडीदार निवडू द्या; त्यांच्या बुद्धीला पटले तरच त्यांना लग्न करू द्या आणि मग शिस्तीच्या गोष्टी सांगा. फक्त मालकी बदलून प्रस्थापित झालेल्या नाखुषीच्या संबंधांपासून शिस्तीची मागणी करणे हा शुद्ध सरळ सरळ जुलूम होय. हिंदू विवाह, स्त्रीला हक्क काहीच देत नाही, फक्त कर्तव्य लादतो. अशा परिस्थितीत शिस्त, म्हणजे नाखुषीने केलेल्या कराराच्या जबाबदाऱ्या पार पाडण्याची सक्तीच होय. पण जबाबदारी ही स्वखुषीने पत्करलेली असल्याशिवाय तिला नैतिक सामर्थ्य असणार नाही. जी गोष्ट केलीच नाही त्याबद्दल

ग्रं. क्र. ६१३८



एकाद्याला जबाबदार धरता येत नाही ज्या गोष्टी करण्याचे (मी) अंगावर घेतलेच नाही त्या करण्याचे कर्तव्य माझे नाही. जबाबदारी आणि कर्तव्य याच्या कल्पनेत सम्मती गृहीत धरलेली असते. पूर्वसम्मतीच्या अभावी कर्तव्यही नसते आणि जबाबदारीही नसते. म्हणून हिंदू विवाहाने प्रस्थापित झालेल्या संबंधात शिस्तीचा प्रश्नच उद्भवत नाही.

धर्माधिकारवाणीने आपल्याला असे सांगितले जाते की जर स्त्रीपुरुष विवाहाचे पावित्र्य विसरले आणि त्याबद्दल गलथान भाषेत बोलू लागले तर समाज कोसळून पडेल. ठीक आहे. सर्वांना हे ठाऊक आहे की, हे पवित्र व्रत पुरुष बहुतकरून क्वचितच पाळतात आणि तरीही समाजाच्या अजून ठिकऱ्या पडल्या नाहीत. पण स्त्रियांना दिल्या जाणाऱ्या वागणुकीबद्दल जर त्यांनी असमाधान व्यक्त केले तर मात्र या समाजाचा पायाच हादरणार आहे. म्हणून हे पावित्र्याचे बंधन फक्त त्यांनाच आहे; आणि हे बंधन फारसे पवित्र नसले तरी बंधनकारक निश्चितच आहे. विवाहाबद्दल "गलथान भाषेत बोलण्याचा" निषेध करणे म्हणजे बदलत्या सामाजिक संबंधांशी बिलकूल न जुळणाऱ्या आणि या परिस्थितीत वाढणाऱ्या स्त्रियांना तापदायक व असह्य होणाऱ्या रूढ संबंधांवर टीका करण्याची मनाई करणे होय. स्त्रियांनी साधी तक्रार सुद्धा करता कामा नये. कुठलीही तक्रार असणे हेंच असभ्यपणाचे आहे. त्यांनी त्यांच्यापुढे ठेवलेल्या फसव्या ध्येयातच समरस झाले पाहिजे. हजारो वर्षांपूर्वी मनूने घालून दिलेले नियम आजही अढळ मानले पाहिजेत.

पण पुरुषांबद्दल काय ? त्यांच्याबाबतीत शिस्त इतकी कडक का नाही ? विवाहाचे पवित्र व्रत त्यांना बंधनकारक का नाही ? कारण उघडच आहे की, स्त्रियांकडून ज्या शिस्तीची मागणी धर्मग्रंथ करतो त्या शिस्तीची मागणी तो पुरुषांकडून करत नाही ; कारण जरी औपचारिक रीत्या पुरुषांना हे व्रत स्त्रियांइतकेच पवित्र असले तरी त्यात त्यांना पळवाटा फार ठेवलेल्या आहेत. विवाहबंधन हे अतूट असल्यामुळे त्यात पुरुषांचा काहीच तोटा नाही. विवाहबंधन जर दुसऱ्या लग्नाला प्रतिबंध करत असेल तरच ते खरोखरी अतूट ठरेल. मध्ययुगीन ख्रिश्चन धर्माचा हा नियम होता. पुरुष किंवा स्त्री कुणीही दुसरे लग्न करू शकत नव्हते. आणि घटस्फोटाची परवानगी नसल्याने उभय पक्षांना हे बंधन सारखेच लागू होते. विवाह हे पवित्र बंधन मानणाऱ्या तत्त्वाने तर्कदृष्ट्या हीच पद्धती अनुसरली पाहिजे. हिंदूपद्धती ही नुसती अयुक्तिकच नव्हे तर निःसंशय अन्यायी आहे.

विवाहाच्या या दिखाऊ पावित्र्याला बहुपत्नीत्वाची पद्धती हसते आहे; या पावित्र्याच्या तत्त्वाबद्दल जे कोणी खरोखर गंभीर आहेत त्यांनी बहुपत्नीत्वपद्धतीचा, व्यभिचाराच्या गुन्ह्याच्या निषेधाइतकाच जोरदार निषेध केला पाहिजे. पण नैतिक

दृष्टचा ज्याची मागणी करायला पाहिजे ते न करता हिंदूधर्म बहुपत्नीत्व मान्य करतो. व्यभिचाराची अनैतिक पद्धत धर्मसंमत करतो. हिंदुस्तानच्या अध्यात्मवादी संस्कृतीचा हा एक पराक्रम आहे. उघड उघड अनैतिक प्रकाराला संमती देणाऱ्या धर्माच्या या सामाजिक आचारसंहितेला काय म्हणावे ? बुद्धिवान व स्वतंत्र विचाराच्या लोकांना याचा जास्तीत जास्त कडक शब्दात निषेध करण्यावाचून गत्यंतरच नाही.

विवाह हे एक पवित्र बंधन आहे या तत्त्वाचा तर्कशुद्ध परिणाम म्हणून कॅथॉलिक धर्माने ते बंधन मोडण्यास मनाई केलेली आहे. घटस्फोट ही एक पाश्चिमात्त्य विकृती म्हणून हिंदूंनी सुद्धा त्याच्या विरुद्ध बराच आरडाओरडा चालवला आहे. या देशात अजूनही प्रचारात असलेल्या उघडउघड निर्लज्ज सामाजिक पद्धतीचे हिंदू पुरस्कर्ते, आपल्या या पद्धतीवर टीका करणाऱ्या युरोपियन टीकाकारांना उत्तर म्हणून पाश्चिमात्य देशातील घटस्फोटाच्या वाढत्या प्रमाणाकडे बोट दाखवतात. पण त्यांच्या हे लक्षात येत नाही की सक्तीचे शरीरसंबंध आणि बलात्कार यात काही फरक नाही. घटस्फोट काढून टाकणे म्हणजे धर्माच्या संमतीने मोठ्या प्रमाणावर बलात्कारास मान्यता देणे आहे. या विषयावरील एक प्रसिद्ध तज्ज्ञ व्यक्ती आपल्या ताज्या लिखाणात लिहितात की,' घटस्फोटांचे प्रमाण हे विवाहाचे सामर्थ्य अजमावण्याची खूण आहे. आकडेवार पुराव्यावरून संशोधन करून निवडलेल्या व काळजीपूर्वक एकत्र केलेल्या माहितीवरून त्यांनी असे दाखवून दिले आहे की, घटस्फोटाचा बाऊ करणारे लोक, त्याचे जे चित्र रेखाटतात तितके त्याचे प्रमाण वाढलेलेच नाही. उदाहरणार्थ, अमेरिकेत सहा विवाहामागे एक घटस्फोट होतो. रशियामध्ये, जेथे विवाहसंस्था आणि कुटुंबसंस्था नष्ट झाली आहे असा सर्वत्र समज आहे, तेथेही हे प्रमाण जास्त नाही. ( E. Westermark यांचे " The Future of Marriage in Western Civilization " )

हिंदूंची घटस्फोटाला बंदी ही एकतर्फी असल्यामुळे तर ती जास्तच अनैतिक ठरते. पुरुषांना मन मानेल तितकीं लग्ने करता येत असल्याने त्यांच्या दृष्टीने ही बंदी अगदीच औपचारिक आणि परिणामशून्य ठरते. पुरुषाला दिलेले हे स्वातंत्र्य स्त्रीला नाकारले आहे. म्हणजे शिस्तसुद्धा उघड उघड एकतर्फी आहे. विवाह हा एक धार्मिक संस्कार. म्हणून त्याचे अतूट असे बंधन फक्त स्त्रियांनाच बंधनकारक. पण पुरुषांच्या बाबतीत मात्र तो एक वनविहार आहे. सरंजामी पितृसत्ताक समाजातील व्यवहाराचे ते एक अतिशय फायदेशीर कलम आहे. पूर्वी सोवळे ब्राह्मण डझनावारी बायका करीत असत. त्यांना त्यांच्या वडिलांच्या घरीच ठेवत असत; आणि ज्या बायकोचा पिता अधिक देणगी देईल त्या बायकोकडे रात्र घालवीत असत. असा हा वेश्यागिरीचा प्रकार करीत सोवळे ब्राह्मण हिंडत होते, तेव्हा हे आमचे कडक शिस्तवाले काय करीत

होते ? पुरुषाला निरनिराळ्या ढोंगांच्या निमित्ताने अनेक बायका करण्याची मुभा असते. या सवबीतील काही निःसंशय अनैतिक आणि अमानुष असून सुद्धा, या पद्धतीला हे विवाहाचे पावित्र्य किंवा शिस्त मनाई करीत नाही. पण स्त्री जर मुलांना जन्म देण्याच्या आपल्या कर्तव्याला मुकली तर पुरुष दुसरे लग्न करू शकतो. ज्या वांझपणात तिचा स्वतःचा काही दोष नसतो अशा या दुर्दैवी स्त्रीला घरच्या मोलकरणीची जागा देऊन तिचा मनोभंग केला जातो. पुष्कळदा हा दोष काही रोगामुळे किंवा शारीरिक दोषांमुळे उत्पन्न झालेला असतो व तो औषधोपचारांनी दूर करता येतो. हा औषधोपचार करण्याची जबाबदारी अर्थातच पतीची आहे. पण ही साधी जबाबदारीही हिंदूधर्म त्याच्यावर टाकत नाही. ही वांझ स्त्री पदरी ठेऊनही त्याला दुसरी प्रसवा स्त्री करण्याची परवानगी असते. आणि नाविन्य किंवा गम्मत म्हणून ही वांझ स्त्री वापरण्याचा त्याला अधिकार असतो. हा अधिकार म्हणजे खरोखर हिंदू विवाहाच्या पवित्र संस्थेच्या नावाखाली वेश्याव्यवसाय चालवण्याची परवानगी. आणि तरीही आज, ज्यावेळी सुशिक्षित वर्गात अधिकारापेक्षा विचाराला जास्त महत्त्व प्राप्त होत चालले आहे, अशा प्रगत काळात या अनैतिक विवाहसंस्थेवर केलेली टीका " गलथान भाषा " म्हणून निषिद्ध मानली जात आहे.

ही पद्धती अनैतिक आहे. येवढेच नव्हे तर हा क्रूर अमानुष जुलुमाचा एक प्रकार, म्हणजे वास्तविक गुलामगिरीच आहे. जर पती नपुंसक असेल तर पत्नीला बाहेर पडण्याला मार्गच नसतो. या दुर्दैवाचा परिणाम तिच्या मनःस्वास्थ्यावर होणार. आणि मानसिक अस्वास्थ्यामुळे तिला हिस्टेरिया होण्याची भीती निर्माण होणार. धार्मिक पक्षपाताने लैंगिकतेची कितीही निंदा केली तरी नैसर्गिक प्रवृत्ती या मानवनिर्मित धर्माच्या नियमांपेक्षा जास्त प्रभावी असणारच. नुसते आदेश देऊन त्या मारता येणार नाहीत. वैषयिक समाधान न मिळाल्याने तर यदाकदाचित् माणसाची प्रकृती बिघडली नाही तरी त्याचा मानसिक ऱ्हास झाल्याशिवाय रहाणार नाही. पण वैषयिक समाधानाच्या वादग्रस्त प्रश्नाचा विचार सध्या आपण बाजूला ठेवू या. आणि आपण चर्चा करीत असलेल्या विषयावर प्रत्यक्ष परिणाम करणाऱ्या दुसऱ्या प्रश्नाकडे वळू या.

स्त्रीची मातृत्वाची इच्छा नैसर्गिक व योग्य आहे याबद्दल कुणी वाद करणार नाही. नपुंसक नवऱ्याशी तिला जखडून ठेवणे आणि त्यातून तिला सुटका नाकारणे म्हणजे सर्व प्रकारे विफल आयुष्य जगण्याची तिच्यावर सक्तीच करणे आहे. मातृत्व हे स्त्रीचे राजवैभव आहे असे म्हटले जाते. फक्त तीच उपभोगू शकेल असे हे वैभव संपादन करण्याचे तिचे स्वातंत्र्य हिंदू विवाहसंस्थेने तिच्याकडून हिरावून घेतले आहे. आपल्या पतीपासून मुलांना जन्म देणे हे स्त्रीचे कर्तव्य आहे. स्वतःच्या आधीन

नसलेल्या काही कारणांनी ती जर यात अयशस्वी झाली तरच पुरुषाला आचार-स्वातंत्र्य दिलें आहे. पण अशाच परिस्थितीत पती जर अयशस्वी ठरला तर मात्र विवाहाच्या पवित्र व्रतापासून स्त्री आपली सुटका करून घेऊ शकत नाही !

निष्ठा ही सामान्यपणे वैवाहिक संबंधाचे सार मानलें जाते. हिंदुधर्म पुरुषांपासून तिची मागणी करीत नाही. त्यांच्या बाबतीत विवाह म्हणजे कायदेशीर व्यभिचार. बहुपत्नीकत्व म्हणजे सर्व प्रकारच्या आणि पुष्कळदा क्षुल्लक बहाण्याखाली केलेला कायदेशीर व्यभिचार. पत्नीचा दीर्घ मुदतीचा आजारसुद्धा पतीला या निष्ठेच्या व्रतापासून मुक्त करतो. अशा वेळी कुटुंबरक्षणासाठी दुसरे लग्न करण्याचा नैतिक व धार्मिक अधिकार त्याला असतो. व स्वतःला एकाकी बनवणाऱ्या या हृदयशून्य गोष्टीला हरकत न घेता आपल्या सवतीचे आनंदाने स्वागत करणे व तिच्यावर बहिणीप्रमाणे प्रेम करणे हा हिंदू स्त्रीधर्माच्या आदर्शाचा एक भाग समजला जातो. हे ध्येय उच्च असेलही. हा आवडीनिवडीचा व नैतिक संवेदनांचा प्रश्न आहे. पण या धार्मिक आचरणात भावना असणे अशक्य आहे. दुर्बळ स्त्रिया याला नाईलाजानें वर-वर संमती देतात. पण रूढींच्या अंधश्रद्धेखाली न्याय व नीतीची चीड जेव्हा झाकून जात नाही तेव्हा ती साहजिक या पद्धतीविरुद्ध बंड करून उठणारच, आणि स्त्रियांना, पुरुषांच्या ताब्यातील मुलें तयार करणारी चालती बोलती यंत्रे म्हणून अधोगतीला नेणाऱ्या या अमानुष पद्धतीचा निषेध करणारच.

व्यभिचार हा नैतिक गुन्हा म्हणून निषिद्ध मानला आहे. व्यभिचार म्हणजे लग्नाच्या जोडीदाराशी एकनिष्ठ रहाण्याची घेतलेली शपथ मोडून दुसऱ्याबरोबर एकत्र शय्या करणे. व्यभिचार हा नैतिक गुन्हा मानण्याला काही अर्थ असेल तर तर्कदृष्टया, एक पुरुष एकाच वेळी एकापेक्षा अधिक स्त्रियांशी लग्न करू शकत नाही. एकनिष्ठतेची शपथ ही पवित्र आहे या कल्पनेला नैतिक अधिष्ठान म्हणून व्यभिचार निषिद्ध ठरवला गेला आहे. आणि व्यभिचाराचा नैतिक आधारावर केलेला निषेध म्हणजे ओघानेच घटस्फोटाचे समर्थन. मग हिंदू नीतिवाद्यांना त्याबद्दल कितीही तिटकारा वाटो.

काही ना काही कारणांनी पुरुष जेव्हा दुसरे लग्न करू इच्छितो तेव्हा ज्या निष्ठेच्या शपथेतून तो स्वतःला सोडवून घेऊ इच्छितो त्याच शपथेतून आपल्या पहिल्या बायकोला मुक्त करण्याचे त्याचे नैतिक कर्तव्य अनुषंगाने ठरतेच. आणि अगदी याच प्राथमिक नैतिक अर्थाने आणि न्यायाने घटस्फोटावर बंदीचा प्रश्न उद्‌भवतच नाही. जेव्हा पुरुष औपचारिकपणेही स्त्रीशी प्रामाणिक रहात नाही तेव्हा तिने तरी त्याच्या बंधनात का रहावे ? निष्ठेची शपथ ही जर उभय पक्षांना सारखीच बंधन-कारक नसेल तर ते लग्न म्हणजे खात्रीनेच सहचारित्व नव्हे, तर पुरुषाची ताबेदारी

[illegible], टाउ. स्वल्प
७५८८९...... दि: ...१०।६।६१..
 २१३१ ...... नों० दि. ९।२।३।७। 

होय. हिंदू विवाहात ही शपथ परस्परबंधनकारक नसते हे सर्वमान्यच आहे. पुरुषाला व्यभिचार करण्याचा अधिकार असतो. पण धर्माच्या संमतीने केलें तरी पाप ते पापच. म्हणजे या बाबतीत धर्मच मुळी अनैतिक पद्धती म्हणून उघडा पडतो. व्यभिचार हा नैतिक गुन्हा म्हणून हिंदूधर्म त्याचा निषेध करतो, पण तोच व्यभिचार धार्मिक नियमाप्रमाणे केल्यास त्याला मान्यता देतो ! आपल्या लग्नाच्या सहधर्मचारिणीशी घेतलेली निष्ठेची शपथ, पुरुष धर्माच्याच पाठबळावर, मोडू शकतो. त्याला व्यभिचार करायची इच्छा झाली तर त्याने फक्त आपल्या आवडत्या विषयाशी लग्न केले म्हणजे झाले; आणि त्याची त्याला मुभा असते. निष्ठेच्या शपथेचे हे खरोखर विडंबन नाही काय ? जी बंधनकारकच नसते ती शपथ घेण्यात अर्थ तरी काय ?

हिंदुधर्म, व्यावहारिक कारणांसाठी फक्त स्त्रियांवर घटस्फोटाची बंदी घालतो. पुरुषांना मात्र, त्याचे सगळे फायदे बहाल करतो. विवाहबंधन हे पुरुषाला जर कोणत्याच गोष्टीसाठी बंधनकारक नसते तर त्याला घटस्फोटाच्या हक्काची गरजच रहात नाही. अगदी दुराचाराच्या थरापर्यंत जाऊनसुद्धा जे लैंगिक स्वातंत्र्य उपभोगण्याचा अधिकार धर्माने पुरुषांना दिला आहे, ते स्वातंत्र्य उपभोगण्याचा अधिकार साहजिकच स्त्रियांना नाही, या तत्त्वावर ही घटस्फोटाबद्दलची हिंदूवादी भीती आधारली गेली आहे. हे काही मोठे नैतिक तत्त्व नव्हे. तसे पाहिलें तर त्यात मुळीच नैतिकता नाही. या तत्त्वामागे मालकी हक्काची कल्पना आहे. स्त्री ही पुरुषाच्या भौतिक मालमत्तेचा एक भाग आहे. ज्याप्रमाणे जमीन नांगरल्यावर ती फळे धारण करते त्याचप्रमाणे स्त्रीने पुरुषाला मुलें देणे हेच तिचे स्वाभाविक भवितव्य. ज्याप्रमाणे सामर्थ्य असेल तितकी जमीन राखण्याचा पुरुषाला अधिकार आहे त्याचप्रमाणे एकापेक्षा अधिक बायका करण्याचाही त्याला अधिकार आहे. पण त्याच्या बायकोने त्याच्या या मालकी हक्का-बद्दल शंका प्रदर्शित करणे, किंवा दुसऱ्या कुणाचा मालकी हक्क मान्य करणे हे सुद्धा अगदी अस्वाभाविक आहे. एकाद्या जमिनीच्या तुकड्याने किंवा इस्टेटीच्या एकाद्या भागाने आपला मालक निवडण्याचा हक्क प्रस्थापित केल्याचे कुणी ऐकले आहे काय ? खरे म्हणजे इस्टेट ही कुणाच्या तरी मालकीची असते आणि त्या मालकाने तिच्यात भर घालत रहावयाचे हेच स्वाभाविक. म्हणून मालक असलेलें पतिदेव आपल्या स्त्रीरूपी मालमत्तेत भर घालण्यास स्वतंत्र असलें तरी स्त्रियांनी अतूट अशा विवाह-बंधनातच रहाणे " स्वाभाविक. "

पण खाजगी मालमत्तेवर आधारलेली समाजरचना ही आज जशी अस्वाभाविक आहे, तशीच स्त्रियांना लैंगिक संबंधांचे स्वातंत्र्य नसणे ही गोष्टही अस्वाभाविकच आहे. या संबंधात खरी स्वाभाविक गोष्ट म्हणजे लैंगिक मनोविकार. तिचे शमन करण्यासाठी कोणच्या मर्यादा असाव्यात हा सामाजिक संकेतांचा प्रश्न असतो. आणि

म्हणूनच सामाजिक प्रगतीच्या काळात वेळोवेळी त्यात बदल केले पाहिजेत. लैंगिक मनोविकारांचे शमन ही स्वाभाविक गरज नेहमीचीच असल्यामुळे लैंगिक संबंधाचा कुठलाही एक प्रकार हा दुसऱ्या प्रकाराहून कमी किंवा अधिक नैसर्गिक नसतो आणि अनैसर्गिक तर नसतोच. हा संबंध जितका मोकळेपणाचा तितका तो जीवन समृद्ध करणारा असतो आणि म्हणून तो जास्त नैसर्गिक असतो.

भारतीय स्त्रीधर्माच्या आदर्शाशी घटस्फोट सुसंगत नाही या सबबीवर तो निषिद्ध मानला आहे. याच भूमिकेवरून डॉ. भगवानदास यांनी पाश्चिमात्य घटस्फोट-पद्धतीवर टीका केली आहे. म्हणजे स्त्रियांना संपूर्ण अभाव असलेला आणि पुरुषांना पूर्ण मुभा असलेला लैंगिक संबंध आणि पुरुषांची तावेदारी, हाच स्त्रीधर्माचा आदर्श ठरतो. हे ध्येय खचितच उदात्त नाही. जागृत महिला तर आता यापुढे कशानेही फसणार नाहीत आणि न्याय व नीतीची चाड असणारे स्वतंत्र विचारवंत या आदर्शाचा उदो उदो तर सोडाच पण साधे समर्थनही करू शकणार नाहीत.

◆ ◆ ◆

जरी आमचे राष्ट्रीय पुढारी, खऱ्या आणि काल्पनिक गोष्टीतील फरक जाण-णाऱ्या कुठल्याही माणसाला या पारंपरिक ध्येयांचे प्रतिगामी स्वरूप सहज स्पष्ट दिसेल अशा ध्येयांबद्दल मोठे वक्तृत्वपूर्ण बोलत आहेत, तरी पुढारलेल्या वृत्तीचे दुसरे हिंमतवान लोक हिंदू समाजातील स्त्रियांच्या स्थानाकडे वास्तव दृष्टीकोनातून पाहू लागले आहेत, आणि अत्यंत गरज असलेल्या सुधारणेचा पुरस्कार करू लागले आहेत. उदाहरणादाखल म्हणून, बडोद्याच्या महाराणींच्या भाषणातून खालील उतारा उद्धृत केला आहे. त्यांच्यावर खात्रीनेच कोणी बायकी अतिक्रमणाचा ठपका ठेवू शकणार नाही, किंवा हिंदू संस्कृतीविरुद्ध बंडाच्या कारवाईचा संशय घेऊ शकणार नाही.

"पुरुषांबरोबर समानता हा आधुनिक समाजातील स्त्रीचा नैसर्गिक आणि वतनी हक्क तिला देण्याचे तर दूरच राहो पण देशाच्या बहुतेक भागात आज प्रचारात असलेल्या कायद्यांमुळे ती अतिशय प्रतिकूल अशा परिस्थितीत सापडली आहे. हिंदु कायद्याप्रमाणे एकत्र कुटुंब पद्धतीत फक्त पुरुष व्यक्तींचाच समावेश भागीदार म्हणून होतो. स्त्री ही सहभागीदार नसते तर सामाईक इस्टेटीत मालकी हक्क नसलेली निव्वळ एक आश्रित असते. ज्या समाजासाठी हे कायदे केले गेले होते त्या समाजात आणि आजच्या आपल्या समाजात खडू व चीझ यातील फरकाइतका फरक असताना तुम्ही त्याची दहशत बाळगून स्वतःला कैदखान्यात डांबण्यास तयार का होता ? मनूने आणि इतरांनी त्यांच्या काळात उत्तम कायदे कदाचित् केलेही असतील. पण ते म्हणजेच अंतिम वाक्य असे तुम्ही का मानता ? ते म्हणजे काय परमेश्वरी इच्छा ?

◆

खात्रीनेच नाही. ती पुरुषी विचारांची किंवा त्यांच्या पक्षपाती वृत्तीची विधानें आहेत. स्त्रियांविरुद्ध केलेल्या कायद्यांचा जेव्हा मी खरोखर विचार करते तेव्हा या लोकांचा एकाद्या सर्पानें चावा घेतला होता की काय, इतके विषारी वृत्तीनें ते लिहिलें गेलें आहेत असे वाटते. त्यांच्या कायद्याच्या शब्दाशब्दातून आम्हा स्त्रियांविषयीचा द्वेष ओतप्रोत भरला आहे. जेव्हा हा कायदा जन्मापासून मरेपर्यंत स्त्रीला तावेदार बनवतो, हे सांगण्याकरिता तिला पाळण्यात कोंवतो आणि नंतर म्हणतो की, अमूक अमूक पद्धतीनेच तू जगले पाहिजेस, तेव्हा मला असे का वाटू नये ? जगणे ? तो त्यांच्या तोंडातला शब्दच आम्हाला वाकुल्या दाखवत आहे ! जन्मापासून जिला स्वातंत्र्याचा कणसुद्धा दिसला नाही ती स्त्री जगणार कशी ? प्रथम आपण आपल्या पित्यांपुढे, नंतर नवऱ्यांपुढे व नवऱ्यांच्या नातेवाइकांपुढे नमलें पाहिजे. ही परिस्थिती तुम्हाला न्याय्य वाटते काय ? स्वतःच्या आत्म्यालाही आपला म्हणू न देणाऱ्या या कायद्याच्या पद्धतीपुढे तुम्ही निमुटपणे मान वाकवणार काय ? हा काय खरा कायदा की खरा धर्म ? मी मनूला दोष देत नाही कारण, शेवटी असेही असेल की त्याच्या बुद्धीप्रमाणे जे त्याला सर्वात उत्तम वाटलें, ते त्याने प्रामाणिकपणे केलें असेल. पण ती बुद्धी या विसाव्या शतकातील हिंदुस्तानात कोती पडत आहे." (५ एप्रिल १९३६ साली पूना लॉ कॉलेजमध्ये केलेलें भाषण)

ही अत्यंत प्रक्षुब्ध मते आहेत. पण पाश्चात्त्य प्रभावाने भ्रष्ट झालेल्या छांदिष्ट तरुणीची ती वडबड आहे असे म्हणून ती डावलता येणार नाहीत, किंवा त्यांच्याकडे दुर्लक्ष करता येणार नाही. हिंदू समाजातील स्त्रियांच्या उच्च स्थानाच्या कल्पित गोष्टींविरुद्ध आमच्या जवळ या निर्विवाद खऱ्या गोष्टी आहेत. या वक्त्या वंडखोर नाहीत हे सांगावयास नकोच. स्त्रियांना नालायक ठरवणाऱ्या सरंजामी पितृसत्ताक पद्धतीवर त्यांनी खरमरीत टीका केली असली तरी ती अजीवात नष्ट व्हावी असा प्रचार त्या कधीच करणार नाहीत. आणि तरीसुद्धा भारताच्या पौराणिक कायदे-पंडिताचा शब्द म्हणजे ब्रह्मवाक्य मानणाऱ्या आपल्या बहुतेक राष्ट्रीय पुढाऱ्यांपेक्षा त्या फारच पुढारलेल्या आहेत. हिंदू संस्कृतीचे गुणगान त्या गातात पण हे गुणगान आंधळे नाही. त्या गोष्टींकडे ऐतिहासिक दृष्टीकोनातून त्या पाहू शकतात, आणि गत संस्कृतीचे वास्तव मूल्यमापन करण्याचा हाच खरा मार्ग.

हजारो वर्षांपूर्वीच्या सामाजिक परिस्थितीत रूढ असलेलें कायदे आपल्या आजच्या परिस्थितीत योग्य ठरणार नाहीत, यावर आक्षेप घेणे म्हणजे इतिहास नाकारणे आहे. ते कायदे त्यांच्या वेळी चांगले असतीलही; मानवी युगाच्या सुरुवातीला असलेल्या सामाजिक अवस्थेच्या परिस्थितीत तर ते निश्चित उपयोगी असतील. पण म्हणून ते यावत्चंद्रदिवाकरी चांगले किंवा उपयोगी असतील असे सिद्ध होत

धैर्याचे वाटले तरी ते खरोखर त्यांना अपायकारकच आहे. त्यांच्या राजकीय स्वातंत्र्याच्या ध्येयाचे स्वरूप यामुळे उघडे पडते. व्यक्तिवाद हा राजकीय लोकसत्तेचा तात्त्विक आधार आहे. प्रातिनिधिक सरकार, लोकांना जबाबदार असलेले सरकार, लोकांची अधिसत्ता– हे सर्व राजकीय स्वातंत्र्याचे प्रकार आहेत. आणि समाजातील प्रत्येक व्यक्तीला जास्तीत जास्त स्वातंत्र्य व स्वतःची प्रगती करून घेण्याची संधी मिळेल अशी समाजाची घडण व कारभार करणे, आणि अशा व्यक्तींच्या हक्कांचे आणि स्वातंत्र्याचे रक्षण करण्याचे कार्य राष्ट्राने करणे या तत्त्वाच्या नैतिक व कायदेशीर अधिष्ठानावर हे प्रकार उभारलेले आहेत. तेव्हा व्यक्तिवादाला विरोध म्हणजे राजकीय लोकसत्तेला विरोध हे पर्यायानेच सिद्ध होते. जे कोणी तात्त्विक व सामाजिक दृष्टीने व्यक्तिवाद नाकारतात ते लोकसत्ताक स्वातंत्र्याचे प्रामाणिक पुरस्कर्ते होऊच शकणार नाहीत. याच न्यायाने भारतीय स्त्रीत्वाच्या आदर्शाचे समर्थन राजकीय लोकसत्तेची विचारसरणी धोक्यात आणते. म्हणून राजकीय स्वातंत्र्याकरिता झगडणे हे या बनावट भारतीय स्त्रीत्वाच्या आदर्शापुढे नमण्याशी सुसंगत ठरत नाही.

भारतीय स्त्रीधर्माच्या आदर्शाचे समर्थन करणारे म्हणतात की हे गूढ तत्त्व पितृसत्ताक कुटुंबपद्धतीच्या लोखंडी चौकटीतच सुस्पष्ट होऊ शकेल. पितृसत्ताक कुटुंबपद्धतीवर आधारलेल्या समाजाचा राज्यकारभार लोकसत्ताक असू शकणार नाही. जुन्या परंपरेच्या कुठल्याही एका विशिष्ट ध्येयाला चिकटून रहाणे हे शक्य नाही, कारण संस्कृतीचा प्रत्येक प्रकार हा विशिष्ट ध्येयवादाच्या विविध बाजूंनी परिपूर्ण बनलेला असतो. समान आर्थिक पार्श्वभूमी असलेले, अर्थव्यवस्थेची विशिष्ट पद्धत असलेले प्रकार ध्येयवादाने एकमेकांशी बांधलेले असतात. त्यामुळे ते बरोबरच टिकून रहातात किंवा नामशेष होतात. जुन्या पारंपरिक सामाजिक ध्येयांवर निष्ठा, ही आपल्याला राजकारणात पितृसत्तावाद मान्य करायला लावणार; आणि हे प्रतिगामी ध्येय आहे याबद्दल तर शंकाच नाही.

अशा या पितृसत्ताक सरकारच्या राज्याखाली हिंदुस्तानचा आर्थिक प्रश्न –लोकांची वाढती हलाखी आणि मोठ्या प्रमाणावरील बेकारी– सुटणे शक्य नाही. मग ते सरकार कितीही राष्ट्रीय असो. प्रत्येक राष्ट्र हे विशिष्ट पद्धतीच्या अर्थव्यवस्थेवर आधारलेले असते, आणि या अर्थव्यवस्थेच्या ठरलेल्या संबंधामुळे आर्थिक सुधारणेची शक्यता मर्यादित झालेली असते. पितृसत्ताक सरकार म्हणजे भांडवलशाही-पूर्व अर्थव्यवस्थेच्या संबंधांचे रक्षण करणारे सरकार. ही अर्थव्यवस्था सामाजिक उत्पादनाची मर्यादा संकुचित करणारी असल्यामुळे जनतेचे राहणीमान खालच्या पातळीवरच रहाणार. साधी रहाणी, दारिद्र्याचा चांगुलपणा, त्याग, आत्मसंयमन वगैरे वगैरे तत्त्वे ही भांडवलशाहीपूर्व दरिद्री अर्थव्यवस्थेची अंगभूत तत्त्वे आहेत.

रामराज्यासारखे प्रतिगामी स्वरूपाचे मावाप सरकार जर अस्तित्वात आले तर आपले आर्थिक प्रश्न सुटण्याऐवजी जास्तच चिघळतील हे सहज लक्षात येण्यासारखे आहे. खरे म्हणजे उत्पादनाची जी मूलभूत साधने (जमीन) आहेत त्यांच्या अर्थ-व्यवस्थेचे जुनेच संबंध टिकवून ठेवल्यामुळे हे प्रश्न मोठ्या प्रमाणावर निर्माण झाले आहेत. हल्लीची देशाची आर्थिक हलाखी ही खरोखर ब्रिटिश राज्य हे मावाप सरकार राज्य असल्यामुळे आली आहे. जर ही मावापपद्धती प्रगतीला हानीकारक असेल, तर मानलेल्या बापाने असहाय मुलाच्या संपत्तीच्या मोहाने, त्याचा विश्वस्त बनून, अमलात आणलेली पद्धती अधिकच हानीकारक असणार.

मुद्दा हा आहे की मावापपद्धती किंवा पितृसत्ताकपद्धती हे हिंदुस्तानचे राजकीय ध्येय होऊच शकणार नाही, कारण प्रगतीचा व भरभराटीचा मार्ग खुला होईल अशा योजना अमलात आणण्यासाठी आवश्यक असलेले लोकसत्ताक स्वातंत्र्यच लोकांना हवे आहे. या राजकीय प्रणालीशी सुसंगत नसलेली, स्त्रीधर्म, कुटुंबवाद, मानववाद यांची सांस्कृतिक व सामाजिक ध्येये, प्रतिगामी म्हणून टाकून दिलीच पाहिजेत. हा कुणाच्या मताचा किंवा आवडीनिवडीचा प्रश्न नाही तर ती एक ऐतिहासिक गरज आहे. हिंदुस्तानच्या लोकांना स्वतःचे प्रारब्ध घडवायचे असेल तर त्यांनी रूढ कल्पना व तत्त्वे यांची बंधने तोडलीच पाहिजेत. स्त्रियांना स्वातंत्र्य व समानताच काय पण साधा न्याय सुद्धा नाकारणारे लोक स्वतंत्र होऊ शकणार नाहीत. आणि हा नकार देणे म्हणजेच भारतीय स्त्रीधर्माच्या आदर्शाचा उदोउदो करणे होय.

✦ ✦ ✦

आणि तरीसुद्धा, आर्थिक हक्क, सामाजिक बंधविमोचन आणि स्त्रीपुरुष-संबंधांचा समान दर्जा मागणारी आधुनिक स्त्री आमच्या बऱ्याचशा राजकीय पुढाऱ्यांना खपू नये ही खरोखर निषेधार्ह गोष्ट आहे. त्यातील काही पुढारी, स्त्रियांपुढे भारतीय स्त्रीधर्माच्या गूढ आदर्शाची उच्चता ठेवून, त्यांची 'दिशाभूल' करणाऱ्या नवीन पाश्चिमात्य विचारांशी सामना देण्यास उभे ठाकले आहेत, तर दुसरे काहीजण या आदर्शाच्या खऱ्या स्वरूपाबद्दल काहीही शंका न घेता स्त्रियांना त्यांचे स्थान दाखवून दिले पाहिजे असे गृहीत धरून चाललेले आहेत. अर्थात तेसुद्धा पुराणकालीन पंडितांच्या अधिकारावरच विसंबून रहात आहेत. आणि आधुनिक जीवनाच्या मोहाचे खाचखळगे चुकवण्याची ज्यांना इच्छा असेल त्यांना अचूक मार्गदर्शक म्हणून या गतकालीन बुद्धिमत्तेला उचलून धरीत आहेत. फक्त हे करीत असताना, जुन्या आदरणीय परंपरेनुसार हिंदू समाजात स्त्रियांचे खरोखर काय स्थान आहे हे

ते प्रामाणिकपणे सांगत आहेत आणि भारतीय स्त्रीधर्माच्या आदर्शाचा फुगा फोडीत आहेत.

एका आधुनिक ऋषींनी हे पुराण ऐकवल्यानंतर दिल्ली वुइमेन्स लीग सभेला एका आधुनिक राजकारणपटूचे भाषण ऐकण्याचा मान मिळाला. ते म्हणजे, जीवनाच्या कुठल्याही क्षेत्रातील समानतेबद्दल निरर्थवादी म्हणून प्रख्यात असलेले भुलाभाई देसाई. एका स्तुतिपाठक राष्ट्रीय वृत्तपत्राने त्यांच्या भाषणाचा वृत्तान्त देताना असे म्हटले आहे की, ज्या आज्ञा मोडणाऱ्या स्त्रिया पापी पाश्चिमात्यांकडून उचललेल्या आधुनिक कल्पनांची छाप स्वतःवर वसवून घेत आहेत आणि पर्यायाने पौराणिक पंडितांनी, विशेषतः अमर आणि अचूक अशा मनूने त्यांच्यापुढे ठेवलेल्या आदर्शांपासून दूर जात आहेत त्यांना " काही औषधाचे डोस " त्यांनी पाजले.

श्री. देसाई यांनी "स्त्रिया व पुरुष यांमधील तेढीच्या फसव्या दाव्याबद्दल" खेद व्यक्त करून, " हा फसवा वाद हिंदुस्तानने पाश्चिमात्य गोटातून चुकीने उसना घेतला आहे " असे आग्रहाने प्रतिपादन केले. त्यांचा आग्रह असा दिसतो की हिंदू सामाजिक परिस्थिती, असा वाद उत्पन्न करण्यास कारणच देत नाही. हा आग्रह असे सुचवतो की हिंदू समाजात स्त्रिया पुरुषांपेक्षा कुठल्याही प्रकारे खालच्या दर्जाच्या नाहीत, त्यांचे संबंध इतके समान आणि संवादी आहेत की ते कुठल्याही विरोधाची शक्यता नाहीशी करतात. या वक्त्यांनी चालू किंवा गतकालीन स्त्रीजीवनांच्या वास्तविक गोष्टींकडे दुर्लक्ष करून असे सांगितले की "पुरुषाने स्त्रीला नेहमीच उच्च आणि उत्तम दर्जाचे स्थान दिले आहे." ही शुद्ध सरळ थाप आहे. आणि श्री. देसाईंनी ते स्वतःच कबूल केले आहे. पुरुषांनी मोठ्या उदारपणे बहाल केलेल्या, आणि स्त्रियांनी ज्याबद्दल संतुष्ट राहिले पाहिजे अशा या ["उच्च आणि उत्तम " दर्जाचे वर्णन करताना ते म्हणतात, "सूडबुद्धीने लढू नका; मी म्हणजे निव्वळ एक खेळणे आहे, एक जननयंत्र आहे, असे म्हणू नका; पुरुषांना स्वयंपाकघरात पाठवण्याचा प्रयत्न करू नका. तुमच्याशी कुणीही बरोबरी करू शकणार नाही असे जगातील महत्त्वाचे कार्य तुमचे आहे. जी गोष्ट तुमच्याकरिता नाही ती करण्याचा प्रयत्न करणे निरर्थक आहे. जीवनार्थाच्या झगड्याच्या आखाड्यात उतरू नका, तो पुरुषांकरिता आहे."]

असे बाबापुता करणे म्हणजे स्त्रियांना आर्थिक स्वातंत्र्य नाकारणे होय. तू माझ्याकरिता स्वयंपाक कर, माझ्या इस्टेटीला वारस म्हणून मुले जन्माला घाल आणि मी तुझे रक्षण करीन. अर्थातच, आपल्या उत्पादनाच्या साधनांची काळजी कोण घेत नाही ? पण जीवनाच्या झगड्याविषयी बोलायचे झाले तर, परोपकाराचा आव आणणारी पितृसत्ताक विचारसरणी स्त्रियांना या झगड्यापासून दूर ठेवू शकणार

नाही. फक्त काही मूठभर भाग्यवानच आपल्या वायकांना रिकामटेकड्या वसवू शकतील. पण वहुसंख्य स्त्रिया या भोवऱ्यात सापडल्या आहेत. त्या लाडक्या वाहुल्या नसून चालती वोलती मालमत्ता आहेत. देसाईंनी खालील मुद्दा मांडून आपल्या पितृसत्ताक गुलामगिरीचे वुद्धिवादी समर्थन करण्याचा प्रयत्न केला आहे. "निसर्गानेच त्यांना निरनिराळे घडवले आहे. निसर्गाची निर्मिती तुम्ही वदलू शकणार नाही. पुरुष हा पुरुषच रहाणार आणि तीच गोष्ट स्त्रियांची." असा शारीरिक वदल हवा असणारी जर कोणी स्त्री असेल तर ती देसाईंच्या वैयक्तिक ज्ञानाची गोष्ट आहे. स्त्रीपुरुषसंवंधाच्या समानतेच्या प्रश्नात असला उघड विपर्यास अंतर्भूत नाही. पण शारीरिक भेदाच्या नावाखाली सामाजिक असमानतेला मान्यता देणे ही निराळी वाव आहे. माणूस म्हणून स्त्रियांना समानता हवी आहे. आपल्याला अगदी वीट येईपर्यंत सांगितले जाते की, हिंदू संस्कृती, ईश्वरापुढे सर्व समान आहेत या तत्त्वावर आधारलेली आहे. स्त्रियांना काय आत्मा नाही? शिवाय, नैसर्गिक फरकाला आव्हान ही दुधारी तलवार आहे. कारण याच न्यायाने, "गोऱ्या मनुष्याच्या भाराच्या तत्त्वाचे समर्थनही तितकेच तर्कशुद्ध ठरेल. जर पुरुषाला स्त्रीचे रक्षण करण्याचा अधिकार असेल, धन्यवाद त्या शारीरिक फरकाला द्यायचा तर गोऱ्या जातीने आपल्या कातडीच्या रंगाच्या जोरावर तशाच प्रकारचा हक्क सांगणे हे तितकेच तर्कशुद्ध नाही काय ?

परंतु (स्वतःच्या सोवळेपणाला विघातक अशा पाश्चिमात्य शिक्षणाने) पितृसत्ताक संरक्षण किंवा तत्सम काल्पनिक फसवणुकीने फसलेल्या नाहीत अशा स्त्रिया हिंदुस्तानात असल्याचे दिसून येते. सभेच्या अध्यक्षांनी वहुधा ह्या स्त्रीधर्माच्या आदर्शाच्या सन्माननीय धर्मोपदेशकांना भयंकर वाटेल असे प्रतिपादन केले की, "स्त्रिया सर्व प्रकारच्या वंधनात ठेवल्या गेल्या आहेत हे नाकारता येणार नाही." अहंकारी सदुपदेशकांच्या कानाला गोड वाटणाऱ्या पण खरोखर सूचक उपरोधाने भरलेल्या शव्दात त्या म्हणाल्या, "जर सर्व माणसे अशा प्रकारचे आधुनिक ऋषी वनली असती तरी स्त्रियांची चळवळ झालीच नसती."

भारतीय स्त्रीधर्माचा आदर्श शोधण्याकरता आपल्याला उपेक्षित पुरातन ज्ञानभांडार उपसण्याची गरज नाही. उदाहरण म्हणून जर्मनीच्या कैसर किंवा हिटलरने शापिलेल्या पश्चिमेलाच तो आपल्याला सापडेल. जर्मनीच्या वादशहाने Kirche, Kueche, Kinder म्हणजे अनुक्रमे चर्च ( धर्म ), घराची देखभाल व मुले हे आदर्श स्त्रियांपुढे ठेवले होते. मध्यंतरीच्या दुर्दैवी प्रजासत्ताक राज्याखाली या पारंपरिक "आर्यन" आदर्शाकडे स्त्रियांनी पाठ फिरविली. हा शोचनीय अधःपात नात्सींनी आपल्या विशिष्ट पद्धतीने स्त्रीधर्माच्या इंडो-जर्मन आदर्शाचे पुनरुज्जीवन करून

थांबवला. कुठलाही वैयक्तिक हक्क न मानणाऱ्या हुकूमशाही राज्याचा वटहुकूम काढून स्त्रियांना परत स्वयंपाकघरात पाठवण्यात आले. लोकसत्ताक स्वातंत्र्याच्या कट्टया दुष्मनांनी अमलात आणलेल्या हिंदू सामाजिक तत्त्वज्ञानाचे सुद्धा हेच लक्षात घेण्यासारखे उदाहरण आहे. "लग्न करा आणि प्रसवा"-स्त्रियांकरिता हा हुकूम फक्त हिटलरच्या जर्मनीतच नव्हे तर मुसोलिनीच्या इटालीतही आहे. आधुनिक पाश्चिमात्य सुधारणेच्या क्षुद्र भौतिक बाह्य स्वरूपांनी तिच्या मानवी मूल्यांना झाकून टाकणारे ते हेच देश. या युद्धभोक्त्यांना मोठ्या प्रमाणावर तोफांना भक्ष पुरवण्याची गरज आहे. त्याकरिता स्त्रियांना दुसऱ्या सर्व क्षेत्रातून हाकलण्यात आले आहे. त्यांनी घरातच राहिले पाहिजे आणि पोरे जन्माला घातली पाहिजेत.

तेव्हा भारतीय स्त्रीधर्माचा आदर्श हा आध्यात्मिकतेतून स्फुरलेला नसून, ज्या सामाजिक तत्त्वज्ञानपद्धतीत पाश्चिमात्य संस्कृतीचे सर्वात वाईट स्वरूप सामावले आहे त्या पद्धतीत पूर्ण बसेल इतका भौतिक स्वरूपाचा आहे.

स्त्रियांना न्याय द्यावयाचा असेल तर हे पूर्णपणे लक्षात घेतले पाहिजे की हा आदर्श त्यांनी स्वतः निर्माण केलेला नाही तर तो, त्या काळातील क्षुद्र भौतिक गोष्टींनी विचलित झालेल्या "पुराण पंडित" पुरुषांनी त्यांच्यापुढे ठेवला आहे. त्या काळच्या परिस्थितीमुळे दिलेले स्थान स्वीकारणे स्त्रियांना भाग पडले. त्यांना दुसरा मार्गच नव्हता. पितृसत्ताक पद्धतीवर आधारलेल्या समाजात पुरुष हा स्वामी व मालक असतो. सर्व आर्थिक हक्क हिरावून घेतलेल्या स्त्रीला हार खावी लागणारच. शिवाय, स्त्रियांच्या आर्थिक पराधीनतेचे समर्थन करण्यासाठी आणि त्यांच्या, चालती बोलती मालमत्ता व जननयंत्रे या स्थानाची महती गाण्यासाठी, धर्म, अध्यात्मशास्त्र आणि कल्पित कथा यांच्या रूपाने चाललेला प्रचार होताच. अशा परिस्थितीत पुढे ठेवलेल्या ध्येयांवर विश्वास ठेवण्यास त्या सहजच कबूल झाल्या. कालांतराने त्यांचा गौण दर्जा, परस्वाधीनता, सामाजिक मताधिकाराचा अभाव, घरगुती गुलामगिरी, वेश्यागिरी या सर्व गोष्टींनी स्त्रीधर्माच्या गूढ आदर्शातून स्फुरलेल्या खुषीच्या आत्मसमर्पणाचे स्वरूप धारण केले. या गुलामांना त्यांच्या शृंखलेच्या झगमगत्या मुलाम्याने यांच्या गुलामगिरीतच सुखी बनविले.

जेव्हा आर्थिक स्वातंत्र्याची मागणी करण्याइतक्या व आपले खेळणे किंवा जननयंत्र बनवले आहे अशी तक्रार करण्याइतक्या स्त्रिया विकृत नव्हत्या तो काळ घरातील संवादित्वाचा आणि सामाजिक ऐक्याचा सुवर्णकाळ होता. सीता सावित्रींच्या पौराणिक कथांनी फसून, (रूढ मतांच्या अट्टाहासाप्रमाणे) धार्मिक आचारांचे पालन करणे, घर सांभाळणे आणि पुरुषाच्या इच्छेनुसार मुलांना जन्म देणे हे त्यांचे "नैसर्गिक" कार्य त्यांनी मोठ्या निष्ठेने व्यवस्थित पार पाडले.

पण तो सुवर्णकाल आता भूतकालात जमा झालेला आहे. त्या काळाचा आधार अशी पितृसत्ताक कुटुंबपद्धती मोडून पडली आहे. त्याची साफसुफी झाली म्हणजे या जागेवर नवीन सामाजिक बांधणी उभारणे शक्य होणार आहे. बऱ्याचशा स्त्रिया अजून आपल्या आध्यात्मिक संस्कृतीच्या विशिष्ट आनुवंशिक भ्रामक समजुतींच्या खड्ड्यात गाडल्या गेल्या आहेत आणि त्या अज्ञानाच्या आनंदात सुख मानत आहेत. हे सुख पूर्णपणे उपभोगू न शकणाऱ्या काही स्त्रिया आहेत, पण कालौघाने प्रतिष्ठा पावलेल्या भ्रामक समजुतीत त्या अजूनही सरावाने वावरत आहेत. परंतु ज्यांना, या परंपरेने वेष्टिलेल्या, कल्पित गोष्टींनी उच्चतेस चढविलेल्या आणि गूढ काव्यगीतात गोवलेल्या या आदर्शाच्या फसव्या स्वरूपाची जाणीव झाली आहे त्या आपल्या घरातील व समाजातील स्थानाच्या स्वरूपाबद्दल जागरूक झाल्या आहेत. त्यांची संख्या वाढत आहे. आधुनिक शिक्षणाची वाढ हे एकच या जागृतीचे कारण नव्हे. याचे मुख्य कारण असे आहे की, ज्या मागासलेल्या समाजपद्धतीच्या सांस्कृतिक कल्पनांच्या आवरणांत, गूढ तत्त्वांच्या नावाखाली, चालती बोलती मालमत्ता बनलेल्या स्त्रियांचा गौण दर्जा झाकून गेला, ती समाजपद्धती हळुहळू पण निश्चितपणे ऱ्हास पावत आहे.

या गूढ तत्त्वांनी फसल्या न जाणाऱ्या स्त्रियांची संख्या आता वाढत आहे, आणि त्या आपल्याला, स्वतःचा विचार स्वतः करण्यास समर्थ असलेल्या व्यक्ती म्हणून वागवा अशी मागणी करीत आहेत. तेव्हा पुरुषांच्या पारंपरिक मालकीपणाचे समर्थन, देसाईनी पाजलेल्या "औषधाचे डोसांच्या" कल्पनांच्या साध्या सरळ भाषेत केले गेले आहे. "पुरुषाने स्त्रीला नेहमीच उच्च व उत्तम दर्जा बहाल केला" हे जर खरे असेल तर "त्यांच्यातील तेढीचा" अर्थ कसा लावणार ? स्त्रिया कृतघ्न आहेत आणि त्यांना याची किंमत नाही, असा याचा उघड अर्थ होतो. आधुनिक स्त्रीच्या मागण्यांना आणि महत्त्वाकांक्षेला कट्टर विरोध करणाऱ्यांनासुद्धा हिंदू स्त्रियांविरुद्ध असा धादांत खोटा आरोप करणे कठीण जाईल. शिवाय "स्त्रीपुरुषामधील तेढ हे एक बुजगावणे आहे. जर कुठे विरोध असेल तर तो, जी माणसे स्त्रियांच्या वृत्तीबद्दल तक्रार करतात त्यांचाच आहे. ज्या जुन्या वळणाच्या लोकांना आधुनिक स्त्रीच्या कल्पना आणि ध्येये यांच्याबद्दल सहानुभूती नाही त्यांच्याबद्दल त्यांच्या मनात तेढ" असणे स्वाभाविकच आहे. स्त्रियांच्या तेढीची, या देवतांच्या बंडाची, त्याच्या सूडाच्या संग्रामाची भीती, हे पुरुषांच्या दुष्ट बुद्धीचेच द्योतक आहे. युगानुयुगे स्त्रियांना अन्यायाने वागवल्याने त्यांच्यात सूड वृत्ती वाढण्याची शक्यता आहे या गोष्टीची जाणीव या पुरुषांना घाबरवून सोडीत आहे.

काही असले तरी आधुनिक स्त्रिया ह्या पुरुषांविरुद्ध नव्हे तर ज्या विशिष्ट सामाजिक प्रथेमुळे व आर्थिक विषमतेमुळे त्यांना पुरुषाच्या वरचष्म्याखाली रहावे

लागत आहे त्या वरचष्म्याविरुद्ध बंड करीत आहेत. ही स्त्रीपुरुषांची एकमेकातील लढाई नव्हे. ही एक मूर्खपणाची कल्पना आहे. स्त्रीपुरुषांमध्ये विरोध असणे शक्य नाही. लैंगिक भावना ही दोघांमधील आकर्षणाची शक्ती आहे. निव्वळ लैंगिक संबंधात स्त्री व पुरुष या दोघांची सारखीच आवश्यकता असल्यामुळे विषमतेला तेथे स्थानच नाही. सर्वसाधारणपणे पुरुषाचे जितके स्त्रीशिवाय चालणार नाही तितकीच स्त्रीलाही पुरुषाची गरज असते. विषमता आहे ती स्त्री आणि पुरुष यांच्या व्यक्ती म्हणून असलेल्या सामाजिक संबंधात, आधुनिक स्त्रीचे बंड हें 'पुरुषांविरुद्ध स्त्रीचे बंड' नव्हे, तर सामाजिक व्यक्तींच्या एका वर्गाचे दुसऱ्या वर्गाशी, दडपल्या गेलेल्यांचे दडपून टाकणाऱ्यांशी, अगदी खरे बोलायचे म्हणजे त्या दडपून टाकणाऱ्या परिस्थितीशी आहे. ही दडपून टाकणारी सामाजिक आणि कौटुंबिक परिस्थिती स्त्री-पुरुषांतील नैसर्गिक समानतेच्या संबंधांशी जुळणारी नाही.

म्हणून आधुनिक स्त्रियांच्या सभेत "सूडबुद्धीने लढू नका!" असे सांगणे अगदी अप्रस्तुत आहे. परंतु वक्त्यांचेच मन त्यांना खात असावे असे त्यांच्या पुढील कळकळीच्या उपदेशावरून सिद्ध होते. ते सांगतात, "मी म्हणजे निव्वळ एक खेळणे आहे. एक जननयंत्र आहे असे म्हणू नका." म्हणजे आपले सामाजिक तत्त्वज्ञान स्त्रियांना एक खेळणे किंवा यंत्र बनवते ही गोष्ट ते नाकारत नाहीत. उलट आपल्या श्रोत्यांना ते असे सांगतात की कुठलाही पुरुष बरोबरी करू शकणार नाही अशा आणि पुरुषांनीच बहाल केलेल्या "उदात्त आणि उत्तम दर्जावर" स्त्रियांनी समाधान मानावे आणि "ते उच्च कार्य" करीत रहावे. हे कार्य कोणते? तर मुलांना जन्म देणे – जननयंत्र बनणे! आणि हाच तो "उच्च व उत्तम दर्जा", आणि भारतीय स्त्रीधर्माच्या गूढ आदर्शाचे खरे सार! कारण या प्रतिगामी आदर्शाचा पुरस्कार करणाऱ्यांच्या मते ज्या स्त्रिया या "उच्च कार्यात" संतुष्ट होत नाहीत त्या पाश्चिमात्यांकडून उसनवार घेतलेल्या फसव्या तत्त्वांना भुललेल्या आहेत. पण हे कार्य म्हणजे काही पुरुषांची देणगी नाही आणि कुठल्याही सामान्य स्त्रीला यापासून दूर रहाण्याची थोडीशीसुद्धा इच्छा नाही. पितृसत्ताक कुटुंबसंस्थेच्या चौकटीत – ज्या प्रकारची कुटुंबसंस्था सामाजिक प्रगतीच्या हिंदू विरोधकांनी आदर्श मानली त्या कुटुंबसंस्थेच्या चौकटीत– स्त्रिया आपले नैसर्गिक कार्य, स्वतंत्र व्यक्ती म्हणून नव्हे तर पुरुषांच्या सोयीसाठी त्यांनी घालून दिलेल्या नियमांनुसार करीत असत. स्त्रियांचे जन्मसिद्ध स्वातंत्र्य हिरावून घेणाऱ्या या नियमांविरुद्ध हे आधुनिक स्त्रियांचे बंड आहे.

हे स्त्रीपुरुषांमधील युद्ध नव्हे. मागणी आहे ती सामाजिक संबंधातील स्त्रीपुरुषांच्या समानतेची. गतकालीन स्त्रियांना हा नैसर्गिक हक्क नसल्याचे कधी

जाणवले नाही या मूर्ख सबबीवर जेव्हा तो नाकारला जातो तेव्हा थोडी कटुता येणारच. पण ही मागणी स्त्रियांच्या आर्थिक परिस्थितीत मूलतः बदल झाल्यामुळे वाढत आहे, हे जे कोणी पहात नाहीत, किंवा पहाणार नाहीत अशा प्रतिगामी पुरुषांवरच ह्या तप्त वातावरणाची जबाबदारी पडते. इतर पुढारलेल्या देशांपेक्षा हिंदुस्तानात, दुर्दैवाने अधिक काळ टिकून राहिलेली सामाजिक संबंधाची जुनी पद्धती मोडणे अपरिहार्य असल्यामुळे हा बदल घडून आला आहे.

◆ ◆ ◆

हिंदू रूढीप्रमाणे, स्त्रीधर्माचा आदर्श लग्न, पत्नीत्व व मातृत्व यात सामावलेला आहे. पण या "न्याय्य" आदर्शांच्या पूर्तीचा एकुलता एक मार्ग जास्त जास्त स्त्रियांना बंद होत चालला आहे. न्याय व नीतीची जाणीव तीक्ष्ण करणारी आर्थिक परिस्थिती, धार्मिक मान्यता पावलेल्या बहुपत्नीत्वाच्या पद्धतीविरुद्ध बंड करीत आहे. आज फारच थोडे लोक एकापेक्षा अधिक बायका पोसू शकतात. बहुपत्नीत्वाची पद्धती मागे पडल्यामुळे बहुसंख्य उपवर मुलींचा प्रश्न निर्माण होणार आहे. तो अजून प्रत्यक्षात भेडसावत नसला तरी तो बीजरूपाने वावरत आहे आणि त्याची पावले वाजत आहेत. या मृतप्राय सामाजिक पद्धतीला टाकून देण्याच्या पार्श्वभूमीतून, स्त्रियांची पत्नी आणि माता यापेक्षा जास्त काहीतरी बनण्याची इच्छा वाढत आहे. काही थोड्या स्त्रिया सोडल्यास बहुतेकांना ती जाणवत आहे. पुष्कळ तरुणांना, विशेषतः मध्यमवर्गीय सुशिक्षित तरुणांना, लग्न ही एक कठीण जबाबदारी, एक धोक्याची जोखीम होत चालली आहे. बेकारी आणि सर्वसाधारण आर्थिक दिवाळखोरी, शहाण्या माणसाला बायको आणि वाढत्या संसाराची जबाबदारी घेण्यास निरुत्साही करीत आहे, हे साहजिकच आहे. या सामाजिक पराङ्गमुखतेवर एकत्र कुटुंबपद्धती काहीही उपाय करू शकत नाही. अशा या परस्वाधीन बनलेल्या आणि हीन दर्जाला पोचलेल्या खालच्या मध्यम वर्गाच्या बाबतीत एकत्र कुटुंबपद्धती फक्त नावापुरतीच उरली आहे. तिचा सामाजिक हेतूच नाहीसा झाला आहे.

सामायिक वाडवडिलार्जित इस्टेटीची पद्धती नष्ट होण्याबरोबर एकत्र कुटुंब-पद्धती आपोआपच संपुष्टात येते. जेव्हा सामायिक मालकीसाठी काही इस्टेटच नसते, म्हणजे जेव्हा तिचा आर्थिक पायाच उखडला गेलेला असतो तेव्हा ही पद्धती चालू ठेवण्याचा प्रयत्न करणे म्हणजे, स्वखुषीने नव्हे तर रूढीला धरून म्हणून ती पद्धती मान्य करणाऱ्या व्यक्तीवर तिचा अवास्तव जास्त बोजा पाडणे होय. हा कसाबसा चालवलेला संसार म्हणजे वस्तुस्थितीचे निदर्शकच होय. बहुसंख्य व्यक्तींची पैसे मिळविण्याची शक्ती सर्वसाधारणपणे मर्यादित असल्यामुळे थोड्याच वेळात

हा भार त्यांना असह्य होतो. जी पद्धती सर्व समाजाचे राहणीमान खाली आणण्यानेच केवळ काही काळ निवळ तांत्रिकपणे टिकू शकेल, त्या या मृतप्राय झालेल्या पद्धतीला उखडून टाकलेच पाहिजे. जेव्हा एकादी रूढ पद्धती कुटुंबातील एका अगर दोन माणसांना त्यांच्या व्यक्तिगत मिळकतीत बसेल त्यापेक्षा अधिक लोकांचा निर्वाह करण्याची सक्ती करते तेव्हा ती पद्धती नष्ट करणे अपरिहार्यच असते. या भंग पावलेल्या कुटुंबपद्धतीच्या चालीरीतींना चिकटून राहण्याची संवय मध्यमवर्गाला महाग पडत आहे. त्या सबंध वर्गाच्या शारीरिक ऱ्हासाला ती कारणीभूत होत आहे. आणि सबंध देशाच्या दृष्टीनेही ती अतिशय खेदकारक गोष्ट आहे.

तेव्हा कितीही सदिच्छा असली तरी हा न पेलणारा बोजा घेऊन कुणीही फार पुढे जाऊ शकणार नाही. कदाचित् मोठा भाऊ आपल्या एकाददुसऱ्या भावाचे शिक्षण व उदरनिर्वाह कसाबसा करील, पण त्यांचे त्यांच्या बायकामुलांसह पालन-पोषण करणे हे बहुतांशी त्याच्या आटोक्याबाहेरचेच आहे. धाकटया भावांनी आपल्या मिळकतीतून घरखर्चाचा वाटा उचलावा अशी त्यांच्याकडून अपेक्षा असते. ते आपल्या मोठ्या भावांवर कायमचे अवलंबून राहू शकणार नाहीत. त्यांना स्वतःला ती गोष्ट लाजिरवाणी वाटते आणि त्यांच्या मोठ्या भावाला तो अती झालेला असह्य बोजा ठरतो. सुशिक्षित मध्यमवर्गीय तरुणाची बेसुमार बेकारी समाजातील एकत्र कुटुंबपद्धतीचे राहिलेले अवशेषही उखडून काढल्याशिवाय रहाणार नाही. बहुतेक मोठे भाऊ, पुष्कळदा आपल्या स्वतःच्या मुलांच्या भविष्याचे नुकसान करून, आपल्या धाकटया भावांच्या शिक्षणाची जबाबदारी, पैसा गुंतविण्याच्या दृष्टीने, घेतात हे साहजिकच आहे. पण आता शिक्षणाने नोकरी हमखास मिळेलच अशी खात्री नसताना ते आपला, स्वकष्टार्जित पैसा अशा जोखमीच्या अनिश्चित मिळकतीत गुंतवण्यास का कू करतील यात नवल नाही. लवकरच कमवायला लागू या अपेक्षेने होणाऱ्या तरुणांच्या लग्नांची संख्या कमी होईल. आपण एकत्र कुटुंबाच्या कक्षेबाहेरील एक कंगाल व्यक्ती असल्याचे तरुण लोकांना आढळून येईल आणि अशा तरुणांची संख्या भराभर वाढू लागेल. त्यांच्या लग्नाचा प्रश्नच येणार नाही. या आणीबाणीच्या परिस्थितीत आधीच हजारो लोक सापडले आहेत. त्यामुळे कुठलाही जबाबदार पण बेकार सुशिक्षित तरूण लग्नाचा आणि संसार वाढवण्याचा विचार करणार नाही.

या परिस्थितीची दुसरी बाजू कोणती ? बहुसंख्य तरुणांना लग्न करणे अशक्य म्हणजे तेवढ्याच मोठ्या संख्येच्या स्त्रियांना पत्नीत्वाची व मातृत्वाची शक्यता नाही. त्या काय करणार आहेत ? रूढ हिंदू पद्धतीत त्यांना स्थान नाही. बहुपत्नीत्वही यापुढे त्यांना सामावून घेऊ शकणार नाही. त्यांच्या वर्गाचे फारच थोडे लोक आज एकापेक्षा अधिक बायकांचा सांभाळ करू शकतील. याशिवाय सुशिक्षित मध्यम

वर्गाची ही नवीन प्रकारची बहिष्कृत स्त्रीजात स्वतःही थोडीफार सुशिक्षित आहे, त्यामुळे धर्म व रूढी यांनी सम्मत केलेल्या कुठल्यातरी एकाद्या योजनेने तिची विल्हेवाट लावता येणार नाही. अशा योजनांचे एक उदाहरण म्हणजे देवळात देवदासी बनणे, किंवा दुसरे म्हणजे मृत्युपंथाला लागलेल्या एकाद्या 'योग्य' माणसाशी डझनावारी स्त्रियांनी शिष्टाचार म्हणून लग्न लावणे. आणि तरी-सुद्धा, या दुसऱ्या प्रकारात, त्यांचे विधवा पत्नीत्वाचे वैभव, आपले मातृत्वाचे सर्वात मोठे वैभव हिरावून घेतले गेले आहे याची जाणीव विसरवू शकणार नाही. पण या असल्या अमानुष आणि अनैतिक वागणुकीला स्त्रिया मान तुकवणार नाहीत ही आनंदाची गोष्ट आहे. त्या प्रत्यक्षात नसल्या तरी मुळात बंडखोर आहेत. त्यांच्यापैकी पुष्कळांना, जीवनाच्या नवीन परिस्थितीत जुन्या सामाजिक आणि घरगुती परंपरा पूर्णपणे विसंगत आहेत याची जाणीव झाली आहे. या स्त्रियाच त्यांच्या चळवळीचे स्फुल्लिग आहेत. आणि त्यांचीच, पाश्चिमात्यांकडून उसन्या घेतलेल्या झगमगीत कल्पनेबद्दल कानउघाडणी केली जात आहे. पण ज्या जीवनाच्या खऱ्या परिस्थितीत त्यांना जगावयाचे आहे त्यातून निर्माण झालेला प्रश्न त्या विचारीत आहेत. त्यांना पत्नी व्हावयाचे आहे, माता व्हावयाचे आहे; पण या नैसर्गिक इच्छेचा मार्ग अडचणींनी भरला आहे आणि त्या अडचणी दररोज वाढत आहेत हे त्यांना दिसत आहे. त्यांना जे पती म्हणून आवडतील त्या प्रकारचे अनेक पुरुष आर्थिक कारणामुळे लग्नाची जोखीम पत्करण्यास असमर्थ झालेले आहेत. उत्तम मित्र आणि आवडता जोडीदार बनू शकतील असे योग्य पती संसाराच्या गरजा पुरवण्यासही योग्य असतील असे नाही. अशा परिस्थितीत पत्नी आणि माता बनण्यासाठीच स्त्रियांना काही तरी अधिक करणे भाग आहे. त्या सर्व मताधिकार असलेल्या, आणि या दर्जाबरोबर येणारे सर्व हक्क व जबाबदाऱ्या स्वीकारलेल्या व्यक्ती बनल्या पाहिजेत, नाहीतर त्या स्त्रीधर्माची नैसर्गिक ध्येये परिपूर्ण करू शकणार नाहीत.

आर्थिक स्वातंत्र्याच्या अभावी गृहव्यवस्थेतील सर्वाधिकार म्हणजे निव्वळ फसवेगिरी आहे. पूर्ण मताधिकार असलेल्या नागरिक स्त्रियाच फक्त खऱ्या गृहदेवता बनू शकतील. स्त्रीधर्माची नैसर्गिक ध्येये, आधुनिक स्त्रीच्या अधिक उच्च ध्येयांशी विसंगत नाहीत. घर असणे हाच प्रश्न जिथे जास्त जास्त स्त्रियांना भेडसावीत चालला आहे, अशा वेळी त्याचाच आदर्श पुढे ठेवणे व्यर्थ आहे. यापुढे, आदर्श घर फक्त पुरुष निर्माण करू शकणार नाहीत. निढळाच्या उत्पन्नावर जगण्याची ज्यांना जरूरी नसते अशा फार थोड्या भाग्यवानांकरिता तो अधिकार राखून ठेवला आहे. परंतु बहुसंख्य लोक, विशेषतः मध्यमवर्ग, हा व्यक्तिगत मिळकतीच्या शक्तीवर अवलंबून असतो, आणि बहुतेक बाबतीत, ही शक्ती, लहान कुटुंबाचे सुद्धा योग्य राहणीमान राखण्यास

अपुरी पडते. स्त्रीपुरुषांमधील सहकार्य जास्त व्यापक करणे हा या अडचणीतून सुटण्याचा मार्ग आहे. जर तरुणांना सुखी घरे व निरोगी कुटुंबे निर्माण करावयाची असतील तर स्त्रियांनी आर्थिक जबाबदारीचा वाटा उचललाच पाहिजे. जर कोठार रिकामे असेल तर त्या स्वयंपाक कसला करणार ? नि:सत्त्व आहारावर पोसल्या जाणाऱ्या मुलांच्या काळजीने त्यांचे जीवन गांजून कडवट होणार असेल तर त्या मातृत्वात आनंद तरी कसला ? आतापर्यंत पुरुषांची मानली गेलेल्या जबाबदारीचा वाटा जर स्त्रियांनी उचलावयाचा असेल तर रूढीने पुरुषांकरिता राखून ठेवलेले हक्क स्त्रियांनाही द्यावे लागतील. आर्थिक दृष्टया स्वतंत्र होण्याचा त्यांना नैतिक आणि कायदेशीर हक्क आहे. याचा अर्थ, बहुतेक बाबतीत एक निव्वळ कायद्याचा उपचार ठरेल असा फक्त वारसा हक्क त्यांना मिळणे एवढाच नव्हे तर स्त्रियांना आतापर्यंत बंद असलेल्या जीवनक्षेत्रात त्यांना प्रवेश देणे हा होय. यापुढे त्यांचे कार्यक्षेत्र घरापुरतेच मर्यादित रहाणार नाही. घराचे घर हे नाव सार्थ करण्यासाठी त्यांना घराच्या मर्यादा ओलांडल्याच पाहिजेत. पूर्वी प्रत्येकाची कार्ये वेगवेगळ्या संबंधाखाली होऊ शकत होती ती कार्ये करण्यास आज स्त्रीपुरुषांच्या सामाजिक समानतेची गरज आहे. कुटुंब, अर्थातच निराळ्या स्वरूपांतील कुटुंब, टिकवण्याकरिता, स्त्रीला सामाजिक व्यक्ती म्हणून मान्यता देण्याची गरज आहे. ही नवीन कुटुंबपद्धती विस्कळित झालेल्या एकत्र कुटुंबपद्धतीची जागा घेणारच. या कुटुंबपद्धतीत व्यक्तींचा परस्पर खुषीवर आधारलेला संयोग आणि स्त्रीपुरुषांना व्यक्ति म्हणून समान सामाजिक दर्जा यांचा समावेश होईल.

समाजाची मूळ उभारणीच व्यक्तींच्या परस्पर खुषीच्या संयोगावर झाली आहे. परंतु जुन्या पितृसत्ताक कुटुंबपद्धतीने व्यक्तीलाच झाकून टाकले. जो समाज व्यक्तीला दडपून टाकतो तो त्याच्या मूळ उद्देशाच्याच विरुद्ध जातो. समाज हा व्यक्तींनीच निर्माण केलेला व व्यक्तीचाच बनला असल्यामुळे व्यक्ती, मग ती पुरुष असो की स्त्री असो, ती फक्त कुटुंबाच्याच नव्हे तर खुद्द समाजाच्याही पूर्वीची आहे. तेव्हा कुटुंबाचा घटक म्हणून व्यक्तीला मान्यता ही एक ऐतिहासिक गरज आहे. हे एक प्रगतीचे पाऊल आहे आणि बदललेल्या सामाजिक परिस्थितीच्या दडपणामुळे ते पुढे टाकलेच पाहिजे.

[स्त्रियांना आर्थिक क्षेत्रात स्वातंत्र्य म्हणजे साहजिकच पुरुषांबरोबर काही प्रमाणात स्पर्धा. पण या स्पर्धेत विरोध असणार नाही. कारण, सर्वसाधारणपणे व्यापक क्षेत्रात स्त्रीपुरुषांमधील परस्पर साहाय्याचेच ती द्योतक असेल. समाजाच्या स्वतंत्र कार्यकारी घटक म्हणून स्त्रिया पुरुषांच्या पूर्ण भागीदार होतील; आणि

त्यांच्यात खरी मैत्री निर्माण होईल. ही कुटुंबसंस्था जास्त खात्रीच्या आर्थिक पायावर उभारल्यामुळे ती पूर्वी कधी नव्हती इतकी सुखी व निरोगी होईल.]

✦ ✦ ✦

पाश्चिमात्य स्त्रियांवर टीका करणाऱ्या हिंदू टीकाकारांना हे माहीत नाही की त्या स्त्रियांनी घराच्या रूढ चाकोरींच्या बाहेर कार्यक्षेत्र वाढवल्यामुळे, भांडवलशाहीने सुरुंग लावला तरी त्यांची कुटुंबसंस्था शाबूत राहिली. ह्याबद्दल खरे म्हणजे त्यांना धन्यवाद दिले पाहिजेत. हे अज्ञानी टीकाकार घटस्फोटाचा निषेध करतात, पण आधुनिक पाश्चिमात्य देशातील स्त्रीपुरुषांमधील परस्पर साहाय्यासंबंधी त्यांना काहीही माहिती नाही. त्या स्त्रियांनी घराबाहेरच्या क्षेत्रात कामे केली नसती तर तेथे चालू असलेल्या मोठया प्रमाणावरील बेकारीत हजारो कुटुंबे उपासमारीने नाश पावली असती. जेव्हा पुरुषांना सक्तीने रिकामे बसण्याची पाळी येते तेव्हा असंख्य स्त्रिया भाकरी मिळवणाऱ्याचे काम करतात. या प्रकारचे परस्पर साहाय्य स्त्रीपुरुषांच्या सामाजिक समानतेची संपूर्ण कबूली मागते. जे साहचर्य स्त्रीपुरुषांच्या भिन्न भिन्न क्षेत्रांतील कार्यविभागणीच्या पारंपरिक कल्पनेला मानत नाही ते खरे साहचर्य. आणि जेव्हा पतिपत्नीमधील रक्षणकर्ता आणि रक्षण करून घेणारा हे संबंध नाहीसे होतील तेव्हाच हे खरे साहचर्य शक्य होईल.

फक्त पाश्चिमात्य देशातच बहुसंख्य स्त्रियांना कुटुंबाच्या चरितार्थाचा आर्थिक जबाबदारीचा वाटा उचलणे भाग पडले आणि घराबाहेर पुरुषांच्या बरोबरीने कार्य करावे लागले असे नाही. हिंदुस्तानात सुद्धा स्त्रियांची हीच परिस्थिती आहे. फक्त, त्या जी आर्थिक जबाबदारी स्वीकारतात त्याच्या बदल्यात कायद्याने त्यांना मिळालेच पाहिजेत असे त्यांचे हक्क मात्र त्यांना नाकारले गेले आहेत. त्या कष्ट करतात, आणि पर्यायाने कुटुंबाच्या चरितार्थाला हातभार लावतात. पण त्यांना स्वतंत्र व्यक्तित्व नसते. त्यांना गळ्यातली धोंड म्हणून पशूसारखे वागवले जाते. खालच्या जातीच्या, विशेषतः शेतकरीवर्गाच्या स्त्रिया या वर्गात मोडतात. हा हिंदू स्त्रीधर्माचा गौरवलेला आदर्श त्यांच्याकरिता नाही. बहुसंख्य हिंदू स्त्रियांच्या दृष्टीने हा आदर्श म्हणजे पुरुषांची उघड उघड, चालती बोलती मालमत्ता— शुद्ध गुलामगिरी.

म्हणून देसाईंनी जेव्हा स्त्रियांना "पुरुषांकरिता असलेल्या जीवनार्थाच्या झगडयाच्या आखाडयात" उतरू नका असा उपदेश केला तेव्हा आपण कशाबद्दल बोलतो आहोत हेच त्यांना कळले नाही. या आपल्या आधुनिक ड्राकोने (Draco) केलेल्या उपदेशात शहाणपणा असो वा नसो, पण जीवनार्थाच्या झगडयात, फार पुरातन काळापासून आजतागायत खोल रुतलेल्या या खालच्या वर्गाच्या बहुसंख्य

हिंदू स्त्रियांच्या दृष्टीने त्यात काही अर्थ नाही. अगदी पौराणिक सुवर्णयुगात सुद्धा स्वेच्छेने किंवा विकृत विरोधाच्या भावनेने नव्हे तर आत्यंतिक अपरिहार्यतेमुळे त्या या झगडयात पडल्या. आणि आता समाजाच्या वरच्या थराच्या, मध्यमवर्गाच्या स्त्रियाही त्यात ओढल्या जात आहेत. स्त्रियांच्या रक्षणाच्या मोबदल्यात, कुटुंबाच्या मालक व यजमानपणाच्या स्थानाचा जो वादग्रस्त हक्क पतींना मिळाला आहे, ते पारंपरिक रक्षणच त्यांच्याकडून मिळणे कठीण होत चालले आहे असे जास्त जास्त स्त्रियांना आढळून येत आहे. जेव्हा हजारो तरुण स्वतःचा काही दोष नसताना जीवनार्थाच्या लढाईत पराभूत होत आहेत तेव्हा स्त्रियांच्या निदान तेवढयाच संख्येला स्वतःच्या पायावर उभे राहिलेच पाहिजे. मध्यमवर्गीय स्त्रियांच्या वाढत्या संख्येला स्वेच्छेने नव्हे तर परिस्थितीनेच या जीवनार्थाच्या आखाडयात उतरावे लागेल. त्यांना नुसती ताकीद देणे सोपे आहे; पण याला उपाय काय ? "अबलांना" या जीवनार्थाच्या लढाईच्या परिसरापासून दूर ठेवण्याची काळजी मोठी दयाळूपणाची आणि उदारतेची वाटेल. पण अशा क्षुद्र बडबडीने फक्त भोळेभाबडेच फसू शकतील. या आधुनिक 'पितृत्वा'चा अर्थ चिकित्सक मनाला सहज समजेल. आणि तो म्हणजे स्त्रियांना आर्थिक स्वातंत्र्य नाकारणे हा होय. परिणामी, स्त्रियांना हेच सांगितले आहे की, तुम्ही पुरुषांचे घर सांभाळा, आमच्या इस्टेटीला वारस निर्माण करा, आणि ते तुमचे रक्षण करतील. पुरेसे भाग्यवान असलात तर तुमचे लाडसुद्धा केले जातील. " म्हणजे स्त्रिया खेळणे म्हणून वापरण्याचे एकादे अपवादात्मक उदाहरण सोडल्यास त्यांचा जननयंत्रे बनण्यासाठी उपभोग घ्यावयाचा, पण त्याबद्दल त्यांची तक्रार असता कामा नये, कारण ते त्यांचे नैसर्गिक कार्य आहे, हेच निराळया शब्दात सांगून त्यांनी आपले खाण्याचे दात उघड केले आहेत.

खरा कसोटीचा प्रश्न असा आहे की, पुरुषांच्या फायद्याचा असणारा रक्षणाचा हा वादग्रस्त हक्क सध्याच्या हिंदुस्तानात किती स्त्रियांना मिळू शकेल ? आणि हे रक्षण प्रामाणिकपणे आणि निश्चितपणे किती पुरुष देऊ शकतील ? दोनही प्रश्नांचे उत्तर एकच : अत्यल्प. ही वस्तुस्थिती आहे. आणि ही वस्तुस्थितीच, स्त्रीपुरुषसंबंधात क्रांती घडवून आणील, व्यक्ती म्हणून स्त्रियांना पुरुषांइतकीच मान्यता देण्याची सक्ती करील, आणि जी कुटुंबपद्धती इतिहासात जमा झाली आहे आणि केवळ आदर्श मानल्याने जी वाचू शकणार नाही अशा जुन्या मोडकळीस आलेल्या कुटुंबपद्धतीच्या ठिकाणी नवीन प्रकारची कुटुंबपद्धती उभी करील.

स्त्रियांचा मोठा भाग असलेल्या कामगार वर्गाच्या स्त्रियांनी, वाजवीपेक्षा अधिक किंमत दिली असतानाही त्यांना कधी हा हक्क उपभोगण्यास मिळाला नाही. त्या नेहमी फक्त गृहिणी आणि जननयंत्रे म्हणून वावरत होत्या येवढेच नव्हे,

तर ओझ्याची जनावरेही होत्या. पण खेळणे म्हणून कधीच नव्हत्या. तेव्हा नव्वद टक्क्यांहून अधिक पुरुषांना स्त्रियांकडे पितृपदाच्या दृष्टीने पहाण्याचा अधिकारच नाही. तरीसुद्धा ते हा अधिकार धारण करतात. पितृसत्ताक संस्कृतीचा तो वारसा आहे, धडधडीत खोटेपणा हा आजच्या विश्वासाचा विषय बनला आहे. फक्त पुरुष खोटे बोलतात, एवढेच नव्हे तर स्त्रियासुद्धा त्यावर विश्वास ठेवतात. दोनही बाबतीत ही नुसती प्रथा बनली आहे. युगानुयुगे धर्माने पोसलेले आणि अज्ञानाने भक्कम बनलेले पूर्वग्रह, दैनंदिन जीवनाच्या आणीबाणीच्या वस्तुस्थितीबद्दल त्यांना आंधळे बनवत आहेत.

आता मध्यमवर्गसुद्धा, कामगार वर्गाच्या व्यक्तींप्रमाणे अधोगतीच्या अवस्थेस जात आहे. त्या वर्गाचे पुरुप, वाढत्या संख्येने, स्त्रियांना आर्थिक निश्चितता देण्यास असमर्थ होत आहेत. तेव्हा पुरुषांची पारंपरिक रक्षणकर्त्याची किंवा पितृपणाची वृत्ती, जे बहुधा निढळाच्या मिळकतीवर जगत नाहीत किंवा ज्यांना मोठ्या पगाराच्या नोकऱ्या आहेत अशा समाजातील वरच्या वर्गातील फारच थोड्या भाग्यवानांच्या दृष्टीने व्यावहारिक ठरेल. या जुनाट वृत्तीतील अंतर्गत अन्याय व अनैतिकता बाजूला ठेवली तरी बहुसंख्य स्त्रियांना जे रक्षण आता पुरुषांपासून मिळत नाही त्या रक्षणाखाली समाधान मानण्याचा त्यांना उपदेश करणे, जे संबंध अस्तित्वातच नाहीत त्यांचे समर्थन करणे, आणि जो आदर्श साधणार नाही तो पुढे ठेवणे फुकट आहे. खरी वस्तुस्थिती खोटया गोष्टींनी झाकून टाकली आहे आणि असे हेतुपूर्वक केलेले आहे. आधुनिक स्त्रियांना चुकीच्या ठरवण्यासाठी, त्यांच्यावर "पाश्चिमात्यांपासून उसन्या घेतलेल्या खोटया तत्त्वांनी" त्या हुरळून गेल्याचा आरोप केलेला आहे. आणि या हुरळून जाण्यामुळे निर्माण झालेल्या असमाधानाला योग्य कारणच नसल्याचे सिद्ध करण्यासाठी हा पितृपदाचा असाध्य आदर्श पुढे ठेवला आहे.

◆ ◆ ◆

तथापि, आर्थिक दृष्ट्या स्वतःच्या पायावर उभे रहाण्याची इच्छा करणे हे स्वाभाविक आहे. बहुसंख्य स्त्रिया आर्थिक दृष्ट्या पुरुषांवर खरोखर कधीच अवलंबून नसल्यामुळे अशी इच्छा करणे योग्यच आहे. स्त्रियांनी नेहमीच, घरकामाचा वाटा पुरुषांच्या बरोबरीने उचललेला आहे. पण त्यांच्या श्रमाच्या उत्पन्नावरील वारसाहक्क मात्र त्यांना कधीच न देता तो कुटुंबाचे यजमान व मालक म्हणून कायद्याने पुरुषांना दिला आहे. खरे म्हणजे जेव्हा आर्थिक मोलाचे कष्ट करणे स्त्रियांना भाग पडते तेव्हा त्याच्या मालकीच्या वाटयात पुरुषांइतकाच त्यांचा योग्य हक्क असला पाहिजे. स्त्रियांची आर्थिक स्वातंत्र्याची मागणी ही काही नवीन

झगमगणारी कल्पना नाही. युगानुयुगे आपल्यावर झालेल्या अन्यायाची भरपाई करण्याची ही मागणी आहे. आजच्या त्यांच्या बंडाला, स्त्रीवर्गाला सामाजिक-दृष्ट्या परिणाम भोगण्यास लावणाऱ्या या चिरंतन कारणाच्या जोडीला नवीन कारणे आहेत. तीसुद्धा स्वाभाविकच आहेत. एकत्र कुटुंबपद्धतीचे विसर्जन आणि मध्यम वर्गाची सर्वसाधारण आर्थिक कुतरओढ यातून ती निर्माण होत आहेत.

तेव्हा इतिहासातून निर्माण झालेले आणि सामाजिक गरज असलेले हे स्त्रियांचे बंड म्हणजे पाश्चिमात्य कल्पनांनी भ्रष्ट झालेल्या काही मध्यमवर्गीय स्त्रियांनी निर्माण केलेला उपद्व्याप नव्हे. स्वतःच्या विशिष्ट अडचणीत त्या प्रत्यक्ष गुंतल्या असल्या तरी स्वाभाविकपणेच मुक्या स्त्रीवर्गाच्या पुरातन तक्रारींना त्या वाचा फोडत आहेत. स्त्रियांपुढे, विशेषत. मध्यमवर्गीय स्त्रियांपुढे, उभे असलेले प्रश्न, समाजाच्या तर्कशुद्ध पुनर्रचनेशिवाय सुटू शकणार नाहीत. कारण, बहुसंख्य स्त्रियांना युगानुयुगे भारवाहक पशू म्हणून वागवणारी जी समाजपद्धती प्रचलित होती, तिच्या ऱ्हासातून हे प्रश्न निर्माण झाले आहेत. म्हणून निर्विकार दृष्टीने पाहिले तर, ज्या सुशिक्षित स्त्रिया हिंदू स्त्रीधर्माच्या तत्त्वांविरुद्ध बंड करीत आहेत त्या खरोखर सामाजिक क्रांतीची मागणी करीत आहेत. तेव्हा जुने कर्मठ राष्ट्रीयवादी त्यांना शिव्या देतात यात काहीच आश्चर्य नाही. पण आधुनिक स्त्रीच्या "फसव्या ध्येयांचा" निषेध करताना हिंदू आदर्शाचे पुरस्कर्ते त्या आदर्शाचे खरे स्वरूप मात्र उघडे करून दाखवीत आहेत.

हे प्रतिगामी असे म्हणतात की मार्ग चुकलेल्या आधुनिक स्त्रियांनी मागितलेले हे बंधविमोचन म्हणजे गृहजीवनाचा विचका आणि सामाजिक गोंधळाला आमंत्रण होय. स्त्रीपुरुषसंबंधांच्या स्वातंत्र्याच्या कल्पनेचे हे चुकीचे चित्रण आहे. त्यांचा ठेवणीतला मुद्दा हा की निसर्गाने स्त्रीला पुरुषापेक्षा निराळे बनवले आहे, तेव्हा त्यांच्यात समानता असणे शक्य नाही. उदाहरणार्थ देसाईंनी आपल्या श्रोत्यांना सांगितले की "तुम्ही निसर्गनिर्मिती बदलू शकत नाही. पुरुष हा पुरुषच आणि स्त्री ही स्त्रीच रहाणार." जणू काय या सत्याबद्दल कुणी वादच निर्माण केला आहे. कुठल्याही स्त्रीला शारीरिक बदल नको आहे. ही मागणी पुरुषत्वासाठी नसून मानवी हक्कासाठी आहे; स्त्रियांना मानवी व्यक्ती म्हणून प्रगती करू देण्यास मना करणारे पुरुष-निर्मित कायदे व नियम झुगारण्यासाठी आहे; सामाजिक आणि कौटुंबिक व्यवहारांत स्त्रियांना पुरुषांचे जोडीदार आणि सहचर म्हणून स्वतंत्रपणे कार्य करणे शक्य होईल असे वातावरण निर्माण करण्यासाठी आहे.

आधुनिक स्त्री खरोखर कशाकरिता झगडत आहे याचे हे स्पष्ट निवेदन पहा: "स्त्रीपुरुषात जी असमानता आहे ती दूर करून समानतेच्या पूर्ततेचा शुभ दिन

जवळ आणण्याचे कार्य स्त्रियांच्या चळवळींनी अंगिकारले आहे. जेथे जेथे स्त्री आणि पुरुष असा पक्षपात असेल तो तो सर्व नाहीसा झाला पाहिजे आणि याचा तर्कशुद्ध परिणाम म्हणजे सर्व स्वार्थीपणा नाहीसा झाला पाहिजे. हा वुईमेन्स कॉन्फरन्सचा संदेश आहे." (८ नोव्हेंवर १९३६ रोजी दिल्ली वुइमेन्स कॉन्फरन्सच्या वार्षिक सभेमध्ये सौ. व्रिजलाल नेहरू यांनी केलेले अध्यक्षीय भाषण).

आधुनिक हिंदू स्त्रीचा आदर्श ठरलेला हा शुभ दिन कोणता? स्त्रीपुरुष झगडयाचे पिशाच्च गाडून टाकण्यासाठी त्यांनी केलेले वर्णनच पाहू या: "आमची चळवळ स्त्रीपुरुषांमधील तेढीच्या, चढाओढीच्या आणि लढ्याच्या भावनांचे नाटक करून स्त्री-पुरुषात फूट पाडण्यासाठी निर्माण केलेली आहे, अशी सर्वसामान्य गैरसमजूत आहे. आधीच गोंधळून गेलेल्या जगात शांती आणि संवादित्व आणण्याऐवजी, गुण्यागोविंदाने नांदण्याकरिताच ज्यांची जीवने दैवाने एकत्र गुंफली आहेत, आणि ज्यांच्या परस्परसाहाय्याशिवाय जगाचे अस्तित्वच टिकणार नाही अशा मानवतेच्या दोन अंगांमध्ये वखेडा माजविण्यास कारणीभूत होतील असे नवे प्रश्न ही चळवळ निर्माण करीत आहे, अशी हाकाटी केली जात आहे. या चळवळीवद्दल असे बोलणे म्हणजे, स्त्रीला पुरुषाविरुद्ध न मारता त्या दोघांत खरोखरीचा सहकार, संवादित्व व शांती घडवून आणण्याचा या चळवळीचा मुख्य उद्देशच नाकारणे आहे."

या उद्देशावर हल्ला करायचा आणि तरीसुद्धा आपण स्त्रीधर्माच्या उच्च आदर्शांचे पुरस्कर्ते आहोत अशी शेखी मिरवायची हे शक्य आहे काय? हिंदू स्त्रीधर्माचा अगदी हाच आदर्श आहे असा युक्तिवाद काहीजण कदाचित करतील. पण वस्तुस्थिती तशी नाही. याचा प्रत्यय अनुभवातून येऊ द्या.

"जगात सर्वत्र आणि सतत स्त्रीपुरुषांनी एकत्र जीवन् कंठलेले आहे यात शंका नाही, पण ते खऱ्या सहभावनेने एकत्र राहिले नाहीत. त्यांच्या एकमेकातील संबंधात कदाचित निर्जीव शांती असेल पण ही शांती म्हणजे जीवन आणि संवादाची शांती नव्हे. अनादी कालापासून त्यांच्या संबंधात कनिष्ठ श्रेष्ठतेची, आणि स्त्रियांचा फायदा उठवण्याची वृत्ती आहे. ही वृत्ती आपल्या या देशाच्या कायदेकानूत व रीतिरिवाजात स्पष्ट केली आहे. या वृत्तीमुळे दोघांचे संबंध विपारी वनले आहेत आणि त्यामुळे मानवी प्रगती लांवणीवर पडून ती अमानुष विकृतीला कारणीभूत झाली आहे. स्त्रीपुरुषसंबंध न्याय व समतेवर जेव्हा आधारले असतील तेव्हाच त्यांच्यात खरी शांती, संवादित्व व सहचारित्व नांदेल. जोपर्यंत पुरुषांच्या मनात, त्यांच्या रीति-रिवाजात किंवा कायद्यात, आधिक्य आणि आधीनता, आणि कनिष्ठभाव यांची,

थोडीशीही कल्पना असेल, तोपर्यंत स्त्रीपुरुषातील पूर्ण संवादित्व व सहकारामुळे होणाऱ्या मानवी विकासाची आणि सुखाची पूर्ती होणार नाही. "

हिंदू कुटुंबात स्त्री ही पराधीन असते. स्त्रीधर्माचा हिंदु आदर्श ही पराधीनता बदलत नाही. ती एक थाप आहे. कायदे आणि रिवाज, अन्याय आणि असमानतेच्या भावनेने भरलेले आहेत. स्त्रीपुरुषांची नैसर्गिक समानता बहुपतित्वाच्या वादग्रस्त पुनरुत्थानाने परत आणता येईल. हिंदु कायद्याखाली पुरुषांनी उपभोगिलेले हक्क नाहीसे करावयाचे नसल्यास, न्यायाचा आणि समतेचा जोरदार पुरस्कार करणाऱ्यांनी त्या हक्कांची मागणी स्त्रियांकरिताही केली पाहिजे. पण बहुपतीत्व खात्रीनेच कुटुंब मोडून टाकील. एके काळी प्रचलित असलेला तो एक रिवाज होता. पण कुठलीही स्त्री त्याचे पुनरुत्थान मागत नाही. त्या मागत आहेत आवडीनिवडीचे स्वातंत्र्य, आणि जुळत नसेल तर विभक्त होण्याचा हक्क. सगळा विचार केला म्हणजे त्यातून आर्थिक स्वातंत्र्याची मागणी ही मूलभूत असल्याचे निष्पन्न होते. जुन्या समाजपद्धतीच्या ऱ्हासामुळे निर्माण झालेल्या पेचप्रसंगांतून सुटण्याचा तो एकच मार्ग आहे. न्यायबुद्धी आणि सर्वसाधारण समाजकल्याण यातूनच स्त्रियांकरिता या स्वातंत्र्याची मागणी आली आहे. खरे म्हणजे, सामाजिक संस्था म्हणून आवश्यक असलेल्या या कुटुंबाचा नाश आधुनिक स्त्रीने मागितलेले हे स्वातंत्र्यच फक्त टाळू शकेल, आणि सामाजिक गोंधळाची भीती दूर पळवील. आधुनिक स्त्रीला सामाजिक गोंधळ निर्माण करण्याची इच्छा नाही. तर ज्या एका गोंधळात ती फेकली गेली आहे त्यातून फक्त बाहेर पडण्याचाच प्रयत्न ती करीत आहे. हिंदू स्त्रीधर्माच्या काल्पनिक आदर्शाच्या धोंड्याचे ओझे तिच्या गळ्यात बांधून त्यात अडथळा आणू नका.

# काही स्वैर विचार

मी विभूतिपूजक नाही आणि अंधभक्तही नाही. सत्य सांगण्याची भीती मला वाटत नाही. मग ते कुणाला आवडो अगर नावडो. त्यामुळे कोणी दुखावले जाण्याचा संभव आहे. पण अलिकडे सत्याची आध्यात्मिक कल्पना हा काँग्रेस पंथाचा एक भाग झाला आहे. तेव्हा सत्य, आणि फक्त सत्यच निःसंकोचपणे सांगितले जाऊ द्या. नाहीतर असत्यातूनही सत्य काढणे शक्य आहे. सत्य म्हणजे काय ? वास्तवतेशी असणारा संबंध. वास्तवता म्हणजे काय ? वस्तुनिष्ठ चालू स्थिती, जी स्वयंचलित असते. चालू स्थिती म्हणजे काय ? म्हणजे बदल. तेव्हा जे बदलत नाही ती चालू स्थिती नाही, म्हणजे वास्तवता नाही. म्हणून बदल हेच खरे सत्य. बदलणे म्हणजे सत्य असणे. ज्याअर्थी सत्य हे बदलणारे असते त्याअर्थी त्याचा उपसिद्धान्त, अबाधित सत्य हा खोटेपणा ठरतो.

दंभस्फोट हा माझा धंदा आहे. हा शिव्या खाण्याचा धंदा आहे. पण सत्याची केवळ एक पोकळ कल्पना राहू द्यावयाची नसल्यास कुणीतरी सत्य सांगावयास पाहिजे. जेव्हा मी स्वतः खऱ्या खोटया गोष्टीतील फरकाबद्दल विचार करण्यास शिकलो. तेव्हापासून मी दंभस्फोट करीत आहे. त्याने काही मला लोकप्रियता मिळवून दिली नाही. कष्ट आणि त्याग करणाऱ्यांची कदर, या गुणांची शिकवण देणाऱ्यांकडून केली जात नाही. माझा त्या गुणांवर विश्वास नाही. तरीसुद्धा, कर्तव्य म्हणून नव्हे पण जीवनाचा एक भाग म्हणून, मी काही त्याग केलेला आहे. कदाचित त्यामुळे काही कष्टही झाले. पण बलिदानाचा गंड नसल्याने मला कष्टाची भावना जाणवली नाही. कुठलाही दिखाऊपणा किंवा जाहिरातबाजीशिवाय ते ओघानेच घडले.

वैयक्तिक भरभराट करून घेण्याकडेच माझा कल असता, तर ती योग्यता भरपूर असलेला माझ्या सर्व आयुष्याचा महत्त्वाचा भाग, दुर्लक्ष करण्यासारखा नव्हता. स्वदेशमर्यादातीत राजकीय कीर्ती मिळवणेसुद्धा माझ्या पूर्णपणे आटोक्यातले होते. ढोबळ भौतिक अर्थाने स्वहिताच्या मागे लागून मी जरी कुठलाही व्यवसाय निवडला असता तरी त्याचा कळस सहज गाठला असता, हा माझा विश्वास म्हणजे पोकळ मिजास नव्हे. पण त्याऐवजी मी असा मार्ग पत्करला की त्यामुळे पंधरा वर्षाच्या हद्दपारीनंतर, ज्याच्या खडतरपणामुळे माझे आयुष्य कदाचित कितीतरी वर्षांनी घटेल, असा सहा वर्षाचा कारावास मला भोगावयास लागला.

या माझ्या परिस्थितीबद्दल कींव व्यक्त करताना जवाहरलाल नेहरू आपल्या आत्मचरित्रात लिहितात की, " राष्ट्रवादी हिंदुस्तानाला याचा काही उपयोग नाही. " असा शेरा मारणे हे मला नव्हे तर " राष्ट्रवादी हिंदुस्तानला " मारक आहे. नेहरूंना अभिप्रेत असलेल्या " राष्ट्रवादी हिंदुस्ताना " चे खरे स्वरूप त्यामुळे उघडे पडत आहे. मी काही गांधींचा अभिमानी नाही; पण राष्ट्रवाद आणि गांधीवाद एकच आहेत काय ? माझे संपूर्ण जीवन, मग ते कितीही क्षुल्लक असले तरी ते राष्ट्रीय स्वातंत्र्याच्या ध्येयाला वाहिलेले आहे ही गोष्ट कुणीही नाकारू शकेल काय ? तर मग राष्ट्रवादी हिंदुस्तानला माझा उपयोग का असू नये ? कारण मी अठ्ठयाण्णव टक्के लोकांकरिता " स्वराज्याचा " पुरस्कार करतो. नेहरूंना अभिप्रेत असलेल्या राष्ट्रवादी हिंदुस्तानचे हे ध्येय नव्हे, हे कबूलच करावे लागेल. बोलघेवड्या आणि फुकट मिजास मारणाऱ्या गांधीच्या अभिमान्यांच्या त्या राष्ट्रवादी हिंदुस्तानच्या वृत्तीशी मला फारसे कर्तव्य नाही. खऱ्याखुऱ्या, म्हणजे ज्याला क्रांतीची तिडिक वाटत आहे अशा राष्ट्रवादी हिंदुस्तानची गोष्ट निराळी. त्याला माझा काही उपयोग जरूर आहे.

मला कुणी पुढारी म्हणून मानले नाही. पण तरीसुद्धा ज्या राष्ट्रवादी हिंदुस्तानला माझा काही उपयोग नाही त्या हिंदुस्तानच्या पुढाऱ्यांपैकी बरेच पुढारी जेव्हा महात्म्याच्या एका वर्षात स्वराज्य मिळवण्याच्या अद्भूत शक्तीवर, किंवा गोलमेज परिषदेकडून, त्यांनी सांगितल्यावरहुकूम हिंदी स्वातंत्र्याची सनद घेऊन येण्यावर विश्वसून राहिले होते तेच पुढारी बऱ्याच वर्षापूर्वीच्या काळी मी सुचवलेल्या दिशेकडे आज झुकत आहेत, या वस्तुस्थितीने मला दिलेले समाधान कोणीही हिरावून घेऊ शकणार नाही.

घटनापरिषदेची कल्पना कॉंग्रेसने मान्य केली आहे. फार पूर्वी, १९२७ साली मी असे सुचवले होते की सायमन कमिशनविरुद्ध करावयाच्या चळवळीबरोबरच या घटनापरिषदेची मागणी करावी. आताप्रमाणे त्या वेळीही " राष्ट्रीय हिंदुस्तानाच्या " मोठ्या पुढाऱ्यांना विरोध करण्याचे धैर्य दाखविणाऱ्या माझ्यासारख्या क्षुद्र पामराचा काही उपयोग नव्हता. झाल्या गेल्या गोष्टीचे दुःख करीत बसणे म्हणजे मूर्खपणा आहे, पण अनुभवाने प्रत्येकाने शहाणे झाले पाहिजे. तर्कदृष्ट्या असे सिद्ध करता येईल की मी सुचवले होते तेव्हापासून घटनापरिषदेची मागणी आपण सतत करीत राहिले असतो, तर आज देशाची राजकीय परिस्थिती कदाचित अगदी निराळी झाली असती. अगदी १९३१ मध्ये सुद्धा, घटनापरिषदेच्या कल्पनेला कॉंग्रेस पुढाऱ्यांचा निश्चयात्मक विरोध असल्याचे मला आढळून आले. दुसऱ्या बाजूने पुराणमतवादी कम्युनिस्टांनी ह्या कल्पनेच्या पुरस्काराबद्दल माझा

भांडवली राष्ट्रीय प्रजासत्तावादी म्हणून निषेध केला. आज या दोनही पक्षांनी ही कल्पना उचलून धरली आहे. काल उपहासाने हसणारे आज ढोल पिटीत आहेत. फक्त नेहरू म्हणतात त्याप्रमाणे अजूनही एकाला माझा उपयोग नाही आणि दुसरे मला " स्वपक्षत्यागी " म्हणतात.

ज्यावेळी हे त्याग व कष्टाची शिकवण देणारे देशप्रेमी पुढारी सुखी जीवन जगत होते त्यावेळी, पंचवीस वर्षांपूर्वी, मी केवळ एक लहानसा मुलगा होतो, आणि आपल्या देशाच्या मुक्ततेसाठी सुरू केलेल्या कार्याबद्दल तुरुंगवास भोगलेला होता. तरीसुद्धा आज त्यांनी मला माझ्या नशिबाच्या हवाल्यावर सोडून दिले आहे. पण या पोरक्या आणि मित्ररहित असलेल्या माझ्याकडे साम्राज्यशाही विशेष लक्ष देत आहेसे दिसते. माझा तुरुंगवास म्हणजे टाळयांचा हौतात्म्याकरिता दिलेली क्षुद्र किंमत नव्हती. त्यांनी माझे आरोग्य खलास केले आहे. पण माझ्या प्रवृत्ती चिरडल्या गेल्या नाहीत. खरे बोलायचे तर या क्रूर आणि खुनशी वागणुकीने मला उत्तेजनच मिळाले आहे. ती माझा आत्मविश्वास वाढवीत आहे, आणि जरी स्वातंत्र्याच्या कार्यातील माझ्या कामाला जाहीर मान्यता मिळाली नसली तरी ते अगदीच उपेक्षा करण्यासारखे नाही याचे समाधान मला लाभू देत आहेत.

दंभस्फोट करण्याचे मी चालूच ठेवीन. लोकप्रियतेच्या मागे लागण्यास आता फार उशीर झाला आहे. आणि सुदैवाने या संशयास्पद प्रतिष्ठेसाठी लागणारी पुरेशी बौद्धिक सामान्यताही माझ्याजवळ नाही. लोकांच्या अज्ञानाचा फायदा घेणे आणि खोटी पोकळ ऐट मिरवणे या पुढारीपणाच्या अगदी सोप्या पायऱ्या या देशात आहेत.

अगदी सतत नाही तरी बरेचदा, लोकप्रिय पुढारी हे चुकीच्या मार्गाने नेणारे असतात. जे जनतेचे अज्ञान व पूर्वग्रह यात सहभागी होतात त्यांना सहज लोकप्रियता मिळते. ते अधिक लोकप्रिय आणि चटकन यशस्वी होतात. कारण एकतर ते आपल्या अनुयायांना जाणूनबुजून फसवतात तरी, किंवा त्यांचे अज्ञान आणि पूर्वग्रह उचलून धरतात. शिवाय या अनुयायांना चुकीच्या मार्गाकडे अधिकच झुकवण्याची परंपरा आहेच. पारंपरिक अंधश्रद्धा त्यांना सहज चुकीच्या मार्गाला नेण्याची व्यवस्था करते. ज्याअर्थी भविष्यकालाचा विजय होण्यासाठी भूतकालाविरुद्ध बंड करावेच लागते त्याअर्थी प्रगतीचे संस्थापक लोकप्रिय होण्याचा संभव नाही. खरे म्हणजे, जर ही लोकप्रियतेची चंचल देवता आपल्यावर प्रसन्न होते आहे असे त्यांना दिसले तर, न डगमगणाऱ्या खडतर कर्तव्याच्या चढणीने थकून गेल्यामुळे आपण कुठल्यातरी अगदी कमी त्रासाच्या मार्गाकडे वळत असल्याची ती सूचना आहे असे त्यांनी समजावे.

ज्यांच्या प्रयत्नांनी, मोठमोठ्या घटना घडवण्यास काहीशा प्रमाणात हातभार लावला, आणि त्यामुळे मानवजातीचे भवितव्य घडवण्यात भरीव कामगिरी केल्याचे

स्थान ज्यांना मिळाले, ते बहुतेक सर्व इतिहास घडविणारे असामान्य लोक या घटना घडण्यापूर्वी कमी अधिक प्रमाणात प्रसिद्धिपराङ्मुख होते. उदाहरणार्थ, मिलीउकाफवादी आणि केरेन्स्किवादी ज्यावेळी रशियन लोकांची मुक्ती करणारे म्हणून जगाचे धन्यवाद घेत लोकप्रियतेच्या सूर्यप्रकाशात नहात होते (नंतर लवकरच त्यांनी रशियन जनतेचा विश्वासघात केला ), त्यावेळी खरे युगपुरुष म्हणून फक्त जवळच्याच सहकाऱ्यांना माहित असलेले लेनीन हे अप्रसिद्धच होते. तरीही आज सर्व जगाला हे माहित आहे की लेनिनने आपल्या अप्रसिद्धीच्या काळात रशियन जनतेच्या मुक्तीसाठी जे कार्य केले त्याच्या अंशानेसुद्धा कुणी दुसऱ्या व्यक्तीने केलेले नाही. शेवटी क्रांतीचे पुढारी म्हणून त्यांचे पुढे येणे अपरिहार्य नव्हते. स्वतःच इतिहास-रूप असणारी माणसे ऐतिहासिक घटना घडवणारच. पण निर्णयात्मक ऐतिहासिक घटना घडवण्यात मदत करणाऱ्या सर्वांनाच इतिहासाची मान्यता मिळेल अशी ग्वाही देणारा एकही कायदा नाही. याबाबतीत इतिहास जरा लहरीच आहे. वस्तुनिष्ठ शक्तींच्या प्रगतीला साहाय्य केल्यामुळे ज्यांना क्रांतीचे जनक म्हणून म्हणता येईल त्यांची गणना इतिहासात नेहमीच तशी होईल असे नाही. त्यांनी केलेल्या गोष्टींचा महत्त्वाचा फायदा दुसरेही कदाचित बळकावून बसतील. या पुढाऱ्यांना पुढे आणण्यास मदत करणे हा इतिहास घडवण्याच्या कार्याचाच एक भाग आहे. पण ही गोष्ट कधीच कुणाला जाणवणे शक्य नाही. मग त्याला मान्यता तर दूरच.

इतिहास घडविणाऱ्यांच्या सूचनेनुसार जरी प्रत्यक्ष घटना घडत असल्या तरीही ते लोकप्रिय पुढारी होतीलच असे नाही. उदाहरणार्थ, लेनीनच घ्या. ते म्हणजे एक ऐतिहासिक अपूर्वाई आहेत. क्रांतीचे जनक म्हणून ज्या अर्थाने लेनीन एका विशिष्ट क्रांतीशी निगडित होते त्या अर्थाने फ्रेंच क्रांतीचा एकही पुढारी, रॉबस्पिअर, डांटन किंवा अगदी मारटसुद्धा, क्रांतीचे जनक नव्हते. तर ज्या क्रांतीची प्रगती, इतिहास घडवणाऱ्या प्रसिद्धिपराङ्मुख व्यक्तींच्या प्रत्यक्ष साहाय्याने झाली नव्हती, अशा प्रक्षुब्ध क्रांतीची ती बाळे होती. रशियाप्रमाणे, जेव्हा जनकाच्याच नेतृत्वाचे भाग्य क्रांतीला लाभते तेव्हा, ती चुकीच्या मार्गाने जाण्याचे भय, तिच्या प्रक्षुब्धतेतून निर्माण झालेल्या बिघडलेल्या बाळांनी केलेल्या अयोग्य नेतृत्वापेक्षा कमी असते.

अशा या लोकप्रियतेच्या देवतेला संतुष्ट करण्याची माझी लायकीही नाही आणि इच्छाही नाही. पण दंभस्फोट करण्याचे अप्रिय पण जरूरीचे काम मी करीत राहणारच.

◆ ◆ ◆

तात्विकदृष्ट्या मी आदर्शवादी नाही. पण एकदा कल्पना आपोआप तयार झाल्या ( कल्पना करणे ही भौतिक शारीरिक क्रिया आहे. ) किंवा कृत्रिमपणे त्या

क्रमांक ७५६६१ दि: ...।३।८१
२९३२ नों दि २२।३।८१

जाणिवेत शिरल्या म्हणजे त्या मोठ्या प्रमाणावर माणसांच्या क्रिया ठरवतात हे कबूल करावयास कल्पनांच्या आध्यात्मिक श्रेष्ठतेवर विश्वास असण्याची गरज नाही. म्हणूनच कुठल्याही राजकीय किंवा सामाजिक चळवळीच्या प्रगतीत किंवा अंतिम यशात ध्येयवादाची निश्चित भूमिका असते. आणि प्रत्येक राजकीय चळवळ, मग ती कितीही क्षुल्लक ऐतिहासिक महत्वाची असो, ती सामाजिक उद्दिष्टांनी प्रवृत्त झालेली असते. म्हणून साहजिकच तिचे स्वरूप तिच्या उद्दिष्टांनी निश्चित केले जाते.

हिंदी राष्ट्रवादाचे सामाजिक उद्दिष्ट काय? या प्रश्नाचे खंबीरपणे उत्तर देईपर्यंत आणि दिल्याशिवाय चळवळीच्या राजकीय प्रवृत्ती, मोठ्या प्रमाणात विसंगत रहातील, जी ध्येये कृतीत उतरताच फसवी ठरतील अशी अस्पष्ट ध्येये पुढे ठेवली जातील, खोट्या आश्वासनांवर एकत्रित केलेली जनतेची शक्ती निरर्थक निदर्शनात व्यर्थ जाईल, थोडक्यात म्हणजे सामाजिक उद्दिष्टांबद्दलचा गोंधळ त्याचे राजकीय यथार्थ दर्शन झाकून टाकील, आणि राष्ट्रीय स्वातंत्र्याच्या इच्छित ध्येयाकडील प्रगतीत अडथळा निर्माण करील.

सामाजिक पुनरुत्थानाची नांदी म्हणूनच फक्त राजकीय क्रांती होत असते. हा इतिहासाचा अनुभवसिद्ध नियम आहे, म्हणून तो हिंदुस्तानला आणि इतर सर्व जगाला बंधनकारक आहे. तेव्हा जर राष्ट्रीय चळवळ राजकीय दृष्ट्या खरोखर क्रांतिकारक असेल तर नामशेष झालेल्या संस्थांची प्रचलित पद्धती नाहीशी करणे हे तिचे सामाजिक उद्दिष्ट असलेच पाहिजे. मगच त्यावर नवीन समाजाची उभारणी करता येईल. ती देशाच्या राजकीय परिस्थितीत वैचारिक बदलाची मागणी करीत असते, कारण हा बदल सामाजिक पुनरुत्थानाला आवश्यक अशा इस्टेटीच्या संबंधांची पुनर्रचना मान्य करणारे कायदेकानू निर्माण करील. जनतेच्या दृष्टीने, राष्ट्रीय चळवळ ही राजकीय दृष्ट्या क्रांतिकारक असते आणि बुद्धिपुरस्सर जाणिवेने नसला तरी, राष्ट्रवाद हा सामाजिक प्रगतीसाठी आवश्यक आहे. प्रगती म्हणजे पुढील वाटचाल, मागे परतणे नव्हे हे सांगावयास नकोच. आपल्या राष्ट्रीय चळवळीचे प्रमुख ध्येय राजकीय दृष्ट्या क्रांतिकारक बनवणाऱ्या सामाजिक उद्दिष्टांशी विरोधी आहे. सर्वसाधारणपणे मानवी क्रिया ह्या पूर्वरचित कल्पनांनी निश्चित केल्या जातात. म्हणून मृत झालेल्या गतकालाच्या परंपरेला चिकटून रहाणारी आणि प्रचलित मतप्रणालींना अडथळा मानणारी आजची हिंदी राष्ट्रीय चळवळ, तिच्या राजकीय स्वातंत्र्याच्या ध्येयाकडे कधीच प्रगत होणार नाही. प्रतिगामी सामाजिक अधिष्ठानामुळे आपल्या राजकीय स्वातंत्र्याच्या चळवळीचे रूपांतर खरोखरी, दगलबाज, पुढारीपणाच्या चळवळीत झाले आहे.

ग्रंथालय ठाणे
६९३८

जर सामाजिक पुनरुत्थानाची ऐतिहासिक गरज मान्य केली नाही तर राजकीय क्रांती ही एक निरुपयोगी अशी फुकट वडवड ठरेल. जोपर्यंत राष्ट्रवादाची प्रणाली ही गरज मान्य करीत नाही तोपर्यंत राष्ट्रीय चळवळीला साम्राज्यशाहीशी समझोता करीत रहाणे अपरिहार्यच होणार, किंवा याहून वाईट म्हणजे ती पूर्ण प्रति-क्रांतिकारी होणार. जे कोणी या प्रतिगामी पुढारीपणाच्या चळवळींनी फसले गेले नसतील किंवा ज्यांचा सांकेतिक भाषेने बुद्धिभ्रंश झाला नसेल ते या दोनही बाजू सहज पाहू शकतील. पूर्ण राजकीय स्वातंत्र्याचे ध्येय हे क्रांतिकारक ध्येय असलेच पाहिजे असे नाही. जर राष्ट्रवादी राज्य हे प्रस्थापित सामाजिक पद्धती चिरस्थायी करण्याचे, किंवा जुन्या संस्थांचे पुनरुज्जीवन करण्याचे साधन बनणार असेल तर ते राज्य अस्तित्वात आणणे ही राजकीय क्रांती होणार नाही तर प्रतिक्रांती होईल. प्रत्येक राजकीय बदल हा क्रांतिकारक नसतो. पुष्कळदा तर तो प्रतिक्रांतिकारक असतो. आणि ज्या सामाजिक उद्दिष्टांनी आणि उद्दिष्टांकरिता तो घडविला जातो त्यावर त्याचे ऐतिहासिक महत्त्व ठरते. हा राजकारणाचा प्राथमिक धडा, हिंदी राष्ट्रवाद्यांना अजून शिकायचा आहे.

कुठल्याही राजकीय घडामोडीला रक्तपात क्रांतिकारी बनवतो असा राष्ट्रीय पुढाऱ्यातील सर्वात ढोंगी पुढाऱ्यांचासुद्धा विश्वास आहे. जे राजकीय बदल सामाजिक दृष्ट्याच नव्हे तर साध्या नागरिक हक्कांच्या बाबतीत सुद्धा अधोगतीच्या मार्गाचे आहेत हे उघड व मान्य झालेले आहे ते प्रतिगामी बदल म्हणजेच क्रांती असल्याचे हे पुढारी समजतात. त्यामुळे इटालीतील लोकनियुक्त लोकसत्तेची रक्तलांछित गळचेपी आणि जर्मन लोकाधिसत्तेचा त्याहूनही अधिक रक्तलांछित असा "घटनात्मक" नाश या घटना आणि स्पेनमधील राज्यसत्तेचे उच्चाटन किंवा रशियन क्रांती या साऱ्या घटना ऐतिहासिक दृष्टीने सारख्याच महत्त्वाच्या मानल्या जातात.

आजपर्यंत जनतेने न उपभोगिलेले राजकीय व सनदी हक्क राष्ट्रीय स्वातंत्र्य जर तिला मिळवून देणार नसेल तर राजकीय स्वातंत्र्याचा लढा अगदी हत्यारी बंडादि धैर्यशाली मार्गांनी चालवला तरी त्याला क्रांतिकारी महत्त्व प्राप्त होणार नाही. 'खेड्याकडे परता' किंवा " मनूकडे परता " असल्या घोषणा देऊन केलेल्या साम्राज्यशाहीच्या उच्चाटनाची चळवळ ही प्रतिक्रांती होईल. सुदैवाने अशी सामाजिक दृष्ट्या प्रतिक्रांतिकारी चळवळ राजकीय दृष्ट्या यशस्वी होणे कठीण. गांधींच्या आगमनापासून राष्ट्रीय चळवळीला आलेला कडू अनुभव याची स्पष्ट साक्ष देईल. आणि खरोखर ती यशस्वी करावयाची असेल तर हिंदुस्तानला परत मनूकडे जाण्याच्या किंवा Arcadian ग्रामीण साधेपणा स्वीकारण्याच्या मार्गाचा काही उपयोग नाही. राजकीयदृष्ट्या फॅसिस्ट हुकूमशाहीच्या नमुन्यावर आधारलेली

लोकसत्ताविरोधी राजवट ती निर्माण करील. यासाठी पुरातन संस्कृतीच्या परंपरांचा पुरेपूर फायदा घेतला जाईल. सामाजिक दृष्ट्या मात्र ही "नवी" राजवट म्हणजे भांडवलशाही नफेबाजी हे ज्याचे दुसरे नाव आहे अशा अंतस्थतः वांच्छिलेल्या पण वक्तृत्वपूर्ण वाणीने धिक्कारलेल्या "पाश्चिमात्य जडवादा"ची वाईट नक्कल होईल. ही नक्कल वाईट म्हणण्याचे पहिले कारण म्हणजे त्यात लोकसत्ताक स्वातंत्र्य असणार नाही की भांडवलशाहीच्या नैसर्गिक प्रगतीशी निगडित असलेली सांस्कृतिक प्रगतीही असणार नाही. दुसरे म्हणजे ती भांडवलशाही व सरंजामशाही यांचे राक्षसी मिश्रण होईल. जुनाट राष्ट्रवादाच्या तिरंगी झेंड्याखाली जर "पूर्ण स्वराज्य" कधी काळी अस्तित्वात आलेच तर, आज स्वातंत्र्याच्या शक्तींना मारक अशा ज्या सामाजिक शक्ती साम्राज्यशाहीच्या बाजूने उभ्या ठाकल्या आहेत नेमक्या त्याच शक्तींनी दूषित बनून ती राजवट जनतेचे शोषण करील. ती अतिशय अस्थिर आणि अशाश्वत ठरेल. मोठे भांडवलदार, राजेमहाराजे व जमीनदार यांच्या युतीची ती एक हुकूमशाही होईल. हे सर्व लोक अल्पसंख्य असल्यामुळे नवी राजवट हिंसेवरच चालवावी लागेल. आणि कदाचित राष्ट्रीय सार्वभौमत्वाची किंमत देऊन एखाद्या साम्राज्यवादी शक्तीचे संरक्षण मिळवणे तिला सोयीचे वाटेल. जुनाट राष्ट्रवाद्यांचे "पूर्ण स्वराज्य" लाभण्याचे दुर्भाग्य जर हिंदुस्तानच्या वाट्याला आले तर राष्ट्रीय चीन ज्या राजवटीचे खेदजनक चित्र रेखाटत आहे तेच हिंदुस्तानचेही नशीब ठरण्याचा संभव आहे.

ही विकृत कल्पना नाही की केवळ विक्षिप्तपणा नाही. आपल्या पुढाऱ्यांच्या खऱ्याखुऱ्या दृष्टिकोनाचे दर्शन होण्यासाठी त्यांना बेसावध असताना पकडण्याचीच फक्त गरज आहे. सत्यप्रेमाचे प्रदर्शन करणाऱ्या आपल्या पुढाऱ्यांपैकी फारच थोडे स्पष्ट बोलणारे आहेत. तरी पुष्कळदा खरे खाण्याचे दात बाहेर येतातच. मी पुन्हा एकदा सांगतो की मला कुणाच्या वैयक्तिक प्रामाणिकपणाबद्दल शंका घ्यायची नाही. कुठल्याही वैयक्तिक पुढाऱ्याच्या वागणुकीशी मला कर्तव्य नाही. स्वातंत्र्यलढ्याच्या प्रगतीत ज्यांच्यामुळे आत्तापर्यंत परिणामकारक अडथळा निर्माण होत आहे आणि ज्यांचा पूर्णपणे त्याग केला नाही तर तो तसाच होत राहील त्या पूर्वरचित कल्पना या माझ्या टीकेचा विषय आहेत. या कल्पना जितक्या दाखविल्या जातात तितक्या त्या उच्च, गुणी, परोपकारी आणि दैवी नाहीत हे उघडे करून दाखवल्याशिवाय त्यांचा कोणी त्याग करणार नाही. ज्यांच्या नैतिक सचोटीबद्दल आणि मानवतावादी उद्देशांबद्दल संशय घेता येणार नाही असे स्त्रीपुरुष या कल्पनांचा पुरस्कार करीत आहेत ही गोष्ट या शिळ्या संकेतांचे पारंपरिक वैभव वाढवीत असते. म्हणून ही टीका जास्तच कडक व संपूर्ण रूढिविध्वंसक असावयास पाहिजे. कल्पनांचे

आणि तत्त्वांचे विवरण शास्त्रशुद्ध तीव्रतेने केले पाहिजे. आणि त्यांचे तर्कशुद्ध परिणाम पडताळून पाहिले पाहिजेत. आणि असे केले तरच त्या स्वातंत्र्यलढयाला तारक आहेत की मारक आहेत याचा निवाडा आपण करू शकू. त्या मारक आहेत असे आढळून आले तर त्यांना धैर्याने टाकून दिले पाहिजे. आणि तरीसुद्धा जे कोणी त्यांचा पुरस्कार करीत असतील त्यांची वैयक्तिक योग्यता कितीही मोठी असली तरी त्यांना न्यायासमोर उभे केले पाहिजे. कल्पना कृतीला मार्गदर्शक होतात. म्हणून आपल्या कल्पना स्पष्ट करू या. तरच परिणामकारक कृती शक्य होईल.

मी असे म्हटले होते की, या जुनाट राष्ट्रवादामुळे आजच्या सामाजिक रचनेत वैचारिक बदल तर दूरच राहू द्या, पण नुसती राजकीय लोकसत्तासुद्धा येणे शक्य नाही. या जुनाट राष्ट्रवादाचा विजय म्हणजे पितृसत्ताक पद्धती फायद्याची आहे व ती सामाजिक संवादित्व आणील असे म्हणणे, आणि या नावाखाली सर्वांत परान्नपुष्ट शोषणाची पद्धती उचलून धरण्याचा प्रयत्न करणारी अतिशय प्रतिगामी पद्धतीची हुकूमशाही प्रस्थापित करणे होय. याचा पुरावा भरपूर आहे. अलीकडे, समाजवादावर पुष्कळच झोड उठवलेली ऐकू येते. त्यात काही सुज्ञ, काही पुढारी तर काही उघड भांडवलवादी आहेत. या टीकेकडे सूक्ष्म दृष्टीने पहा आणि तुम्हाला असे दिसून येईल की, ही टीका समाजवादाविरुद्ध नसून लोकसत्ताक स्वातंत्र्याविरुद्ध आहे. मग हे स्वातंत्र्य अगदी भांडवलशाहीतून निर्माण झालेल्या लोकसत्ताक स्वातंत्र्याच्या प्रकाराचे असले तरी त्याविरुद्ध आहे. कॉंग्रेस समाजवादी, त्यांना विरोध करणाऱ्यांचे लोकसत्ताविरोधी स्वरूप उघड करून दाखवण्यात अयशस्वी झाले असल्यामुळे त्यांच्या प्रचारातील वरीचशी शक्ती नाहीशी झाली आहे. आज, हिंदुस्तानात, अंधारात सापडलेल्या सामाजिक पुनरुत्थानाच्या पुरस्कर्त्यांनी लोकसत्तेच्या व्यासपीठावर उभे ठाकलेच पाहिजे. लोकसत्ताक स्वातंत्र्य स्थापण्यासाठी आवश्यक असणाऱ्या राजकीय व सामाजिक बदलांसाठी फार मोठी क्रांती व्हावी लागेल. याची काहीशी जाणीव, आर्थिक मुक्ततेपूर्वी राजकीय स्वातंत्र्य पाहिजे असे जे म्हणतात त्यांना झालेली आहे. पण लढयाचा आर्थिक प्रश्न हा त्याच्या राजकीय कार्यक्रमापासून असा वेगळा करता येणार नाही. राजकीय प्रश्नांपासून आर्थिक प्रश्न निराळे करणे ही फार गंभीर चूक ठरेल व ती परिणामी धोका देईल. कॉंग्रेसचे अध्यक्ष (जवाहरलाल नेहरू) हीच चूक करीत आहेत. त्यांना खरोखर असे वाटते आहे का, की कॉंग्रेसच्या आजच्या पुढारीपणाखाली काबीज केलेली सत्ता— असे होणे शक्य नाही पण धरून चालू या— त्यांच्या समाजवादी ध्येयांच्या पूर्तीला कुठल्यातरी दृष्टीने उपयोगी पडेल ? त्यांचा असा विश्वास असेल तर ते एक खेदकारक चूक करीत आहेत. बहुतेक कॉंग्रेस पुढारी

आपल्या ध्येयाचे कट्टर विरोधी आहेत हे त्यांना नजरेआड करून चालणार नाही. या लोकांच्या हातात जेव्हा सत्ता येईल तेव्हा ज्या कल्पनांना ते संकट मानतात त्यांच्याविरुद्ध सामना देण्याची ताकद मिळाल्यावर ती न वापरता ते आपला विरोध कमी करतील, यावर नेहरूंचा विश्वास आहे काय ? सत्ता मिळाल्यास उलट त्यांचा विरोध कृतिशील आणि परिणामकारक होईल.

आर्थिक व राजकीय प्रश्न निरनिराळे सोडवावे म्हणून त्यांची तुम्ही पूर्णपणे फारकत करू शकणार नाही. राष्ट्रवादाचे मूलभूत प्रश्न हे समाजवादाच्या प्रश्नापेक्षा कमी आर्थिक महत्त्वाचे नाहीत. पहिल्याचे स्वरूप जितके शुद्ध राजकीय चळवळ म्हणून राहिलेले नाही तितकेच दुसऱ्याचे शुद्ध आर्थिक राहिलेले नाही. या दोन्हीतील फरक असा आहे की एकाचे आर्थिक प्रश्न दुसऱ्याच्या आर्थिक प्रश्नाशी तंतोतंत जुळणारे नाहीत. आपण काँग्रेसवर समाजवादाची सक्ती करण्यास सुचवत नाही या नेहरूंच्या म्हणण्याचा अर्थ ते राष्ट्रीय चळवळीकडून समाजवादाचे आर्थिक प्रश्न सोडवण्याची अपेक्षाच करीत नाहीत असा असेल तर ते खचितच बरोबर ठरेल. पण मग त्यांना पुढे राष्ट्रवादाचे निश्चित आर्थिक प्रश्न, जे भांडवलशाही क्रांतीचे द्योतक आहेत तेच काँग्रेसपुढे ठेवावे लागतील. दुर्दैवाने असे दिसून येत आहे की, ते या आर्थिक प्रश्नांची समाजवादाशी गल्लत करीत आहेत आणि त्यामुळे राष्ट्रवादी चळवळीचे आर्थिक प्रश्न डावलण्याची संधी काँग्रेसपुढाऱ्यांना देत आहेत.

जोपर्यंत काँग्रेस, राष्ट्रवादाच्या आर्थिक प्रश्नांबद्दल उदास रहात आहे तोपर्यंत तिच्या राजकीय ध्येयाकडे तिची प्रगती होणार नाही. शेतकी प्रश्न हा राष्ट्रीय क्रांतीचा आर्थिक पाया आहे. हा समाजवादाचा प्रश्न नाही. समाजवाद आणणे हा ताबडतोबीचा प्रश्न नाही. पण क्रांती काही लांबचे ध्येय नाही. आणि भांडवलवादी क्रांती ही एक सामाजिक क्रांती सुद्धा असतेच. तिचा कार्यक्रम आर्थिक असतो. मग काँग्रेस राजकारणाच्या नेत्यांनी समाजवाद बाजूला ठेवून या भांडवली क्रांतीवरच भर का देऊ नये ? जर या भांडवली क्रांतीच्या व्यासपीठावर काँग्रेस उभी राहिली नाही तर ती राजकीय स्वातंत्र्य कधीच मिळवू शकणार नाही. राष्ट्रवादाचे निश्चित आर्थिक प्रश्न नुसते विसरणेच नव्हे तर त्यांबद्दल प्रतिकूलही असणे आणि त्यांची निव्वळ राजकीय चळवळ बनवणे म्हणजे राष्ट्रवादाला दुर्बळ बनवणे आहे. या लाजिरवाण्या मार्गाकडे काँग्रेस झुकत असल्याचे दिसत आहे. राजकीय स्वातंत्र्याच्या ध्येयाला त्याच्या अर्थकारणापासून विलग केल्यामुळे हे स्वातंत्र्य निव्वळ आभासात्मक बनले आहे.

शेतकरी जनतेच्या कल्याणाची कळकळ फक्त बोलण्यापुरतीच बाळगणारे काँग्रेसचे नामांकित पुढारी जमीनदारीचे कट्टर पुरस्कर्ते आहेत. या कसोटीच्या सामाजिक आर्थिक प्रश्नाबाबतचे काँग्रेसचे धोरण, स्वराज्य पक्षाच्या अधिकृत कार्य-

क्रमात प्रथमच सविस्तर सांगितले आहे. त्यात हिंदी समाज व संस्कृती यांचे आधार-स्तंभ म्हणून जमीनदारांना गौरविलेले आहे आणि या त्यांच्या स्थानाला धक्का लावण्याचा इरादा नसल्याचेही स्पष्ट केले आहे. स्वराज्यपक्ष म्हणजे काँग्रेस नव्हे असा युक्तिवाद करून चालणार नाही. कारण, एक म्हणजे स्वराज्य पक्षाच्या सामाजिक कार्यक्रमापासून नाफेर परंपरावाद्यांनी आपला संबंध तोडून टाकलेला नाही. दुसरे म्हणजे या पक्षाने नेहमीच काँग्रेसचा अंतर्गत भाग म्हणून कार्य केले आणि शेवटी त्याचे पूर्ण पुढारीपण बळकावले. शिवाय जमीनदारीच्या समर्थनाच्या धोरणाला पाठिंबा देणारी अधिकृत कांग्रेस पुढाऱ्यांची कितीतरी जाहीर मते उदाहरण म्हणून दाखवता येतील. विचारवंत राष्ट्रवाद्यांच्या कार्याबद्दल जमीनदारांनी जेव्हा जेव्हा असमाधान व्यक्त केले आहे तेव्हा तेव्हा, तुम्हाला दुखवण्याची काँग्रेसची इच्छा नाही असे त्यांना आश्वासन देण्यासाठी कुठला ना कुठला तरी काँग्रेस पुढारी उतावीळपणे पुढे सरसावला आहे. अर्थात ही त्यांच्या परान्नपुष्टतेच्या हक्कांची आश्वासने, तुम्ही चांगले वागले पाहिजे या विनंतीला भर म्हणून सर्वसाधारणपणे दिली जात आहेत. राष्ट्रवादी कार्यकर्त्यांमध्ये पसरणाऱ्या लोकसत्ताक व सामाजिक कल्पना जमीनदारांना अस्वस्थ करीत, सतावीत, आणि घावरवीत आहेत. त्यामुळे ही ऱ्हास पावत चाललेली सरंजामी किंवा अर्धसरंजामी पद्धत नामशेष करण्याच्या वाढत्या मागणीचा वारंवार जाहीर निषेध करणे काँग्रेस पुढाऱ्यांना भाग पडत आहे.

या संबंधीची काही शंका असेल तर ती फक्त एकाच गोष्टीने निवारण होईल. ती म्हणजे या प्रश्नांवरील गांधींचा दृष्टिकोन. सर्वसामान्य राजकीय परिस्थितीत त्यांचा दृष्टिकोन, हे त्यांचे वैयक्तिक मत म्हणून गणले गेले असते. कारण त्यांनी काँग्रेसशी आपले संबंध तोडले आहेत असे मानले जाते. पण त्यांचा काँग्रेस सभासदत्वाचा हा गाजावाजा केलेला राजीनामा फक्त दिखाऊच आहे. ते अजूनही काँग्रेस धोरणाचे हुकुमशहा आहेत, "त्याचे तहायत शैनशहा आहेत". शिवाय सध्याचे नामधारी अध्यक्ष स्वतःच निवेदन करतात की "गांधी म्हणजे काँग्रेस." तेव्हा काँग्रेसचे कुठचेही धोरण निश्चित करण्यात त्यांचा दृष्टिकोन निर्णयात्मक मानलाच पाहिजे. अगदी खात्रीच्या भूमिकेवरून बोलायचे तर मी गांधींचा दृष्टिकोन नेहरूंच्या शब्दातच सांगतो : "पण गांधी तालुकदारी पद्धती मान्य करतात आणि ती चालू राहिली पाहिजे असे मानतात असे, गेल्या वर्षभरात मला आढळून आल्याने मी चकित झालो आहे." (आत्मचरित्र पान ५३५) हा शोध फार उशीरा लागला आहे, आणि नेहरूंनासुद्धा तो गेल्या वर्षभरात लागला हे आश्चर्यच आहे. कारण नेहरूंनी स्वतः उद्धृत केलेल्या खालील उताऱ्यातील निवेदन गांधींनी आधीच, १९३४ सालीच उत्तर प्रदेश जमीनदारांच्या सभेत केले होते. "जमीनदार आणि शेतकरी या दोघांच्याही

हृदयपरिवर्तनाने त्यांच्यात चांगले संबंध निर्माण करता येतील. हे जर करता आले तर दोघेही शांततेने आणि सलोख्याने राहू शकतील." जमीनदारी किंवा तालुकदारी पद्धत नष्ट करण्यास त्यांचा कधीच पाठिंबा नव्हता. ते पुढे असे म्हणाल्याचे जाहीर झाले आहे की, "न्याय्य कारणाशिवाय सधन वर्गाची खाजगी मालमत्ता काढून घेण्यात मी भागीदार होणार नाही. तुमची सर्व मालमत्ता तुमच्या रयतेची तुम्ही विश्वस्त ठेव मानाल आणि तिचा उपयोग त्यांच्या कल्याणाकरिता कराल या संभवाकरिता, तुमच्या हृदयाला स्पर्श करणे आणि तुमचे परिवर्तन करणे हा माझा उद्देश आहे. पण समजा जर अन्यायाने तुमची मालमत्ता हिरावून घेण्याचा प्रयत्न झाला तर मी तुमच्या बाजूला उभा असल्याचे तुम्हाला आढळून येईल." (आत्मचरित्र.)

या विश्वस्ताच्या कल्पनेचा दांभिकपणा उघड करणारे शोधक विवरण नेहरूंनीच केले आहे. यापूर्वीसुद्धा मे १९३१ मध्ये, उत्तरप्रदेश गव्हर्नराशी झालेल्या मुलाखतीनंतर, जमीनदार व शेतकरी यांना उद्देशून काढलेल्या जाहीरनाम्यात गांधींनी आपला वरील दृष्टिकोन मांडला आहे. त्यात त्यांनी, शेतकऱ्यांना आपल्या शक्तीनुसार जास्तीत जास्त सारा भरण्याचे आव्हान केले आहे. आणि चमत्कार असा की या सुप्रसिद्ध जाहिरनाम्याचा नेहरूंनी आपल्या आत्मचरित्रात फक्त ओझरता उल्लेख केला आहे. गांधीवादाच्या "विरोधात्मकतेने" त्यांचा, शिष्य नाही तरी मोठा विश्वासू असा हा चहाता पुरता गोंधळून गेला असल्यास नवल नाही. ते लिहितात, "दलित आणि पीडल्या गेलेल्यांच्या उन्नतीसाठी आपली बुद्धी व भावना जागृत ठेवणारे हे (गांधी), दुःख आणि ऱ्हास निर्माण करणारी ही पद्धती आपोआप नाहीशी होत असताना तिला उचलून का धरीत आहेत? यातून ते मार्ग शोधत आहेत हे खरे आहे. पण तो भूतकाळाकडे जाण्याचा मार्ग कडीकोयंडात बंद नाही काय? आणि दरम्यान् या प्रगतीच्या मार्गात अडथळा म्हणून उभे असलेले जुन्या पद्धतीचे अवशेष– सरंजामी राज्य, मोठी जमीनदारी, तालुकदारी आजची भांडवलीशाही पद्धती, या सर्वांना ते आशीर्वाद देत आहेत." (आत्मचरित्र, पान ५२८)

नेहरू स्वतः जरी गांधींच्या सामाजिक दृष्टिकोनाचे कट्टर प्रतिगामी स्वरूप जाणत असले तरी हे सत्य धैर्याने सांगणाऱ्यांवर त्यांनी नाखूष असावे हे आश्चर्य नाही काय? आजसुद्धा सामाजिक प्रश्नाकडे पहाण्याच्या गांधीवादी दृष्टिकोनाचे जे समर्थन केले जात आहे ते त्यांना मान्य असणे शक्य नाही. तरीसुद्धा, अजूनही ते या उघड प्रतिगामी तत्त्वाचा "जीवन आणि जीवनाचे प्रश्न यांकडे पहाण्याचा शुद्ध धार्मिक दृष्टिकोन" म्हणून आदर करीत आहेत. या शुद्ध धार्मिक दृष्टिकोनापासून जितक्या लवकर राष्ट्रीय राजकारण स्वतंत्र होईल तितके बरे. क्रांतिकारक लोकांची गोष्ट तर सोडूनच द्या पण कुठलीही पुरोगामी व्यक्ती, या

दृष्टिकोनाचे कौतुक किंवा आदर करून किंवा त्याबद्दल पूर्णतः उदासीन राहून स्वतःच्या समाजवादी कार्याबद्दलच्या प्रामाणिकपणावर हक्क सांगू शकेल हे शक्य नाही.

" काँग्रेस आणि समाजवाद " यावर नेहरूंनी केलेले जाहीर निवेदन मी नुकतेच वाचले. त्यात त्यांनी गोलमेज परिषदेत गांधींनी केलेल्या भाषणातील पुढील उतारा दिला आहे. " सर्वात महत्त्वाचे म्हणजे काँग्रेस ही मुळात लाखो मुक्या अर्धपोटी जनतेची प्रतिनिधी आहे. मग ती जनता ब्रिटिश हिंदुस्तानातील असो की ज्याला हिंदी हिंदुस्तान म्हणतात त्यातली असो. तो प्रश्न नाही. काँग्रेसच्या मते ज्या प्रत्येक हितसंबंधांचे रक्षण होणे जरूर आहे. ते हितसंबंध या लाखो मुक्या जनतेच्या हितसंबंधांशी निगडित असले पाहिजेत. जर या हितसंबंधात खरोखरीचा संघर्ष असला तरी लाखो मुक्या जनतेच्या हितसंबंधासाठी काँग्रेस आपल्या प्रत्येक हितसंबंधाचा त्याग करील. "

ह्या भावना कौतुकास्पद आहेत. गांधींच्या कळकळीबद्दल मला क्षणभर सुद्धा शंका नाही. तरीपण वरील निवेदनापूर्वी किंवा नंतर तावडतोब केलेल्या गांधींच्या दुसऱ्या एका जाहीर निवेदनामुळे या भावनांशी सुसंगत अशी क्रिया घडणे कसे अशक्य आहे हे मी जाहीरपणे दाखवून दिलेले मला आठवते. पुन्हा येथे सुद्धा गांधींच्या उच्च मानवतावादाच्या कळकळीबद्दल मला संशय व्यक्त करावयाचा नाही. आता माझा मुद्दा पूर्वी होता आणि आजही आहे तो असा की हा कळकळीचा प्रश्न नसून शुद्ध तर्कवादाचा आहे: गांधींच्या संशयातीत मानवतावादी भावना त्यांच्या नैतिक तत्त्वांच्या व सामाजिक प्रश्नांबद्दलच्या धार्मिक दृष्टिकोनाला विरोधी असल्यामुळे निष्प्रभ होतात. गोलमेज परिषदेत ते जे बोलले त्यात जर अर्थ असेल (आणि ते बोलले त्यावेळी त्यात अर्थ होता यावर विश्वास असणाऱ्यांपैकी मी एक आहे ) तर त्यांच्या या भावनांचा आणि सधन वर्गावर जर कधी हल्ला झाला तर त्यांच्या हितसंबंधांचे समर्थन करण्याच्या त्यांच्या जाहीर निश्चयाचा मेळ कसा घालणार ?

म्हणून लाखो मुक्या जनतेच्या हितसंबंधांचे रक्षण करण्याची काँग्रेसची तयारी वाटते तितकी खात्रीची नाही. " जर हितसंबंधाचा खराखुरा संघर्ष असला तर, " ही अट स्पष्टपणे गृहीत धरलेली आहे. आता आपण, कुठल्याही परिस्थितीत निरनिराळ्या वर्गात कुठलाही कलह असता कामा नये या जुन्या राष्ट्रीय तत्त्वाच्या विरुद्ध उभे राहिलो आहोत. पण वर्गविरोध हे प्रस्थापित सामाजिक पद्धतीचे मूलभूत अंग आहे, हे धडधडीत सत्य, सोयीस्करपणे डोळ्याआड केले गेले आहे. " जर खराखुरा संघर्ष असला तर " ही अट असे सूचित करते की काँग्रेसच्या मते असा संघर्ष अस्तित्वात नाही आणि, निर्माण होण्याचे काही कारणही नाही, केव्हाना केव्हा तरी निर्माण होणारा हा संघर्ष टाळण्याचा फक्त एकच मार्ग आहे.

तो म्हणजे लाखो मुक्या जनतेनी नेहमीच मुके रहावे म्हणून त्यांचे मन वळवणे. ज्या कर्मांमुळे वरचे वर्ग भोगीत असलेल्या अधिकारांची त्यांना हमी मिळेल असे कर्म करीत रहाणे आणि त्याचे गुणगान गात रहाणे हा होय. शोषितांना, सामाजिक गुलामगिरी ही विधिघटना आहे असे मान्य करावयास लावले तरच फक्त वर्गकलह टळू शकेल.

अध्यात्मवादी संस्कृतीच्या प्रशंसित परंपरेने हे ऐहिक कार्य आजपर्यन्त केले आहे आणि कदाचित अजूनही काही काळ ती ते करील. हिंदु समाजात हित-संबंधांचा संघर्ष नसतो, आणि प्रस्थापित सामाजिक पद्धतीच्या चौकटीत सुसंगती असलीच पाहिजे हीं तत्त्वे मान्य केल्यास, कधी कुठलाही संघर्ष निर्माण झालाच तर तो "अस्सल" नसून हिंदु प्रकृतीला परकीय, असा भौतिकवादाच्या आसुरी वृत्तीने कृत्रिमपणेच उववलेला असा असणार असे समजणे ओघानेच येते. प्रस्थापित सामाजिक संबंधांमुळेच फक्त जीवनाच्या उच्च तत्त्वांना आणि अंत:करणाच्या मीलनाला स्फूर्ती मिळते यावर विश्वास असल्यामुळे त्यात अडथळा निर्माण करणारी वृत्ती आणि तिची प्रगट रूपे दडपून टाकलीच पाहिजेत. याचा स्वाभाविक परिणाम म्हणजे जर कधी लाखो मुक्या लोकांनी प्रस्थापित पद्धती बदलण्याचा प्रयत्न केलाच तर तिचे वाटेल त्या मार्गाने रक्षण करणे हा होय. या परिणामामुळे अहिंसेचे तत्त्व प्रस्थापित करण्या-करिता अमलात आणलेला हिंसेचा मनोरंजक तमाशा जगाला दाखविला जाईल. पीडितांच्या मुक्तीच्या लढ्याचे ध्येय, हत्यार न वापरता साधणे शक्य नाहीच. पण जें हत्यार वापरण्याला कर्मठ नैतिक भूमिकेवरून मनाई करतात, तेच हिंसेचे आचरण करताना, किंवा जनतेला दाबून टाकण्यासाठी केलेल्या हिंसेकडे दुर्लक्ष करताना नेहमीच आढळतात. आपले जुने राष्ट्रवादी यापेक्षा निराळे वागतील यावर विश्वास ठेवण्यास तर्काचा आधार नाही. बहुसंख्यकांच्या हक्कांच्या मूठमातीने अल्प-संख्यकांना हक्काची हमी देणारी जी सामाजिक पद्धती, तिच्या समर्थनाकरिता नैतिक तत्त्वे आणि धार्मिक संमतीची आराधना करणारी त्यांची विचारसरणीच त्यांच्या कृतीचे स्वरूप निश्चित करील.

◆ ◆ ◆

नुकत्याच कराची येथे भरलेल्या राज्यपरिषदेच्या कामकाजावर भाष्य करिताना या "हिंदुस्तानच्या सेवकाने" पुन्हा एकदा असे सांगितले आहे की फेडरल असेंब्लीला प्रतिनिधी निवडण्याच्या पद्धतीचा निर्णय "राजे लोकांच्या सद्विवेकबुद्धीवर" सोपवला पाहिजे. या गोष्टीला गोलमेज परिषदेत गांधींनी मान्यता दिली होती. म्हणजे याचा अर्थ असा की राष्ट्राच्या लाखो मुक्या जनतेचे प्रतिनिधीत्व करणाऱ्यांच्या उघड विरुद्ध असलेल्या या राजे लोकांच्या

मेहेरबानीवर सर्व जनतेला सोपवणे. स्वत: प्रतिनिधी नेमण्याच्या हक्कावद्दल या राजेलोकांचा आग्रह आहे आणि तसे करण्याचा त्यांचा हक्क काँग्रेसने आपल्या मूक संमतीने मान्य केला आहे.

आणि तरीही मला वाटते, जवाहरलाल नेहरूंनी लंडनमधील आपल्या एका जाहीर निवेदनात गांधींवर टीका करण्यावावत "वैठ्या समाजवाद्यांवर" कोरडे ओढले होते. वैठे समाजवादी म्हणून कुणाचा उपहास केला आहे हे समजणे कठीण आहे. पण जे फक्त समाजवाद्यांवद्दल वोलतात ते असावेत असे धरून चालू या. मग नेहरू स्वत:च तर त्या सर्वांमध्ये हिंदुस्तानात प्रमुख आहेत. आणि हा काही तुच्छतेने केलेला उल्लेख नव्हे. कारण समाजवाद अमलात येण्यापूर्वी किंवा तो स्थापन होण्यापूर्वीही , त्याचा वराचसा वोलवाला झाला पाहिजे, आणि समाजवादाचा वोलवाला याचाच अर्थ प्रतिगामी आणि विरोधी सामाजिक ध्येयावर टीकेची आवश्यकता. जे समाजवादावद्दल फक्त वोलतात त्यांना गांधींवर टीका करण्याचा अधिकार नाही असे जर नेहरूंना म्हणावयाचे असेल तर ते फारच वाईट आहे. आणि गांधीवादावर टीका करणाऱ्यांचा व्यर्थ वडवडणारे म्हणून निपेध करणे तर त्याहूनही वाईट आहे.

उदाहरणार्थ, मी हा गुन्हा कवूल करतो की आपल्या देशाच्या राजकीय जीवनात गांधीवादाची अभद्र छाया पडल्यापासून मी त्याचा चिकाटीचा टीकाकार आहे. पण वैठे समाजवादी असण्याचा आरोप मात्र मी मोठ्या हिरीरीने खोडून काढीन. नेहरूंनी गांधीवादाच्या टीकाकारांवर कोरडे ओढले तेव्हा ते मलाच अनुलक्षून होते असे मला मुळीच म्हणावयाचे नाही. माझे स्थान मी ओळखतो, आणि अगदी कोरडे ओढण्यासाठीसुद्धा, काँग्रेसचा हा नियोजित अध्यक्ष माझी आठवण ठेवील अशी घमेंड मी मारीत नाही. या मानाला मी योग्य नाही. ज्याने आपले सर्व आयुष्य हिंदुस्तानच्या स्वातंत्र्याचे ध्येय साधण्यासाठी थोडेफार प्रयत्न करण्यात घालवले आहेत, आणि त्या गुन्ह्यासाठी जो तुरुंगात खिचपत पडला आहे, त्या क्षुद्र माणसाचा, कामात असलेल्या लोकांनी विचार का करावा ? तरीही जे कोणी कष्ट आणि त्याग या गुणावद्दल सारखे वोलत आहेत त्यांना याचा इतका विसर पडावा हे जरा नवलच आहे. माझा या गुणांवर विश्वास नसेलही, पण जे कोणी सक्तीने नव्हे तर खुषीने या गुणांचे जसे आचरण करतात तसेच आचरण करण्याचा विक्षिप्तपणा माझ्यात होता. असो. ती गोष्ट निराळी आहे. आणि माझी इच्छा असती तर त्या संवंधातील सत्याचा थोडा प्रयोगही मी करू शकलो असतो. कदाचित् एकाद्या दिवशी करीनही. दंभस्फोट हा माझा नेहमीचाच एक आवडता छंद आहे. या छंदाचा आवेग फार करमणुकीचा असतो. पण या क्षणाला मी नेहरूंच्या गांधींकडे वघण्याच्या दृष्टिकोनावद्दल उत्सुक आहे, आणि त्यातील विरोधात्मकतेवद्दल थोडेफार प्रश्न उत्पन्न करू इच्छित आहे.

अर्थात, त्यांच्या वैयक्तिक संबंधांविषयी मला काही कर्तव्य नाही. माझा प्रश्न असा आहे की गांधींच्या टीकाकारांना बैठे समाजवादी म्हणून तुच्छ का मानले जात आहे? महात्म्याला पूज्य मानण्याचे नेहरूंना पूर्ण स्वातंत्र्य आहे; पण ते आपल्या समाजवादाशी गांधीवादाचा मेळ कसा काय घालणार? महात्मा आपली मते गुप्त ठेवीत नाही. गांधी बुद्धिपुरस्सर प्रतिगामी असतील किंवा नसतीलही. पण ते समाजवादी खात्रीनेच नाहीत. तरीसुद्धा त्यांची सुप्रसिद्ध सामाजिक-आर्थिक मते आणि त्या मतांच्या पुरस्कारार्थ केलेल्या चळवळी यावर केलेली कुठलीही टीका, गांधींची मते काही असली तरी ते व्यावहारिक समाजवादी आहेत या काल्पनिक भूमिकेवरून, व्यर्थ बडबडणाऱ्यांची बडबड म्हणून उपेक्षिली जाते. गांधी हे जगातले महान समाजवादी आहेत असे फार वर्षांपूर्वी नेहरूंनी जितक्या ठामपणे सांगितले असते तितक्या ठामपणे ते आज सांगू शकतील यावर माझा विश्वास नाही. पण आपल्या गांधींबद्दलच्या विरोधात्मक वृत्तीच्या स्पष्टीकरणार्थ ते कल्पित गोष्ट सांगतातच. ती म्हणजे गांधी हिंदुस्तानच्या शेतकरी जनतेला ओळखतात. म्हणजे पर्यायाने नेहरू असे सुचवतात की गांधींचे टीकाकार या जनतेला ओळखत नाहीत. आणि म्हणून या टीकाकारांचा बैठे टीकाकार म्हणून उपहास केला जातो. ह्या टीकाकारांना म्हणे आपण कशाबद्दल काय बोलत आहोत हेच कळत नाही. या टीकाकारांच्या अज्ञानाबद्दलचा आरोप मी जरा बाजूला ठेवतो आणि तो बरोबर आहे असे कबूल करतो; पण त्यामुळे गांधींच्या शेतकी परिस्थितीच्या ज्ञानाबद्दलची खात्री काही कमीजास्त होणार नाही. त्यांना खरोखरच हिंदी शेतकऱ्यांच्या परिस्थितीचे ज्ञान असते आणि त्यांना सुधारण्याची खरी तळमळ असती तर आजच्या त्यांच्या असह्य परिस्थितीला कारणीभूत झालेल्या पद्धतीचे असे दुराग्रही समर्थन त्यांनी केले नसते.

गांधी जे तत्वज्ञान शिकवतात त्या तत्त्वज्ञानाच्या अनुयायांनी जो मार्ग अनुसरलाच पाहिजे तो मार्ग स्वतः गांधी खरोखरीच कधी अनुसरतील यांवर माझा विश्वास नाही. त्यांच्या काही मूर्ख उत्साही चहात्यांनी त्यांना हिंदुस्तानचे मुसोलिनी आणि हिटलर म्हणन उचलून धरले आहे. पण या अतिशय कडक पुजाऱ्यांच्या अपेक्षेच्या पातळीवर गांधी कधीच उतरणार नाहीत. त्यांचे काही शिष्य कदाचित् ही उणीव भरून काढतीलही. ते काहीही असले तरी हिंदुस्तानच्या आध्यात्मिक परंपरेचे सार म्हणन ज्या नैतिक तत्त्वांची फार मोठी छाप राष्ट्रीय चळवळीच्या ध्येयावर आहे त्या तत्त्वांचा तर्कदृष्टचा होणारा परिणाम ही महत्त्वाची गोष्ट आहे. ही छाप इतकी मोठी आहे की काँग्रेसमधील समाजवादाच्या चुकीच्या विचारकल्पना बाळगणारे जहालमतवादी, गांधीवादाच्या प्रतिगामी तत्त्वांपासून दूर जात आहेत असे दिसत असले तरी गांधींच्या काही विक्षिप्त मतांना

ते अजूनही चिकटून आहेत. उदाहरणार्थ नेहरू, हे गांधीवादाचा पगडा फेकून देण्यास असमर्थ असल्यामुळे स्वविसंगतीच्या विषारी भोवऱ्यात फिरत आहेत. हा पगडा अजूनही त्यांना हानिकारक होण्याचा संभव आहे. अहिंसेच्या गांधीप्रणीत मतांच्या आपल्या कार्याशी आपले सामाजिक-राजकीय विचार किती उघड उघड विसंगत आहेत हे त्यांच्या ध्यानात येत नाही याचे खरोखर आश्चर्य वाटते. ते लबाड किंवा मूर्ख नसल्यामुळे, हिंसेबद्दलच्या त्यांना जाहीर तिटकारा वाटत असूनसुद्धा त्यांना गांधीप्रणीत देवतेच्या सोंगाचे दर्शन घेण्यास तयार केलेच पाहिजे.

◆ ◆ ◆

राष्ट्रीय चळवळ ही समाजवादी कार्यक्रम स्वीकारू शकणार नाही. पण राष्ट्रवाद यशस्वी होण्याकरिता तो क्रांतिकारी समाजवादी दृष्टिकोनातूनच स्फुरला पाहिजे. त्याचा सामाजिक क्रांतीला पाठिंबा असला पाहिजे. ही सामाजिक क्रांती म्हणजे साम्राज्यशाहीशी ताटाखालच्या मांजराच्या सलोख्याने वागून पूर्णपणे खुशामती बनल्यामुळे जी सरंजामी पितृसत्ताक पद्धती कृत्रिमपणे कशीबशी तगून राहिली आहे तिचे संपूर्ण उच्चाटन करणाऱ्या लोकसत्ताक स्वातंत्र्याची स्थापना. पण जी सामाजिक पद्धती इतिहासात जमा झाली पाहिजे तिचे समर्थन करणाऱ्या विचारसरणीला राष्ट्रीय चळवळ बांधली गेली आहे अशी परिस्थिती आहे. तिचा राजकीय कार्यक्रम किंवा परकीय सत्तेपासून मुक्तता यांचे महत्त्व, दांभिक अध्यात्मवादाला अनुरूप अशा प्रतिगामी सामाजिक दृष्टिकोनामुळे, नाहीसे झाले आहे. कुठल्याही चळवळीचा राजकीय कार्यक्रम हा तिच्या सामाजिक दृष्टिकोनातून निश्चित केला गेला पाहिजे. राष्ट्रीय पुढारी हे फक्त समाजवादाच्याच विरुद्ध आहेत असे नव्हे तर ते हिंदू समाजाच्या लोकसत्ताक पुनर्रचनेच्याही ते विरुद्ध आहेत. याचा परिणाम म्हणजे "पूर्ण स्वराज्या" साठी लढण्याचे ढोंग करणारा प्रत्येक जण हा वाघाचे कातडे पांघरलेले मेंढरूच ठरला आहे. त्यांचे हात या प्रतिगामी सामाजिक तत्त्वज्ञानाला मोठ्या खुषीने बांधले गेले आहेत. राष्ट्रीय चळवळीला जर आपले राजकीय स्वातंत्र्याचे ध्येय गांठावयाचे असेल तर तिने या छुप्या विश्वासघातकी पुढाऱ्यांपासून आपली सुटका करून घेतली पाहिजे. या नकली देवाचे पितळ मोठ्या निष्ठूरपणे उघडे पाडले तरच त्यांना त्वरेने फेकून दिले जाईल. "आध्यात्मिक साम्यवाद" किंवा "मनूवादी समाजवाद" म्हणून आधुनिक ऋषींनी मोठ्या विद्वत्तापूर्णतेने वर्णन केलेल्या या जुनाट राष्ट्रवादाचे राष्ट्रविरोधी तत्त्व उघडे झाल्यामुळे त्यांच्या विश्वासू अनुयायांचा फायदाच होईल. हे काम केल्याबद्दल कुणीही कृतज्ञता दाखवणार नाही, पण कुणीतरी मांजराच्या गळ्यात घंटा बांधलीच पाहिजे.

वर्गलढ्याबद्दल तिटकारा ही हिंदुस्तानच्या आध्यात्मिक संस्कृतीची खूण आहे. या खुणेप्रमाणे स्वातंत्र्याकरिता लढा हाही निषिद्धच समजला पाहिजे. ईश्वराला फक्त राष्ट्रीय पातळीवर एकता पाहिजे आहे यावर विश्वास ठेवण्याला काहीतरी आधार आहे काय ? विश्वपित्याला आपल्या सर्व मुलांमध्ये एकता असावी अशी इच्छा असेल तर कुठल्याही एका विशिष्ट राष्ट्राच्या मुक्तीलढ्याला वर्गलढ्या-इतकीच हरकत घ्यावी लागेल. एखाद्या राष्ट्रातील शोषित आणि शोषण करणाऱ्या वर्गात एकता निर्माण करण्याचे ध्येय, हे तशाच प्रकारच्या एकतेच्या आंतरराष्ट्रीय क्षेत्रातील ध्येयापेक्षा उच्च का समजावे ? राष्ट्रवादाची आध्यात्मिक विचारसरणी, या प्रश्नाला पटणारे उत्तर देऊ शकणार नाही. म्हणून एकीकडे पूर्ण स्वराज्याबद्दल मोठ्या दिमाखाने बोलत असताना हे गांधीवादी पुढारी थोडी जरी संधी मिळाली तरी साम्राज्यवादाशी तडजोड करण्यास सदैव तयार असतात. धन्यवाद त्यांच्या त्या तत्त्वज्ञानाला, की ज्यामुळे राष्ट्रीय प्रश्न किती सुंदर तऱ्हेने सुटू शकतात हे दाखवण्याची त्यांना संधीच मिळत नाही. हा काही त्यांचा दोष नव्हे. कट्टर गांधीवाद्यांपैकी एक असलेल्या कृपलानींनी नुकतेच उद्‌गार काढले आहेत की जर सरकारने संधी दिली तर महात्मा गांधींना रक्तहीन क्रांती घडवून आणण्यास वेळ लागणार नाही.

वर्गलढा हा रहाणारच. सुधारणेचा इतिहास म्हणजे वर्गलढ्याचा इतिहास या मार्क्सच्या महान् शोधाच्या सत्याला अजूनपर्यंत कुठलाही लायक समाजशास्त्रज्ञ आव्हान करू शकला नाही. हिंदुस्तानच्या लोकांनी सुशिक्षित समाज स्थापल्यापासून त्यांना या वर्गलढ्याचा अनुभव आहे. मार्क्सच्या समर्थनातील अचुकपणाला स्वतः मनूचाच आधार आहे. जो समाज एकतेच्या लक्षणावर आधारलेला आहे त्या समाजाला सामाजिक आचरणाची सविस्तर नीति-धर्म संहिता बनवण्याची गरजच उत्पन्न होणार नाही. कायदेकानू, मग ते नैतिक, धार्मिक किंवा धर्मातीत असोत, त्यांचा उद्देश समाजातील विसंगती आणि हेवेदावे यांच्या पार्श्वभूमीवर निर्माण झालेल्या वर्गांच्या विषमतेत समतोलपणा आणणे आणि समाजात एकता, शांतता व सुव्यवस्था स्थापणे हा आहे. खाजगी मालमत्तेच्या कुठल्याही पद्धतीवर उभारलेल्या सामाजिक रचनेचे, वर्गलढा हे प्रमुख लक्षण असल्यामुळे प्रश्न त्याच्या अस्तित्वाचा नसून त्याकडे बघण्याच्या दृष्टिकोनाचा आहे.

हा नीतिवादी (गांधी), खोट्या एकतेच्या दिखाऊ ढोंगाने म्हणतो की वाईट गोष्टीला उत्तेजन देता कामा नये. याचा अर्थ काय होतो ? हा वर्गवर्चस्वाविरुद्ध लढा म्हणजेच मानवजातीच्या एका भागाने दुसऱ्या भागावर केलेल्या सक्तीचा किंवा शोषणाचा परिणाम होय. अधिक काटेकोर बोलावयाचे तर समाजाला आवश्यक असलेल्या उत्पादनसाधनांवर खाजगी मालकी मान्य करणाऱ्या समाजरचनेचे

वर्गलढा नव्हे तर वर्गवर्चस्व हे मूलभूत लक्षण आहे. अशा सामाजिक पद्धतीत वर्गलढा आनुषंगिक असतो, कारण विकासावर मर्यादा घातली तर ती दूर करण्यास झगडणे हा जसा शरीरधर्म आहे तसेच शोषित आणि दडपले गेलेल्यांनी आपला भार फेकून देण्याची इच्छा धरणे स्वाभाविकच आहे. तेव्हा राष्ट्रीय स्वातंत्र्याचा लढा जरी यदाकदाचित "अधार्मिक" व्यवहारात गुंतण्याचा संभव असला तरी त्याचे नैतिक व ऐतिहासिक समर्थन या विकासशील शरीराच्या आवश्यकतेनुसार करिता येते. ज दडपले गेले आहेत ते नेहमी बंड करण्याच्या परिस्थितीत असतीलच असे नाही. खरे बोलायचे तर स्वातंत्र्याच्या आवश्यकतेची जाणीवही त्यांना कित्येकदा नसते. अशी परिस्थिती असेल तेव्हा समाजात पूर्ण एकता आहे असे मानले जाते. अशी वर्ग-लढ्याच्या बीजांनी भरलेल्या सामाजिक पद्धतीतील ही एकता म्हणजे सर्वसामान्य प्रगती व स्वातंत्र्य यावर स्वार्थीपणाने मिळविलेला तात्पुरता विजय होय. म्हणून वर्गलढा ही वाईट गोष्ट नाही तर वाढ ही जशी शरीरशास्त्राची गरज आहे त्याच-प्रमाणे वर्गलढा हा स्वातंत्र्याच्या वृत्तीचा आवश्यक आविष्कार आहे. निराळ्या शब्दात बोलायचे झाले तर वर्गलढा हा सामाजिक उत्क्रांतीचे साधन आहे. आणि मार्क्सचा हा फार महत्त्वाचा शोध आहे.

म्हणून वर्गलढ्याच्या ऐतिहासिक आवश्यकतेला विरोध म्हणजे असंख्य दडपल्या गेलेल्या मुक्या लोकांना त्यांच्या स्वातंत्र्याच्या सुप्त इच्छेची जाणीव करून देण्याला विरोध करणे आणि त्यांना मनुष्यप्राणी म्हणून वाढण्यास प्रतिबंध करणाऱ्या परिस्थितीला उत्तेजन देणे होय. हे नैतिक किंवा ऐतिहासिक दृष्टीनेही समर्थनीय ठरणार नाही. हा मार्ग स्वातंत्र्य नाकारतो आणि प्रगतीला मारक ठरतो. तो मूलभूत प्रेरणातून उद्‌भवला नसला तरी, नीतिवाद्यांनी आणि मानवतावाद्यांनी प्रतिपादिलेले सर्वकल्याणाचे ध्येय कसे साध्य करून घ्यावे हे समजण्यात ते पूर्णपणे अपेशी झाल्यामुळे उद्‌भवला आहे असे खचीतच म्हणावे लागेल.

वर्गलढा, म्हणजे पीडितांची क्रांती ही फक्त समाजवाद स्थापण्यापुरतीच आवश्यक असते असे नाही. लोकसत्ताक स्वातंत्र्यासाठीचा लढा हा सुद्धा एक वर्गलढाच असतो. खरे म्हणजे, सामाजिक उत्क्रांतीच्या इतिहासाचे प्रत्येक प्रकरण हे विशिष्ट वर्गलढ्याच्या विजयाचे प्रकरण आहे. जेव्हा जेव्हा पीडलेल्यांच्या यशस्वी बंडातून वर्गवर्चस्वाने प्रस्थापित संबंध नष्ट होतात तेव्हा तेव्हा मानवसमाज प्रगतीच्या नवीन दालनात प्रवेश करितो आणि सुधारणेच्या उच्च पातळीवर चढतो.

हिंदुस्तानच्या आजच्या परिस्थितीत वर्गलढ्याला कसलाही विरोध हा लोक-सत्ताक स्वातंत्र्याचा अभाव दर्शवितो. कारण मध्ययुगीन पद्धतीच्या उरल्या सुरल्या अवशेपातून हिंदुस्तानला जर बाहेर पडावयाचे असेल तर तिला लोकसत्ताक

स्वातंत्र्याच्या वर्गलढ्यातून गेलेच पाहिजे. याच्या उलट सामाजिक एकतेच्या तत्त्वाप्रमाणे गांधीवादी आणि बहुतेक जुने राष्ट्रवादी लोकसत्ता न येण्यासाठी झगडा करीत आहेत. अध्यात्मवादी मतप्रणालीत अंतर्भूत असलेली ही लोकसत्ताविरोधी प्रवृत्तीत राष्ट्रीय चळवळीची शक्ती खच्ची करते. राष्ट्रीय चळवळीची ही दुर्बलता तिला अतिशय भयप्रद आणि काळिमा आणणाऱ्या परिस्थितीला नेल्याशिवाय रहाणार नाही.

आपल्या प्रतिगामी सामाजिक दृष्टिकोनाच्या समर्थनासाठी हे राष्ट्रीय पुढारी सामाजिक-राजकीय संक्रमणाचे मोठे विक्षिप्त सिद्धान्त बनवून सांगतात. कृपलानी हे कांग्रेसचे सरचिटणीस आहेत तसेच ते तिचे राजकीय सिद्धान्तकारही आहेत. अलीकडेच "स्टेट्समन"ला लिहिलेल्या एका पत्रात ते लिहितात : "मानवजातीच्या काही भागाच्या जीवनमानात आणि जीवनमूल्यात फार मोठा बदल हाच खरा (क्रांती) या शब्दाचा अर्थ. युरोपमधील मध्ययुगीन पद्धतीपासून आधुनिक पद्धतीपर्यंतच्या बदलाला क्रांती म्हटलेले आहे. याचा अर्थ ती तोफा तरवारींच्या जोरावर झाली असा होत नाही, तर मध्ययुगीन युरोपची मूल्ये बदलली आणि नवीन मूल्ये नवीन पद्धतीत सामावली गेली असा होतो. जुन्या पद्धतींची या नवीन पद्धतींशी तुलना केली तर त्या क्रांतिकारक होत्या."

मूल्यांबद्दलचे हे सारे दणदणीत व्याख्यान ऐकायला फार विद्वत्ताप्रचुर वाटते. पण यात इतिहासाबद्दल आपल्या इच्छेप्रमाणे करून घेतलेला गैरसमज तरी आहे किंवा त्याबद्दल खरोखर खेदकारक असे अज्ञान तरी आहे. मौलाना शौकत अल्ली जेव्हा महात्म्याला आपल्या रुंद खांद्यावर घेऊन मिरवीत होते तेव्हा त्यांनी केलेल्या एका डळमळीत निवेदनाची यावरून मला आठवण होते. अहिंसेच्या सामर्थ्याची ग्वाही देताना हे बडे भाई म्हणाले होते की त्या आध्यात्मिक शक्तीच्या आघाताने बॅस्टिल (फ्रेंच क्रांतीच्या वेळी पडलेला) किल्ला पडला.

ऐतिहासिक गरजांच्या सामाजिक-राजकीय बदलापेक्षा क्रांती अर्थातच जास्त क्रूर नाही. ती सामाजिक उत्क्रांतीच्या पद्धतीतच सामावली असल्यामुळे तिला उत्क्रान्तीपेक्षा जास्त हिंसक असण्याचे काहीच कारण नाही. पण क्रांती ही तोफा बंदुकांच्या जोरावर घडविली जाते हा इतिहासाचा नियम नाकारता येणार नाही. युरोपमध्ये, मध्ययुगीन काळापासून आधुनिकतेपर्यंत झालेले संक्रमण हे शांततामय होते असे ठासून सांगणे, किंवा दुसऱ्या कुठेही तसे संक्रमण होईल असे सांगणे शुद्ध मूर्खपणाचे आहे. मध्य युरोपमधील पाखंडी बंडे, जर्मन शेतकरी-युद्ध, इटालियन प्रजासत्ताकाचा लांबलेला लढा, इंग्लंडमधील मोठी राज्यक्रांती, आणि यादवी फ्रेंच राज्यक्रांती, नेपोलियन काळातील लढाया आणि शेवटी १८४८ ची क्रांती या

सर्व महत्त्वाच्या घटनांनी क्रांती केलेली आहे; आणि या घटना म्हणजे काही करमणुकीची सहल नव्हती की प्रार्थनासभाही नव्हत्या. कृपलानींच्या इतिहासाच्या वाचनात एक फार महत्त्वाची गोष्ट राहून गेली आहे. ती म्हणजे प्रतिक्रांतीची. शांततामय चळवळ म्हणून क्रांती ही प्रगत होत असते, परंतु " जुनी मूल्यमापने " वदलण्यासाठी झगडणे हे तिचे स्वरूप असल्यामुळे या मूल्यांच्या आणि मापनांच्या जोरावर मजबूत उभ्या असलेल्या सामाजिक-राजकीय पद्धतीचा ज्यांना फायदा मिळत असतो ते साहजिकच भयभीत होतात. पर्यायाने सर्वांच्या कल्याणाला आवश्यक असलेल्या अशा या शांततामय सामाजिक क्रांतीची प्रगती थांबवण्याकरिता ते हिंसेचा उपयोग करतात. सामाजिक बदल घडवून आणणाऱ्या पद्धतीत हिंसेची गरज नसताना सुद्धा ही प्रतिक्रांती या पद्धतीत तिचा समावेश करते.

पण काँग्रेसच्या या राजकीय तत्त्ववेत्त्याला इतिहासाच्या या आजच्या आणि कालच्या गोष्टी मुळीच महत्त्वाच्या वाटत नाहीत. क्रांती म्हणजे एक चमत्कार आहे, आणि ज्याअर्थी हिंदुस्तानातील क्रांतिकारी चळवळीला महात्म्याच्या मार्गदर्शनाचा आशीर्वाद आहे त्याअर्थी तिचा विजयही अद्‌भुत असणारच, या आपल्या सिद्धान्ताला ते हट्टाने चिकटून रहातात. कृपलानी पुढे लिहितात : " जर हिंदुस्तानला कुठल्याही कार्यक्षेत्रात स्वतःच्या कर्तबगारीवर टिकून रहावयाचे असेल तर त्याच्यात क्रांतिकारक बदल होण्याची आवश्यकता आहे. " हे विचार आशादायक आहेत. पण हुरळून जाऊ नका.. पुढे काय वाढले आहे पहाः "गांधीजींनी असे म्हटल्याचे प्रसिद्ध झाले आहे की जर सरकारने त्यांना मदत केली तर ते अद्‌भुत काम करू शकतील. त्यांना जे म्हणावयाचे होते त्याचा साध्या सरळ राजकीय भाषेत असा अर्थ आहे की जर अखिल भारतीय ग्रामोद्योग संघाला सरकारचा सहानुभूतिपूर्वक पाठिंबा आणि सहकार्य मिळाले असते तर त्यांनी क्रांती करून दाखविली असती. क्रांती ही तोफा तरवारींनी आली पाहिजे असे नाही, आणि असहकार किंवा सविनय कायदेभंगानेही येण्याची गरज नाही. ती सरकारच्या सहकार्याने आणि मदतीनेही येऊ शकेल. सरकारच्या मदतीने जर खरेखुरे आणि विश्वसनीय सहकार्य आणणे शक्य झाले तर तो एक चमत्कार होईल; आधुनिक भाषेत ती एक क्रांती ठरेल. "

म्हणून शेवटी काय ? तर चमत्कार ! आणि तो जर कधीकाळी होणारच असेल तर तो महात्मा करणार नाही, तर अखेरचा निर्णायक शब्द दुसऱ्या पक्षाच्या हाती राहील. १९२९ मध्ये अखिल भारतीय काँग्रेस कमिटीने एक ठराव पास केला. त्या ठरावात म्हटले आहे की, " आमच्या देशाचे परकीय राज्यकर्ते आपल्या स्वतःच्या फायद्याकरिता समाजाच्या ज्या आर्थिक पद्धतीला पाठिंबा देतात ती पद्धती सर्वस्वी नसली तरी बहुतांशाने जनतेच्या दारिद्र्याला आणि दुःखाला जबाबदार

आहे. आणि म्हणून जनतेच्या या परिस्थितीत म्हणण्यासारखी सुधारणा होण्यासाठी ह्या पद्धतीत क्रांतिकारक बदलांची आवश्यकता आहे ". या "क्रांतिकारक बदलांचे" महत्त्व कृपलानी सुद्धा मान्य करतात. पण ज्या सामाजिक पद्धतीत या क्रांतिकारक बदलांची आवश्यकता आहे, नेमक्या त्याच सामाजिक पद्धतीच्या अस्तित्वावर परकीय राज्यकर्त्यांचे इथले वास्तव्य निगडित असताना हे बदल परकीय राज्यकर्त्यांच्या सहकार्याने काहीही अपाय न होता घडवून आणता येतील असे ते ठामपणे सांगतात ! ब्रिटिश लोक सुधारणेचे निःस्वार्थी पाद्री म्हणून हिंदुस्तानात आले यावर त्यांचा विश्वास खात्रीने नसणार. मग ज्या सामाजिक पद्धतीमुळे त्यांचा फायदा होतो त्यात " क्रांतिकारक बदल " घडवून आणण्यात ते मदत करतील अशी अपेक्षा त्यांच्याकडून कशी करता येईल ? आणि तरीसुद्धा स्वतःलाच मारक ठरतील अशांच्या प्रयत्नाने कधी " क्रांती " आलीच तर तो खरोखरच चमत्कार म्हणावा लागेल. पण ही अपेक्षा दिसते तितकी मूर्खपणाची नाही. कारण जे " क्रांतिकारक बदल " अद्‌भुत रीतीने घडून येतील अशी अपेक्षा आहे ते खरोखरी आवश्यक असलेले बदल नव्हतेच. ते "जीवनमान आणि जीवन-मूल्ये" यांचे बदल आहेत, समाजाच्या आर्थिक रचनेचे नव्हेत. ही " आध्यात्मिक क्रांती " होणार आहे, समाजपुनर्रचनेची नव्हे. क्रांतीचा हा नवा सिद्धांत काँग्रेस पुढाऱ्यांना यांचा खरा रंग लपवण्यास उपयोगी पडतो. पण दोन विरुद्ध टोकाच्या मतप्रणाली इतक्या सहज मिळत्याजुळत्या करून दाखवणारा सदसद्विवेकबुद्धीचा हा प्रकार मोठा संशयास्पद आहे.

◆ ◆ ◆

तेव्हा या देशात आता नागरिक स्वातंत्र्यसंस्था सुद्धा आपल्याला मिळणार आहे. अर्थात प्रत्येक बाबतीत आपण जगाबरोबर असले पाहिजे. पण ज्या देशात नागरिक स्वातंत्र्य नाही त्या देशात नागरिक स्वातंत्र्य संस्था स्थापणे, आणि ज्या लोकांचा नागरिक स्वातंत्र्यावर विश्वास नाही किंवा ज्यांची नागरिक स्वातंत्र्याची कल्पना असून नसल्यासारखीच आहे अशा बहुतेक लोकांचा त्यात भरणा असणे हे विक्षिप्त व निरुपयोगी आहे. आपल्याकडे नसलेल्या गोष्टींचे रक्षण करण्यास उठणे हे तऱ्हेवाईकपणाचे नाही काय ? नागरिक स्वातंत्र्यावर विश्वास असणाऱ्यांनी प्रथम ते मिळविण्याची तयारी केली पाहिजे. नाहीतर रक्षण करण्यासाठी त्यांच्याजवळ काहीच असणार नाही. जर खऱ्या प्रश्नाला तोंड द्यावे लागले तर हे चुकारतट्टू लढवय्ये आणि विद्वान कायदेपंडित जितक्या त्वरेने या संस्थेला मिळून आहेत तितक्याच त्वरेने त्याकडे पाठ फिरवतील. सर तेजबहादूर सप्रू हे फार चाणाक्ष गृहस्थ आहेत, म्हणून त्यांनी यात सामील होण्याचे नाकारले आहे. या नव्या धडाडीच्या अग्रमान

घेणाऱ्या काँग्रेसच्या अध्यक्षांपेक्षा त्यांना या प्रश्नाची जास्त स्पष्ट कल्पना असावी असे दिसते. देशाच्या आजच्या परिस्थितीत, नागरिक स्वातंत्र्याचा प्रश्न गंभीर राजकीय समस्या उपस्थित केल्याशिवाय रहाणार नाही. आणि या समस्या सूत्रबद्ध केल्या नाहीत तर ही योजलेली संस्था म्हणजे एक मूर्ख, अर्ध्याकच्च्या, राष्ट्रीय लोकसत्तावाद्यांना फसवणारी आणि काहीही निष्पत्ती न होता नुसता देखावा करणारी संस्था होईल. या संस्थेत जे कोणी सामील होत आहेत ते सर तेज वहाद्दरांपेक्षा , राजकीय दृष्ट्या अधिक लोकसत्तावादी आणि सामाजिक दृष्ट्या अधिक उदारमतवादी, किंवा कमी प्रतिगामी नाहीत. फक्त ते त्यांच्याइतके प्रामाणिक नाहीत आणि जोपर्यंत काही जोखमीचे काम त्यांना करावयाचे नाही तोपर्यंत चालत्या गाड्यावर उड्या मारण्यात ते मागे रहाणार नाहीत.

चौकशीविना बंदीत ठेवलेल्या राजकीय कैद्यांच्या सुटकेचा, सरकारला सल्ला देणारा ठराव मधून मधून विधानसभेत आणला जातो. असे करणे म्हणजे ज्या कैद्यांची चवकशी होऊन जे दोषी ठरवले गेले आहेत त्यांच्या बंदीवर शिक्कामोर्तब करणे होय. यातून असा अर्थ पर्यायाने निघतो की जेव्हा या दुसऱ्या प्रकारच्या राजकीय बंद्यांना सोडून देण्याची सत्ता विरोधी पक्षाच्या हातात येईल तेव्हाही त्यांना सोडता कामा नये. जर तुम्ही चवकशीविना कैदेला विरोध करण्यापुरतेच मर्यादित राहिलात तर पर्यायाने , जुलुमाची हत्यारेच असलेली जी कायद्याची कोर्टे आहेत, त्या कोर्टांच्या साहाय्याने केलेल्या राजकीय छळाला तुम्ही संमती देता. नागरिक स्वातंत्र्याची गळचेपी झाली तरी चालेल पण ती कायद्याने करा, ही नागरिक स्वातंत्र्याच्या समर्थनाची नवी तऱ्हा दिसते. आणि नागरिक स्वातंत्र्यावद्दल विक्षिप्त कल्पना असणारेच ही तऱ्हा मान्य करू शकतात. राजकीय गुन्हा करणाऱ्याचा छळ जर कायद्याने होत असला तर तो सहन करण्यासारखा आहे. पण ज्या कायद्यांना हे कळकळीचे आव्हान केले आहे त्या कायदे वनवण्याच्या प्रचलित पद्धतीला नागरिक स्वातंत्र्याच्या अगदी प्राथमिक तत्त्वांचे सुद्धा वावडे आहे. न्यायदेवतेला एका प्रकारच्या कायद्याने संतुष्ट करावयाचे आणि दुसऱ्या प्रकारच्या कायद्याच्या (नियम आणि वटहुकूम हे सुद्धा काटेकोर, कायदेशीर दृष्टीने कायदेच ठरतात.) थोड्याशाही आधाराने तिच्यावर जुलूम जवरदस्ती करावयाची असा तिचा अपमान का करता ? इंडियन पिनल कोडाचे १२४ ए आणि १२१ ए हे भाग नागरिक स्वातंत्र्याच्या दृष्टीने क्रिमिनल अमेंडमेंट ॲक्टपेक्षा काय कमी पाशवी किंवा कमी अपायकारक आहेत ? इंडियन पिनल कोडला काहीतरी घटनात्मक आधार आहे काय ? हे स्पष्ट असलेले प्रश्न उपस्थित करा म्हणजे नागरिक स्वातंत्र्यसंस्थेच्या दिखाऊ नाटकाचा वोजवारा उडेल. जर हे नाटक असेच चालू

राहिले तर ते खऱ्याखुऱ्या समस्यांत गोंधळ मात्र माजवेल आणि चांगल्यापेक्षा वाईटच जास्त निर्माण करील.

◆ ◆ ◆

कांग्रेसने, राजकीय दृष्ट्या गांधीवाद सोडलेला दिसतो; पण तात्त्विक दृष्ट्या तिने महात्म्याच्या आणखीनच दुसऱ्या अध्यात्मिक तत्त्वांचा समावेश आपल्या कार्यक्रमात केला आहे. नाहीतरी सत्य हे काँग्रेसचे मूलभूत तत्त्व म्हणून अहिंसेला जोडलेलेच आहे. तेव्हा या संदिग्ध संज्ञेची व्याख्या काय असे एकाद्याने विचारणे स्वाभाविकच आहे. ज्यांना श्रद्धाळूपणाच्या अध्यात्मिक बुद्धीची देणगी मिळाली नाही त्यांच्या डोक्यात महात्म्याच्या "सत्याच्या शोधाने" फारसा प्रकाश पडणार नाही. पण ज्यांना चिकित्सक बुद्धीची देणगी मिळाली आहे त्यांना महात्मा सांगत असलेले सत्य म्हणजे खरोखर काय आहे हे मधून मधून सापडू शकेल. याचे अगदी ताजे उदाहरण म्हणजे त्यांचे अहमदाबाद गिरणी कामगारांपुढे झालेले, त्यांना वेतनकपात मान्य करण्यास सांगणारे त्यांचे भाषण होय.

१९३५ च्या जानेवारीत, दिल्ली येथे गिरणी मालकांच्या व कामगारांच्या प्रतिनिधीत स्वतःच्याच दडपणाखाली झालेल्या कराराची प्रशस्त प्रशंसा करून ते लिहितात, "तुमच्या वतीने मान्य केल्या गेलेल्या, वेतनकपातीची सूचना असलेल्या ह्या कराराला तुमची संमती मिळेल अशी मी आशा करतो. परिणामी यात तुमचे काहीही नुकसान होणार नाही तर त्यामुळे उलट तुमची प्रतिष्ठा वाढेल याबद्दल मला मुळीच संशय नाही. गेली चार वर्षे आपण ज्या तत्त्वांची जाणीव व्हावी म्हणून धडपडत आहोत तीं या करारात मान्य केली आहेत हे फारसे महत्त्वाचे नाही. आता या तत्त्वाच्या प्रत्यक्ष आचरणाच्या तयारीची जरूरी आहे. या बाबतीत तुमचे प्रयत्न जास्तीत जास्त सद्‌हेतुपूर्वक असण्यावर हे अवलंबून राहील हे मी सांगण्याची गरज नाही. गिरणीच्या औद्योगिक प्रगतीमुळे मालक व कामगार या दोघांनांही त्याचा फायदा मिळू शकतो हे जाणणारे या कराराच्या औचित्याबद्दल कधीही संशय घेणार नाहीत. तुमच्याशी माझा संबंध आल्यापासून गिरणीचा धंदा हा फक्त मालकांकरिताच नाही तर तो कामगारांकरिताही आहे हे सांगण्याचा मी कधीही कंटाळा केला नाही. या धंद्यात मालकांनी त्यांचे भांडवल गुंतवलेले असते. तुमचे श्रम हे तुमचे भांडवल आहे. म्हणून एक पक्ष दुसऱ्याच्या सहकाराशिवाय काम करू शकणार नाही. हे सत्य तुम्ही ओळखलेत तर हा करार मालक आणि कामगार या दोघांच्याही हितसंबंधांचे रक्षण करील असे तुम्हाला आढळून येईल."

जेव्हा हे सत्याचे प्रसारक हा आपल्या सत्याच्या स्वरूपाच्या ज्ञानाचा प्रकाश पाजळत होते, नेमक्या त्याचवेळी काँग्रेसच्या कार्यकारिणीने ही नवी अध्यात्मवादी

कल्पना आपल्या अधिकृत भाषेत सामावून घेतली. आणि त्यामुळे तिच्या पूर्ण स्वरा– ज्याच्या ध्येयाचा राजकीय कार्यक्रम ती गमावून बसली. याच वेळी काँग्रेसच्या दुरुस्त केलेल्या घटनेनुसार हुकूमशाहीला पूर्णपणे मान न तुकविणाऱ्या तिच्या वैयक्तिक सभासदांना आणि सर्व स्थानिक शाखांना शिस्तभंगाबद्दल अगदी काढून टाकण्याची- सुद्धा धमकी देणारा एक ठराव, आणि त्यावरोबरच सर्व देशाला "स्वातंत्र्यदिन" पाळण्याचा आदेश देणारा दुसरा एक ठराव असे दोन ठराव तिने सम्मत केले. हा दुसरा ठराव ऐतिहासिक महत्त्वाचा आहे (उलट अर्थाने), कारण काल्पनिक स्वातं- त्र्याच्या काल्पनिक लढ्याला, लोकांनी लावलेला हातभार म्हणजे एक नुसती पवित्र इच्छा ठरते. एका माणसाने आपल्या लहरीप्रमाणे तयार केलेल्या आध्यात्मिक चौकटीत राजकीय चळवळ नीटपणे बसू शकणार नाही, हे उघड करून दाखवण्याची जनतेची वृत्ती निषेधात्मक असल्यामुळे जनतेने कृतीच करता कामा नये. असा सदाच "धोक्याचा' वाटणारा खरोखरीचा लढा या काँग्रेसच्या अनभिषिक्त राजाच्या सिंहासनामागील शक्तींना नको आहे. म्हणून जनतेने पूर्ण स्वराज्याची फक्त इच्छा करावी आणि तिच्या नावाने वकीलपत्र चालवण्याची या पुढाऱ्यांना पूर्ण मुभा द्यावी. कायदेमंडळाच्या डोंबाऱ्याचा अद्‌भूत खेळ करून दाखविण्याची हमी घेणाऱ्या या नव्या नाटक मंडळींच्या कार्यक्रमासाठी रंगभूमी आता खाली करण्यात आली आहे. हा ठराव, राजकारणात सुरू केलेल्या "सत्य"पूजनाच्या स्पष्टीकरणावर प्रकाश पाडणारा म्हणून आणखी महत्त्वाचा आहे. हे मी प्रथम स्पष्ट करतो की राजकारणात सत्य असूच शकणार नाही असे माझे मुळीच म्हणणे नाही. पण एक आध्यात्मिक कल्पना म्हणून जीवनातील इतर क्षेत्रात सत्याला जे स्थान आहे त्यापेक्षा निराळे स्थान राजकारणात नाही. जे आध्यात्मिक कल्पनेमागे धावतात किंवा दांभिकपणे पूजन करण्याची शिकवण देतात ते खऱ्या सत्याला झिडकारतात. प्रत्यक्ष वस्तुस्थितीशी सत्य संबंधित असते. राजकारण हा जितका वस्तुनिष्ठ व्यवसाय असतो तितकाच त्याला सत्याचा आधार असतो.

जानेवारी १९३५ मध्ये दिल्ली येथील सभेत कार्यकारिणीने सम्मत केलेल्या ठरावाप्रमाणे, काँग्रेसच्या प्रत्येक माणसाने "स्वातंत्र्य दिना"च्या दिवशी खालील "मंत्र" म्हणावयाचा आहे. "या दिवशी आम्ही स्मरण करतो की संपूर्ण स्वातंत्र्य हा आमचा जन्मसिद्ध हक्क आहे आणि तो अमलात आल्याशिवाय आम्ही स्वस्थ बसणार नाही. हे ध्येय प्रत्यक्षात उतरवण्यासाठी आम्ही आमच्या सर्व शक्ती पणाला लावू. वाणी, विचार आणि आचार यानी सत्य व अहिंसेचे पालन करू. आणि सर्वात मोठा त्याग करण्यास तयार राहू. सत्य आणि अहिंसेचे व्रत घेऊन आम्ही (१) निरनिराळ्या जमातीत हार्दिक एकजूट निर्माण करण्याचा प्रयत्न करू आणि जाति- धर्मविरहित समानतेला उत्तेजन देण्याचा प्रयत्न करू, (२) मद्यपान बंदीची शिकवण

देऊ, ( ३ ) चरखा आणि ग्रामोद्योगाचा प्रसार करू आणि स्वतः खादी आणि ग्रामोद्योगाने निर्मिलेल्या इतर वस्तू वापरू, ( ४ ) अस्पृश्यतेचे निवारण करू (५) कोटयवधी भूकी देशबांधवांची सेवा करू,(६) इतर राष्ट्रीय व विधायक कार्ये करू." हा दिवस पूर्ण स्वराज्याकरिता प्रयत्न करण्याचा पक्का निश्चय करण्यात आणि विधायक कार्य करण्यात खर्च करावा अशी इच्छा प्रकट केली गेली आहे.

पूर्ण स्वराज्य हा आता राजकीय उद्देश राहिला नाही. अध्यात्मिक शुचितेतून मिळविण्याचे ते एक तत्त्व झाले आहे. तेव्हा, महात्म्याने १९२१ साली दिलेल्या, आत्म्याची शुचिता हा स्वराज्य मिळविण्याचा एकच मार्ग आहे. या किंवा स्वराज्य हा एक मनोधर्म आहे या शिकवणीकडे आपण परत फिरलो आहोत. लोकांनी पक्का निश्चय केला पाहिजे, पण हाताने कृती मात्र काहीही करिता कामा नये. पण " प्रयत्न" काय करावयाचे हे मोठ्या खुबीने संदिग्ध ठेवले आहे. सत्य आणि अहिंसेची शपथ काँग्रेस चळवळीचा सर्व राजकीय उद्देश नाहीसा करते आणि ती अव्यावहारिक सामाजिक कार्याला वाहिलेल्या तापसी लोकांची संघटना बनते. वरील पाचव्या मुद्यात काहीतरी प्रत्यक्ष अर्थ दिसतो, पण तो अतिशय संदिग्ध सोडला आहे. प्रत्यक्ष कृतीच्या कार्यक्रमाने जर तो बांधला गेला नसेल तर तो म्हणजे केवळ पोकळ शब्द ठरेल किंवा शुद्ध दांभिकपणा होईल. शेवटचे वाक्य तर फारच सूचक आणि निश्चितच अतिशय धोक्याचे आहे. जनतेने कृती करावयाची नाही, तर प्रार्थना आणि इच्छा करावयाची आहे. काँग्रेसच्या झेंडयाखाली एकत्रित झालेल्या या अव्यक्त क्रांतिकारक शक्ती राजकीय निष्क्रियतेने खच्ची करावयाच्या आहेत. शिवाय ब्रिटिश साम्राज्यशाहीशी सहकार्य ही काही आता भविष्यकालीन बाब राहिलेली नाही, ते आधीच सुरू झालेले आहे.

काँग्रेसने स्वीकारलेल्या नवीन पद्धतीबद्दल, आपल्या अधिकृत निवेदनात तिच्या जनरल सेक्रेटरींनी याचे स्पष्टीकरण, " बहुमत मिळविण्याकरिता हिटलर आणि मुसोलिनीच्या मार्गाने जाण्याची योजना " असे केले आहे. त्याचबरोबर गांधी-वादी चर्चच्या या मुख्य धर्ममार्तंडाने " स्टेट्स्मन "ला लिहिलेल्या आपल्या पत्रात क्रांतीच्या सिद्धांताचे एक नवेच स्पष्टीकरण दिलेले आहे आणि हिंदुस्तानला ते प्रत्यक्षात कसे लागू करता येईल हे दाखवून दिले आहे. ते म्हणतात, " क्रांती तोफा तरवारींनीच झाली पाहिजे असे नाही, किंवा ती असहकार किंवा कायदेभंगानेही करण्याची गरज नाही. ती सरकारच्या सहकार्याने आणि मदतीनेही होऊ शकेल. ती जर सरकारच्या सहकार्याने आणि मदतीने होऊ शकली तर सर्वात जास्त आनंद मुळात शांतीचे भोक्ते असलेल्या गांधींना होईल. त्यांनी अनेक प्रसंगी असे सांगितले आहे की ते सहकार्यासाठी अतिशय तळमळत होते आणि प्रतिष्ठित सहकार्याची

शक्यता निर्माण करण्याच्या केवळ एकाच हेतूने त्यांचा असहकार होता. जर सरकारच्या मदतीने खरेखुरे सहकार्य आणणे शक्य झाले तर आधुनिक भाषेत तो एक अद्भुत चमत्कार ठरेल : घटनात्मक मार्गांच्या दृष्टीने क्रांती करण्याचा प्रयत्न केला गेला आहे आणि ते कमी पडतात असे आढळून आले आहे. तरीसुद्धा सरकारला त्याच जुन्या आणि हतबल ठरलेल्या मार्गात चैतन्य ओतावयाचे असेल तर नवीन विधि-मंडळातील लोकप्रतिनिधींनी सम्मत केलेला ठराव त्यांना पूर्णपणे अमलात आणू द्या. तो वादातीत आणि सहकार्याचा मार्ग आहे. कायदेभंगाची चळवळ मारण्याचा तो एक मार्ग आहे. ही चळवळ मारण्याचा दुसरा मार्ग म्हणजे हिंसात्मक क्रांती. पण तिचे परिणाम लोकांना आणि सरकारला, दोघांनाही अनर्थकारक होतील."

स्टेट्स्मनने कॉंग्रेस चिटणीसांच्या या पत्राचे वर्णन "घटनात्मक मार्गाचे जोर-दार समर्थन" असे केले आहे. त्यात असेही जाहीर केले आहे की देश क्रांतीकडे झुकत आहे, जनतेला क्रांतिकारक बदलांच्या आवश्यकतेची जाणीव होत चालली आहे, पण आम्हा कॉंग्रेस पुढाऱ्यांना क्रांती नको आहे, हे अरिष्ट दूर करण्यात सहकार्य देण्याची संधी आम्हाला द्यावी अशी आमची सरकारला विनंती आहे ; सरकारला या धोक्याची जाणीव व्हावी आणि त्यांनी आमचा सल्ला घ्यावा.

नवीन विधिमंडळाने सम्मत केलेल्या ठरावात, अगदी दूरान्वयानेसुद्धा काहीही क्रांतिकारक नाही. कृपलानींच्या पत्रातील शेवटचे वाक्य फार संदिग्ध आहे. क्रांतीचा प्रतिक्रांतीशी घोटाळा करणारा मनुष्य क्रांतीचे ऐतिहासिक महत्त्व जाणण्यास संपूर्ण नालायक ठरतो. कृपलानींनी हा क्रांतिप्रतिक्रांतीचा घोटाळा तरी केला आहे किंवा नकळत आपल्या क्रांतीचे खरे स्वरूप तरी उघड केले आहे. कॉंग्रेस पुढारी क्रांतीच्या धोक्याच्या संबंधात ब्रिटिश सरकार व हिंदी जनता या दोघांचेही हितसंबंध सारखेच मानतात. "जनतेच्या" ऐवजी "वरचे वर्ग" असे वाचा, नाहीतर या विधानाला काही अर्थ रहात नाही. कॉंग्रेस झेंड्याखाली प्रगत होणारी जनतेची चळवळ म्हणजे सामाजिक-राजकीय असंतोषाचा आविष्कार आहे. या असंतोषाच्या पुढाऱ्यांना राजकीय सत्तेत आणि आर्थिक हक्कात भागीदार बनवण्याच्या देणगीने खूष करून त्यांच्याच मदतीने तो असंतोष काबूत ठेवला नाही तर तो क्रांती घडवल्याशिवाय रहाणार नाही.

◆ ◆ ◆

क्वेट्टा भूकंप बळींच्या दुःखाचे निवारण करण्याच्या प्रयत्नाबद्दल गांधी लिहितात, "हे सर्व आणि याच पद्धतीने चाललेले कितीतरी अधिक प्रयत्न प्रार्थनेची जागा घेऊ शकणार नाहीत. पण याचे कारणच काय ? जे घडले आहे ते ईश्वराला माहीत

नाही काय? आपले कर्तव्य करण्यास त्याला प्रार्थनेची आवश्यकता आहे काय? नाही. ईश्वराला आठवण करून देण्याची गरज नसते. तो प्राणिमात्रात वसलेला आहे. त्याच्या अनुमतीशिवाय काहीही होत नाही. आपली प्रार्थना ही आपल्या मनाचा शोध घेण्यासाठी आहे. प्रार्थनेशिवाय आपण दुर्बळ आहोत याची स्वतःलाच करून दिलेली ती आठवण आहे. मानवी प्रयत्नांच्या पराकाष्ठेमागे ईश्वराचा वरदहस्त नसेल तर ते फोल आहेत याची ती निश्चित जाणीव आहे. प्रार्थना म्हणजे नम्रता, आत्मशुद्धी. विहारच्या संकटाच्या वेळी मी जे सांगितले होते तेच पुन्हा सांगतो. प्रत्येक भौतिक संकटांमागे काही दैवी हेतु असतो. आज, विज्ञानशास्त्र ग्रहण केव्हा लागेल हे जसे आपल्याला आधी सांगू शकते तसेच एकादे दिवशी ते शास्त्र पूर्णत्वाला पोचले म्हणजे धरणीकंप केव्हा होतील हेही सांगण्याची शक्यता आहे. मानवी विचारांचा तो आणखी एक विजय होईल. पण असे विजय अगदी असंख्य पटीने मिळवले तरी ते आत्मशुद्धी मिळवू शकणार नाहीत आणि त्याशिवाय कशालाच किंमत नाही. अंतःशुद्धीची गरज ज्यांना भासते त्या सर्वांना मी प्रार्थनेत सामील व्हावयास सांगतो. त्यामुळे ज्या विधिलिखित घटना आपल्याला नम्र बनवू शकतील आणि नियतीला तोंड देण्याची पाळी येईल तेव्हा आपल्याला तयार करू शकतील. अशा घटनांच्या घडामोडीमागील ईश्वराचा हेतू आपण समजू शकू."

ज्या जराजीर्ण तत्त्वांनी हिंदू लोकांना पारमार्थिक वृत्तीचे दास बनविले आणि आजच्या या अवस्थेस आणले त्या तत्त्वांची जुनी पुनरावृत्तीच असलेल्या या निवेदनाची फक्त नोंद करण्याव्यतिरिक्त मी काहीही करणार नाही. या जगावरचे प्रत्येक संकट म्हणजे जर दैवी हेतूची व्यक्तता असेल तर आपल्या देशाच्या आजच्या राजकीय परिस्थितीबद्दल तक्रार का करावी? काँग्रेसने आपल्या राष्ट्रीय चळवळीच्या प्रमुखाच्या या भूमिकेनुसार राष्ट्रीय स्वातंत्र्याची इच्छा करणे म्हणजे ईश्वराच्या हेतूविरुद्ध बंड करणे ठरेल.

◆ ◆ ◆

यानंतर थोड्याच दिवसात, महात्म्यांच्या वरील निवेदनाला एका अर्थी पूरक अशा, दुसऱ्या एका उदात्त पांडित्यप्रदर्शनाचा देशाला लाभ झाला. जानेवारी ७, १९३५ रोजी, अलाहाबाद कायस्थ पाठशाळेत, हिंदुस्तानच्या राष्ट्रीय प्रश्नावर बोलताना दयाळबागचे साहेबजी महाराज म्हणतात : " राष्ट्रांचे आणि प्राणिमात्रांचे प्रारब्ध सर्वसाक्षी व दयाळू परमेश्वराने आधीच घडवलेले असते यावर माझा विश्वास आहे. जगातील प्रत्येक गोष्ट दैवी घटनेनुसार घडत असते आणि ईश्वराने पुढे ठेवलेल्या कल्याणाच्या ध्येयाकडे मानवी समाज जात असतो असा माझा विश्वास

आहे." हा हेतुवादाचा सिद्धान्त इतिहासाला लावताना वक्ते म्हणतात की, ईश्वरी इच्छेने आर्य लोक हिंदुस्तानात आले आणि त्यांनी स्थानिक लोकांना जिकले. याच तर्कदृष्टीने त्यांनी असेही सांगितले की मुसलमान व ब्रिटिश यांचे हिंदुस्तानचे विजय हेही दैवी घटनेनुसार मिळवले गेले. इतिहासाचा हा दृष्टिकोन पर्यायाने महात्म्याच्याही आवडत्या कर्मठ मतातून निघतो. ह्या दृष्टिकोनाने राष्ट्रीय स्वातंत्र्याकरता झगडण्याकडे, ईश्वरी इच्छेविरुद्ध बंड, किंवा दैवी घटनांची सुसूत्रता बिघडवण्याची इच्छा म्हणूनच पाहिले पाहिजे. म्हणूनच वरील वक्त्यांनी, राष्ट्रीय प्रश्न म्हणजे राज्यकर्ते व प्रजाजन यातील बंधुभावाची जाणीव करून देणारा प्रश्न असे समजून खालील पांडित्यप्रदर्शन केले "तुमचे आधुनिक शिक्षण लोकांना हुशार बनवील पण सुखी करणार नाही. तुमचे आधुनिक लोकसत्ताक हक्क जनतेला सामर्थ्यवान करतील पण आत्मसंयमिकी करणार नाहीत. भौतिक गोष्टी तुम्ही जितक्या जास्त मिळवत जाल तितकी त्या जास्त जास्त मिळविण्याबद्दलची हाव वाढत जाते, आणि तुम्ही कधीच संतुष्ट होत नाही. या जगात प्रत्येकाजवळ मोटारगाड्या आणि घोडे असणार नाहीत की प्रत्येकजण लक्षाधीश असणार नाही हे उघडच आहे." या "आध्यात्मिक" जीवनाच्या दृष्टिकोनाचे सामाजिक महत्त्व उघडच आहे. ते म्हणजे काल्पनिक मुक्तीच्या आशेने वास्तविक जीवनात गुलामगिरी पत्करणे. जोपर्यंत हिंदी स्वातंत्र्याची चळवळ या तत्त्वज्ञानाने भरलेली आहे तोपर्यंत ती स्वतःच्या मूर्खपणाचे प्रदर्शन करीत रहाणारच.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्वागत
अनुक्रम ७५८८१ दि ११-८-६१
क्रमांक ३१३१ नों दि २२/५/७१

REFBK-0006138